रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग

# कृषीवल

१९३७-२०२६ ९० वर्ष

रायगड | मंगळवार | दि. १६ जून २०२६ | अंक १० | पृष्ठे ८ | किंमत ४ ₹ | आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | RGD/016/2026-28 | krushival.in

### एसटीच्या भाडेवाढीसाठी मुदतवाढ

**मुंबई :** वाढत्या इंधन खर्चामुळे महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळावर पडणाऱ्या आर्थिक भारामुळे साध्या बससेवांसाठी १० टक्के हंगामी भाडेवाढीस एक महिन्याची मुदतवाढ देण्यात आली आहे. त्यामुळे वाढीव भाडेदर आता दि.१५ जुलै रोजी रात्री १२.०० वाजेपर्यंत कायम राहणार आहेत. उन्हाळी गर्दीच्या हंगामात प्रवासी वाहतुकीचे प्रभावी नियोजन आणि महसूलवाढीच्या उद्देशाने महामंडळाने दि.१५ एप्रिलपासून साध्या बससेवांच्या भाड्यात हंगामी वाढ लागू केली होती. या भाडेवाढीची मुदत दि.१५ जून रोजी संपुष्टात येणार होती.

### पावसाळी अधिवेशनाचे वेळापत्रक जाहिर

**मुंबई :** राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाचे वेळापत्रक निश्चित झाले असून, हे अधिवेशन २२ जूनपासून मुंबईत सुरू होणार आहे. हा निर्णय विधिमंडळाच्या कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीत घेण्यात आला. १० जुलैपर्यंत चालणाऱ्या या तीन आठवड्यांच्या अधिवेशनात अनेक महत्त्वाच्या आणि ज्वलंत विषयांवर चर्चा होण्याची शक्यता आहे. विधानसभेचे कामकाज सकाळी ११.०० वाजता, तर विधान परिषदेचे कामकाज दुपारी १२.०० वाजता सुरू होणार आहे. राज्यपाल विष्णू देव वर्मा यांच्या मान्यतेनंतर विधिमंडळ सचिवालयाने यासंदर्भातील अधिसूचना जारी केली आहे.

# नव्या स्वप्नांची सुरुवात, प्रवेशोत्सव जल्लोषात

## फुलांची उधळण, औक्षण, गुलाब पुष्प देऊन नवोगतांचे स्वागत



| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |

दीड महिन्याच्या सुट्टीनंतर जिल्ह्यातील शाळा सोमवारी (दि.१५) सुरु झाल्या. यावेळी जिल्हा परिषदेच्या शाळांसह अन्य शाळांमध्ये फुलांची उधळण, औक्षण करीत आणि गुलाब पुष्प देऊन नवोगतांचे स्वागत करत प्रवेशोत्सव जल्लोषात साजरा करण्यात आला. त्यामुळे आता जिल्ह्यातील शाळांमधील मुला, मुलींचा किलबिलाट पुन्हा सुरु झाल्याचे चित्र दिसून •> पान २ वर

### गावागावांत प्रभात फेरीचे आयोजन

संपुर्ण गावातून प्रभात फेरी काढण्यात आली. या प्रभात फेरीमध्ये शाळेतील मुख्याध्यापक, शिक्षक, शाळा व्यवस्थपन समितीचे पदाधिकारी, सभासद, पालक, लोकप्रतिनिधी सहभागी झाले होते. या प्रभात फेरीतून शाळेचे महत्त्व गावांपर्यंत पोहचविण्याचा प्रयत्न करण्यात आला. प्रभात फेरी झाल्यावर शाळेत येणाऱ्या विद्यार्थ्यांचे फुलांचा वर्षाव व औक्षण करीत स्वागत करण्यात आले.

## मुख्यमंत्र्यांनी साधला विद्यार्थ्यांशी संवाद

पनवेल तालुक्यातील पीएमश्री म्हणून निवड झालेल्या रायगड जिल्हा परिषदेच्या वहाळ या शाळेत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी (दि.१५) भेट दिली. यावेळी त्यांनी पहिलीमध्ये नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसह इतर विद्यार्थ्यांसोबत संवाद साधला. तसेच, शाळेत उभारण्यात आलेल्या अत्याधुनिक सेंटर लॅबचे उद्घाटनही यावेळी करण्यात आले.

वहाळ शाळेत झालेल्या प्रवेशोत्सवाच्या कार्यक्रमासाठी माजी खासदार रामशेठ ठाकूर, प्रधान सचिव शालेय शिक्षण रणजीत सिंह देओल, आयुक्त शालेय शिक्षण सचिंद्र प्रताप सिंह, विभागीय आयुक्त •> पान २ वर



> उन्हाळी सुट्टीनंतर पुन्हा नव्याने शाळा सुरु झाल्या. शाळेच्या पहिल्या दिवशी शाळेत येणाऱ्या विद्यार्थ्यांचे जल्लोषात स्वागत करण्यात आले. बैलगाडीला सजवून त्यामधून मिरवणुक काढत मुलांना शाळेपर्यंत आणण्यात आले. त्यानंतर फुलांचा वर्षाव करीत प्रवेशोत्सव साजरा करण्यात आला. शिक्षणप्रेमी, वेगवेगळ्या क्षेत्रातील मंडळी या उपक्रमात सहभागी झाले होते. यावेळी विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तक, गणवेश, शुज वाटप केले. पहिल्या दिवशी शालेय पोषण आहार व गोड पदार्थ देऊन स्वागत करण्यात आले.
>
> – प्रमोद भोपी, अध्यक्ष,
> महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघ, शाखा अलिबाग

## वे|ध|क

### आजपासून पुरवणी परीक्षेला सुरुवात

**रायगड :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत जून-जुलैमध्ये पुरवणी परिक्षा घेण्यात येते. यंदा घेण्यात येणारी इ. दहावी व बारावीची पुरवणी परीक्षा मंगळवार दि.१६ जूनपासून सुरू होत आहे. यावेळी रायगड जिल्ह्यातून दहावीच्या परीक्षेसाठी एकूण ९१२, तर बारावी पुरवणी परीक्षेसाठी १४५८ विद्यार्थी प्रविष्ठ आहेत. फेब्रुवारी-मार्च २०२६ मध्ये इ. दहावी व बारावीच्या परीक्षा घेण्यात आल्या होत्या. या मुख्य परीक्षेत एका किंवा दोन विषयांत अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना आपले शैक्षणिक वर्ष न वाया घालवता उत्तीर्ण होण्याची संधी पुरवणी परीक्षा देते. ही परीक्षा महाराष्ट्र •> पान २ वर

### अल्पवयीन मुलीवर अत्याचार

**रेवदंडा :** मुरुड तालुक्यातील तेंबुर्डे आदिवासीवाडी येथील अल्पवयीन मुलीवर अत्याचार केल्याप्रकरणी रेवदंडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गतवर्षी १ नोव्हेंबर रोजी मध्यरात्री तेंबुर्डे येथून पीडित अल्पवयीन मुलीला नेऊन आरोपीने तिच्याशी प्रेमसंबंध निर्माण केले. तसेच, लग्नाचे आमिष दाखवून तिच्याशी शारीरिक संबंध ठेवले. नोव्हेंबर २०२५ पासून तिच्याशी वारंवार शारीरिक संबंध ठेवल्याने पीडित मुलगी गरोदर राहिली. याप्रकरणी पीडितेच्या तक्रारीवरून रेवदंडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्याचा अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक गोविंद मडावी हे करीत आहेत.

### कार्यकर्त्यावर जीवघेणा हल्ला

**मुंबई :** चेंबूरमध्ये सामाजिक कार्यकर्ते राजू खान यांच्यावर जीवघेणा हल्ला झाल्याची घटना घडली आहे. या घटनेत राजू खान गंभीर जखमी झाले असून, त्यांची प्रकृती चिंताजनक असल्याची माहिती समोर आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, मुंबई चेंबूर येथील सामाजिक कार्यकर्ते राजू खान यांच्यावर अज्ञातांनी धारदार शास्त्राने वार केल्याची घटना घडली आहे. राजू खान यांच्या मानेवर धारदार शास्त्राने वार करत त्यांना जीवे मारण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. त्यांच्यावर सायन रुग्णालयात उपचार सुरु आहे. या घटनेप्रकरणी राजू खान यांच्या कुटुंबीयांनी शिवसेना आमदार तुकाराम कातेंनी हा हल्ला केला असल्याचा आरोप केला आहे.

## अभिनेत्रीची गळफास घेऊन आत्महत्या

| मुंबई | प्रतिनिधी |



टेलिव्हिजन इंडस्ट्रीतील प्रसिद्ध अभिनेत्रीने आत्महत्या करत स्वत:च जीवन संपवले आहे. नालासोपारा येथील राहत्या घरात गळफास घेत अभिनेत्रीने आत्महत्या केली असून, या घटनेमुळे टेलिव्हिजन इंडस्ट्रीत खळबळ पसरली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, टेलिव्हिजन इंडस्ट्रीतील प्रसिद्ध अभिनेत्री संचिता उगाले (३०) हिने आत्महत्या केली आहे. नालासोपारा पूर्व येथे अचोले पोलीस स्थानक परिसर येथील ही अभिनेत्री रहिवासी आहे. रविवारी (दि.१४) संध्याकाळी साडेसहा वाजताच्या सुमारास ही घटना घडली. दरम्यान, घटनास्थळी कसलीही सुसाईड नोट सापडली नसून सध्या पोलीस या प्रकरणी अधिक चौकशी करत आहेत. अभिनेत्री संचिता उगाले हिने टेलिव्हिजन इंडस्ट्रीतील अनेक गाजलेल्या मालिकांमध्ये काम केले आहे. कुमकुम भाग्य, वागले की दुनिया, दिलवाले दुल्हनिया ले जाएंगे अशा अनेक मोठ्या शोमध्येही तिने काम केले. तसेच, विक्की कौशलच्या छावा या चित्रपटातही तिने ताराबाई ही भूमिका साकारली होती.

## अभिजीत दीपके यांना मारहाण

| मुंबई | प्रतिनिधी |

जयपूरमध्ये, कॉकरोच जनता पार्टीचे संस्थापक अभिजीत दीपके यांना दोन तरूणांकडून मारहाण झाल्याची घटन घडली. अभिजीत दीपके शहीद स्मारकाजवळ पोहोचताच तरुणांमध्ये झटापट झाली. त्यांना खांद्यावर उचलून आत नेले जात होते. यावेळी जमावातील दोन तरुणांनी त्यांना कानशिलात लगावली. सीजेपीच्या सदस्यांनीही त्या तरुणाला चोप दिला. त्या दोन तरूणांना पोलिसांनी ताब्यात घेतले. अभिजीत नीट पेपरफुटी, शिक्षण व्यवस्था, बेरोजगारी आणि तरुणांशी संबंधित इतर समस्यांविरुद्धच्या आंदोलनात सहभागी होण्यासाठी आले होते.

# महाराष्ट्र हादरला!

## पिकअप विहिरीत कोसळून ८ जणांचा मृत्यू

| सोलापूर | प्रतिनिधी |

सोलापूरच्या माळशिरस तालुक्यातील म्हसवड-पंढरपूर मार्गावर तांदूळवाडी गावाजवळ भीषण अपघात घडला. देवदर्शनावरून परतताना पिकअप वाहन विहिरीत कोसळून ८ जणांचा जागीच मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. तर, ७ जण बचावले आहेत. हे सर्वजण पंढरपूर तालुक्यातील रांजणी गावचे रहिवासी असून या घटनेमुळे संपूर्ण महाराष्ट्र हादरला आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, माळशिरस तालुक्यातील म्हसवड-पंढरपूर मार्गावर तांदूळवाडी गावाजवळ पिकअप वाहन विहिरीत कोसळून भीषण अपघात झाला. त्यात पंढरपूर तालुक्यातील रांजणी गावातील •> पान २ वर

# रस्त्यासाठी बुधवारी जनआक्रोश

### चणेरा नाक्याजवळ रास्ता रोको

| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |

करोडो रुपयांचा निधी खर्च होऊनही रस्त्याचे काम अपूर्ण स्थितीत आहे. त्याचा नाहक त्रास चणेरा-पांगळोली-उसर मार्गे रोहामधील नागरिकांसह प्रवाशांना होत आहे. या रस्त्याचे काम पुर्ण करण्याचे फक्त आश्वासने देण्यात आले असून, प्रत्यक्षात मात्र काम पूर्ण करण्यास रोहा सार्वजनिक बांधकाम विभाग उदासीन ठरले आहे. त्यामुळे संतप्त झालेले नागरिक रस्त्यासाठी बुधवारी (दि.१७) चणेरा नाक्याजवळ सकाळी १०.०० वाजता रास्ता रोको आंदोलन करणार असल्याची माहिती चणेरा रहिवासी ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष प्रकाश विचारे यांनी दिली आहे.

### रस्त्याच्या कामावर दृष्टीक्षेप

- शासनाच्या अर्थसंकल्पात रस्ता मंजूरीः २०२१
- कार्यादेशः २०२३
- रस्त्याची लांबीः साडेनऊ किलो मीटर
- कामाचे स्वरूपः खडीकरण, डांबरीकरण आणि मजबूतीकरण
- कामाची स्थितीः पावणेसात किलोमीटरचा रस्त्याचे काम पुर्ण
- सध्याचा खर्चः अडीच कोटी रुपयांचा निधी खर्च
- कंपनीचा ठेकाः रोहा येथील सिध्दीविनायक कंपनी

> **चणेरा-पांगळोली-उसर मार्गे रोहा मार्गावरील रस्त्याच्या कामाला २०२१ मध्ये प्रशासकीय मान्यता मिळाली होती. २०२३ मध्ये कार्यादेश काढण्यात आला होता. साडेनऊ किलो मीटरपर्यंतच्या रस्त्याचे काम प्रगती पथावर आहे. वन विभागाच्या जमीनीची मंजूरी मिळविण्यासाठी विलंब झाला होता. पाऊस पडेपर्यंत रस्त्याचे काम सुरू राहणार आहे.**
>
> **– विजय बागूल, उपअभियंता, रोहा सार्वजनिक बांधकाम विभाग**

विचारे यांच्याकडून मिळालेल्या माहितीनुसार, अलिबाग-रोहा मार्गावरील चणेरा- पांगळोली- उसर मार्गे रोहा हा प्रमुख जिल्हा मार्ग •> पान २ वर

**अस्मानी, सुलतानी संकटांनी ग्रासले | मुरूडमधील बागायतदार हवालदील**

# रोगाचा विळखा भारी, धोक्यात आली सुपारी

| आगरदांडा | प्रतिनिधी |



(छायाचित्र: गणेश चोडणेकर)

मुरुड तालुक्यातील बहुतांशी शेतकऱ्यांचे भातपीकाबरोबर नारळ-सुपारीचे पीक देखील महत्त्वाचे उत्पन्नाचे स्त्रोत आहे. तालुक्यातील बहुतांश शेतकऱ्यांची स्वतःची भातशेती नाही. त्यामुळे नारळ सुपारीच्या बागा त्यांच्या उपजिविकेचा एकमात्र स्त्रोत आहेत. परंतु, सद्यस्थितीत या पिकाला काही प्रमाणात अस्मानी व सुलतानी संकटांनी ग्रासले आहे. सुपारीच्या फळांसह झाडांवर पडत असलेल्या विविध रोगांमुळे सुपारीचे पीक संकटात सापडले आहे.

सध्याच्या वातावरणातील बदलामुळे वाढलेली उष्णता सुपारीच्या छोट्या रोपांना त्रासदायक ठरत आहे. या उष्णतेमुळे रोपांवर करपा रोग पडण्यास सुरुवात झाली आहे. रोपांची वाढ खुंटून ते उभेच सुकते. या एका नव्या रोगाने सुपारीवर नवीन संक्रांत आली आहे. याशिवाय मुंग्या, उंदीर, खारी, भुंगे, वटवाघळे इत्यादी सुपारीच्या फळांना व्यवस्थित वाढून देत नाहीत. मुरुड तालुक्यात जवळपास ४१६ हेक्टर जमीनीवर सुपारीची लागवड करण्यात येते. परंतु, काही वर्षांपासून सुरू असलेल्या निसर्ग व अन्य वादळाच्या घटनांमुळे त्यातील १४२ हेक्टर क्षेत्र बाधित झाले आहे. त्यातच आता सुपारीच्या झाडांना विविध रोगांनी ग्रासले आहे. सुपारीच्या •> पान २ वर


## तुमच्या जुन्या बँक खात्यांमध्ये पैसे विसरला आहात का?



ते पुन्हा मिळवण्यासाठी आरबीआय तुम्हाला मदत करेल.

**बँकेतील तुमच्या निष्क्रिय खात्यातील (2 वर्षांपेक्षा जास्त आणि 10 वर्षांपेक्षा कमी निष्क्रिय असलेले खाते) पैसे / दावा न केलेल्या ठेवीतील (10 वर्षांपेक्षा अधिक काळ) पैसे आरबीआयच्या डीईए निधीमध्ये हस्तांतरित केले जातात. तुम्ही किंवा तुमचा कायदेशीर वारस त्यावर कधीही दावा करू शकतो.**

### तुमच्या पैशांवर दावा करण्याच्या 3 सोप्या स्टेप्स

1. तुमच्या बँकेच्या कोणत्याही शाखेत भेट द्या, ती तुमची नेहमीची शाखा नसली तरीही चालेल.
2. केवायसी कागदपत्रांसह (आधार, पासपोर्ट, मतदाता ओळखपत्र, किंवा ड्रायविंग लायसन्स) फॉर्म सादर करा
3. पडताळणी केल्यानंतर, जर असतील तर पैसे व्याजासह परत मिळवा




### तुम्ही दावा न केलेली रक्कम शोधण्यासाठी

तुमच्या बँकेची वेबसाइट शोधा किंवा आरबीआयचे UDGAM पोर्टल **(https://udgam.rbi.org.in)** पहा, ज्यात सध्या 30 बँका आहेत.

क्यूआर कोड स्कॅन करा

अधिक माहितीसाठी भेट द्या: **https://rbikehtahai.rbi.org.in**
अभिप्राय देण्यासाठी इथे लिहा: **rbikehtahai@rbi.org.in**

**अधिकृत व्हॉट्सअ‍ॅप नंबर 99990 41935**

जनहितार्थ जारी
**भारतीय रिज़र्व बैंक**
**RESERVE BANK OF INDIA**
www.rbi.org.in

पान १ वरून

# मुख्यमंत्र्यांनी साधला विद्यार्थ्यांशी संवाद

कोकण रुबल अग्रवाल, आ. विक्रांत पाटील, आ. प्रशांत ठाकूर, आ.महेश बालदी, रायगड जिल्हा परिषदेचे अध्यक्ष मंगेश वाकडीकर, जिल्हाधिकारी किशन जावळे, शिक्षण सभापती चंद्रकांत कळंबे, दुध व पशुसंवर्धन सभापती वैकुंठ पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. रूपाली सातपुते, जिल्हा परिषद सदस्य कमला देशेकर, अनन्या गाताडे, प्राची जाधव, हर्षदा घरत, निकिता खारकर, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) महारूद्र नाळे, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) ललिता दहितुले यांच्यासह इतर मान्यवर, पालक उपस्थित होते.

**अनेक अधिकाऱ्यांची शाळांना भेट**

रायगड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांनी अलिबाग तालुक्यातील नवगाव, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. रूपाली सातपुते यांनी पनवेल तालुक्यातील पळस्पे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी राहुल कदम यांनी पोलादपूर तालुक्यातील चांभारगणी बुद्रुक या जिल्हा परिषद शाळांना भेट देत विद्यार्थी व पालकांसोबत संवाद साधला. यावेळी जिल्हा परिषद शाळेचे महत्व पटवून देण्यात आले.

# महाराष्ट्र हादरला!

८ जणांचा बुडून मृत्यू झाला. तर, ७ जण बचावले. हे सर्वजण सिद्धनाथाच्या दर्शनासाठी गेले होते. गावाकडे परत येत असताना माळशिरस तालुक्यातील तांदळवाडी गावानजीक हा अपघात झाला. या अपघाताचे कारण अद्याप समजू शकलेले नाही. मात्र, चालकाचे नियंत्रण सुटल्याने हा अपघात झाल्याचे बोलले जात आहे. ही विहीर रस्त्याच्या कडेला होती. भाविकांसह पिकअप वाहन या विहिरीत कोसळले. ही विहीर पाण्याचे तुडुंब भरलेली होती. या विहिरीला कोणतेही कठडे नव्हते, त्यामुळे पिकअप थेट पाण्यात गेल्याची प्राथमिक माहिती समारे आली आहे. या घटनेतील ८ जणांचे मृतदेह बाहेर काढण्यात आले आहेत. या घटनेतील मृतांमध्ये लहान मुलांचा आणि महिलांचा देखील समावेश आहे. दरम्यान, या घटनेवर बोलताना सोलापूरचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी या अपघाताची सखोल चौकशी होऊन दोषींवर कठोर कारवाई केली जाणार असल्याचे म्हटले आहे.

# रस्त्यासाठी बुधवारी जनआक्रोश

असल्याने महत्वाचा आहे. तसेच, हा रस्ता म्हसळा, हरेश्वर, अलिबागकडे ये-जा करणाऱ्यांना फायदेशीर ठरणार आहे. या रस्त्यासाठी राज्य शासनाच्या अर्थसंकल्पात २०२१ मध्ये ५ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली. त्यानंतर या रस्त्याचे डांबरीकरण व रुंदीकरणाचे काम सार्वजनिक बांधकाम विभागाकडून करण्यात आले. हे काम सिद्धिविनायक कंपनीला देण्यात आले आहे. मात्र, सुमारे साडेनऊ किलोमीटरच्या डांबरी रस्त्याच्या कामासाठी करोडो रुपये खर्च करण्यात आले आहे. त्यासाठी तीन देयके ठेकेदाराला दिल्याचा आरोप करण्यात आला आहे. परंतु, हा रस्ता अजूनही अपुर्णावस्थेत आहे. त्यामुळे अनेक वेळा सार्वजनिक बांधकाम विभागाकडे पाठपुरावा करून रस्त्याचे काम तातडीने पुर्ण करा, अशी मागणी करण्यात आली. अनेक वेळा आंदोलने केली आहे. यावेळी फक्त आश्वासनेच दिली जात असल्याचा आरोप विचारे यांनी केला आहे.

या रस्त्याच्या अपूर्ण कामामुळे नागरिकांना व दैनंदिन प्रवास करणाऱ्या प्रवाशांना प्रचंड त्रास होत आहे. याची जाणीव सार्वजनिक बांधकाम विभागाला करून दिली. परंतु, त्यांच्याकडून ठोस कार्यवाही दिसून आली नाही. या रस्त्याचे काम पुर्ण करण्यासाठी ३१ मे २०२५, ३१ डिसेंबर २०२५, ३१ मार्च २०२६ आणि ३१ मे २०२६, १ जून २०२६ आणि १५ जून २०२६ रोजी अशी अनेक आश्वासने सार्वजनिक बांधकाम विभागाने दिली आहेत. काही आश्वासने लेखी स्वरुपात दिली, तर काही आश्वासने तोंडी दिली आहेत. त्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या या भोंगळ कारभाराविरोधात चणेरा रहिवासी ज्येष्ठ नागरिक संघाने आता आक्रमक भूमिका घेतली आहे. येत्या १७ जून रोजी सकाळी १०.०० वाजता चणेरा नाक्याजवळ रास्ता रोको केला जाणार असल्याचा इशारा प्रकाश विचारे यांनी दिला आहे. या आंदोलनात शेकडो नागरिक सहभागी होणार आहे.

# आजपासून पुरवणी परीक्षेला सुरुवात

राज्य मंडळाद्वारे दरवर्षी जून-जुलै महिन्यात घेतली जाते. त्यामुळे पुरवणी परीक्षेत उत्तीर्ण होऊन विद्यार्थी पुढील शिक्षणासाठी प्रवेश घेऊ शकतात. त्यानुसार बारावी व दहावीची परीक्षा दि.१६ जूनपासून सुरू होत आहे. दहावीची पुरवणी परीक्षा दि.१६ ते ३० जूनदरम्यान, तर बारावीची पुरवणी परीक्षा दि.१६ जून ते ८ जुलै या कालावधीत होणार आहे. या दोन्ही परीक्षांचे सविस्तर वेळापत्रक मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आले आहे. या पुरवणी परीक्षेसाठी रायगड जिल्ह्यातून दहावीच्या परीक्षेसाठी एकूण ९१२, तर बारावीच्या पेपरसाठी १४५८ विद्यार्थी प्रविष्ठ आहेत. यावेळी दहावी व बारावीची परीक्षा १० केंद्रांवर होणार आहे. परीक्षा सुरळीत व सुरक्षित वातावरणात होण्यासाठी, तसेच केंद्रावर घडणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध घालता यावा, म्हणून भरारी पथकांची नियुक्ती करण्यात आली आहे.

**परीक्षांसाठी १६३ कलम लागू**

जिल्ह्यातील परीक्षा वितरण केंद्रे व परीक्षा केंद्रांवर मोबाईल फोन, पेजर यांचा वापर करण्यास मनाई करण्यात आली आहे. तसेच, परीक्षा केंद्राच्या ५० मीटर परिसरातील एसटीडी बूथ, झेरॉक्स मशीन व फॅक्स मशीन बंद ठेवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. परीक्षेसाठी आवश्यक साहित्याव्यतिरिक्त इतर कोणतेही आक्षेपार्ह साहित्य वापरण्यासही बंदी राहणार आहे. याशिवाय प्रत्येक पेपर सुरू होण्याच्या एक तास आधीपासून ते पेपर संपल्यानंतर एक तासापर्यंत परीक्षा केंद्राच्या ५० मीटर परिसरात शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, परीक्षार्थी व प्रशासकीय कर्मचारी यांच्याव्यतिरिक्त इतर कोणालाही प्रवेश अथवा वावर करण्यास मनाई करण्यात आली आहे.

# नव्या स्वप्नांची सुरुवात, प्रवेशोत्सव जल्लोषात

आले. तसेच, जिल्हा परिषद शाळेबद्दल आकर्षण निर्माण व्हावे, म्हणून विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके, गणवेश तसेच खाऊ देण्यात आला. एप्रिल महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात परिक्षा संपल्यानंतर दि.१४ जूनपर्यंत दीड महिना उन्हाळी सुट्टी जाहीर झाली होती. काही विद्यार्थ्यांनी सुट्टीचा आनंद खेळून व पालकांसमवेत ठिकठिकाणी फिरून घालविला. त्यानंतर शाळा कधी सुरु होणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले होते. अखेर ही उत्कंठा संपली आणि सोमवारपासून शाळा नव्याने सुरु झाल्या. यावेळी ज्ञान मंदिरांची कवाडे उघडण्यात आली.

नव्याने शाळेत येणाऱ्या विद्यार्थ्यांना शाळेबद्दल आवड निर्माण व्हावी, तसेच शाळेतील विद्यार्थ्यांची पटसंख्या वाढावी, यासाठी जिल्हा परिषद शिक्षण विभागामार्फत शाळा पुर्व तयारी नियोजन करण्यात आले होते. यावेळी नव्याने शाळेत येणाऱ्या विद्यार्थ्यांचे जल्लोषात स्वागत करण्यात आले. यादरम्यान, संपुर्ण गावातून प्रभात फेरी काढण्यात आली. या प्रभात फेरीमध्ये शाळेतील मुख्याध्यापक, शिक्षक, शाळा व्यवस्थपन समितीचे पदाधिकारी, सभासद, पालक, लोकप्रतिनिधी सहभागी झाले होते. या प्रभात फेरीतून शाळेचे महत्व गावांपर्यंत पोहचविण्याचा प्रयत्न करण्यात आला. प्रभात फेरी झाल्यावर शाळेत येणाऱ्या विद्यार्थ्यांचे फुलांचा वर्षाव व औक्षण करीत स्वागत करण्यात आले. शाळेतील विद्यार्थ्यांना गोड पदार्थ देण्यात आले. त्यानंतर शाळेत प्रार्थना घेण्यात आली. तसेच, शासनाकडून देण्यात आलेल्या पुस्तकांचे विद्यार्थ्यांना पहिल्याच दिवशी वाटप करण्यात आले. काही शाळांमध्ये विद्यार्थ्यांसमवेत संवाद साधण्यात आला. तर, काही शाळांमध्ये विद्यार्थ्यांना शिकविण्यात आले. शिक्षणाची गोडी निर्माण व्हावी, यासाठी अशाप्रकारे वेगवेगळे उपक्रम घेण्यात आले. त्यामुळे शाळेचा पहिला दिवस एक वेगळ्या उपक्रमातून पार पडला.

# रोगाचा विळखा भारी, धोक्यात आली सुपारी

झाडांना भेडसावणाऱ्या रोगात झाडाच्या बुडाशी आळंबी नावाचा रोग होतो. या रोगाच्या आळ्या झाडाच्या बुंध्याला पोखरतात व रस शोषण करतात. परिणामी लहान मोठी झाडे उभीच वाळून जातात. तसेच, ज्या बागांमध्ये पावसाचे पाणी जास्त प्रमाणात साठते तेथे आळंबी रोग मोठ्या प्रमाणात आढळतो. त्याचबरोबर बागेत पाणी साठणे व जुलै ते सप्टेंबर या महिन्यांत पडणाऱ्या संततधार पावसातील दमट हवामानात कोवळ्या सुपारी फळांना कोळे रोगाची लागण होते. या रोगाने मोठ्या फळांना बुरशी पकडून त्यांची गळती सुरू होते व महिनाभरात हा रोग बागायतीत सर्व झाडांच्या फळांवर पसरतो. त्यामुळे बागायतदाराचे मोठे नुकसान होते. तसेच, सुपारीच्या झाडांना बांड येणे हा एक रोग ग्रासून टाकतो. या रोगात सुपारीच्या झाडांचे शेंडे आवळत जाऊन बारीक होतात.अशा झाडांना फलधारणा होत नाही. काही काळातच झाड मरून जाते. या खेरीज सुपारीची फळे आकारास येत असतांना काही फळांच्या आतील रोठा वाजवीपेक्षा मोठा होत जातो. त्यामुळे फळांच्या बुंध्याकडील भागाला चिरे पडतात. त्यातून आत पाणी झिरपल्याने कोवळ्या रोठ्यावर कीड पडते व तो खराब होतो.काही दिवसांतच सर्व फळे खराब होऊन गळून पडतात. या रोगांचे संशोधन व त्यावरील उपाय अगदी दापोलीच्या कृषी विद्यापीठालाही शोधता आलेले नाहीत. खासदार सुनील तटकरे यांनी श्रीवर्धन-दिवेआगर परिसरात सुपारी संशोधन केंद्र उभारण्यात येणार असल्याचे आश्वासन दिले होते; परंतु, ते अद्याप आकारात आलेले नाही. अशा विविध अस्मानी व सुलतानी संकटांनी मुरूडमधील सुपारी अक्षरशः अडकित्त्यात सापडली आहे. त्यात गोरगरीब बागायतदार भरडून निघत आहे. वाढत्या तापमानात झाडांना लागलेली छोटी फळे कशी वाचवावीत, असा प्रश्न त्यांना पडला आहे.


## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक


## नोटीस

सर्व जनतेस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालीलप्रमाणे नमुद मौजे वांदेली, ता.मुरूड, जि.रायगड येथील मिळकत आमचे अशिल यांनी विद्यमान मालक १) जनाबाई किसन तरेकर, २) बाळी गंगाराम मांजरेकर, ३) दिनेश पांडुरंग गायकर, ४) परुणा भगवान बरजे, ५) अरुणा पांडुरंग गायकर, ६) जयश्री जयराम मोहिते, ७) गीता गणेश मांजरेकर, ८) प्रमिला मंगेश कुलवे यांचेकडून कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदरहू मिळकत ही निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीच्या विद्यमान मालकांनी दिलेला असला तरी, या खरेदी-विक्री व्यवहाराबाबत कोणाचीही कोणतीही हर हरकत दावा, लिज, पोटगी, बक्षिसपत्र, मृत्युपत्र, तारण, ताबा/गहाण इ. स्वरूपाचे हक्क व हितसंबंध असल्यास ते योग्य त्या लेखी पुराव्यासह निम्न स्वाक्षांकीत खरेदीदार यांच्या वकीलांकडे ही जाहिर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत कळवावे. मुदतीत हरकत न आल्यास सदरहू मिळकत ही निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल खरेदी व्यवहार पूर्ण करतील व तद्नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही व अशा हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत हे सर्वांस कळावे

**मौजे वांदेली, ता. मुरुड, जि. रायगड**

| मौजे | गट क्रमांक व उपविभाग | एकुण क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|---|
| वांदेली ता.मुरूड | ३०८ | क्षेत्र ०-७१-७० पो.ख. ०-०७-४० एकुण क्षेत्र ०-७९-१० | १२.३१ |

वर नमुद मिळकतींपैकी क्षेत्र ०-४०-०० हे.आर., हि जमिन मिळकत

दिनांक : १५/०६/२०२६

अशिलांची सही

**अॅड. समीर सुरेश नाईक**
जिल्हा न्यायालय रायगड-अलिबाग
ऑफिस पत्ता: फ्लॅट नं.१०३, पहिला मजला,
बी विंग, मोरेश्वर अपार्टमेंट
जे.एस.एम कॉलेज जवळ, अलिबाग-रायगड
मोबा. ९७६७०१०९०२

## ग्रुप ग्रामपंचायत नागांव

**मु. पो. नागांव, ता. अलिबाग, जि. रायगड, पिन - ४०२ २०४**

जावक क्र. - दिनांक-

**जाहिर नोटीस**

महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५९ व कर व फी (शुल्क) १९६० नुसार खालील मालमत्तेच्या नावे संबंधाने ग्रुप ग्रामपंचायत नागांव कडे प्राप्त झालेल्या मालमत्ता धारकांच्या परत्वे १६ अ मधील नियमाप्रमाणे सदर संदर्भाने कोणत्याही हित संबंधाने हरकत अगर आक्षेप असल्यास सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत हित संबंधाच्या व हरकतीच्या लेखी पुराव्यासह ग्रुप ग्रामपंचायत नागांव कडे लेखी स्वरुपात हरकत नोंदवावी अन्यथा करवसुलीच्या सोयीसाठी सदर हस्तांतर करून दप्तरी या बाबतची नोंद घेतली जाईल.

| क्र | गावाचे नांव | घर क्रमांक | असेसमेंट दप्तरी असलेल्या घर मालकाचे नाव | नवीन नोंद करावयाचे घर मालकाचे नाव |
|---|---|---|---|---|
| | सुखी गल्ली | ३३५८ | अतुल विष्णुपंत पिसाळ वगैरे दोन | सानिया संजय वेंगुर्लेकर |
| | सोनारपेठ | ५८९ | सुनंदा नंदकिशोर क्षीरसागर वगैरे तीन | रोहन नारायण रेडकर |
| | नागाव बंदर | ३१८२ | स्मिता गोविंद आपटे वगैरे दोन | सुयोग गोविंद आपटे |
| | बागमळा | २९२९ | दर्शना अरुण घरत | ज्योती राजेंद्र पिळणकर राजेश बाळकृष्ण पिळणकर |
| | खारगल्ली | ९४० | इरफान अब्बास हुसेन | सुचिता उमेश साळुंके सिद्धेश उमेश साळुंके |
| | कवळे पारोडा | १५८७ | शलाका सुधीर पवार | अजय रघुनाथ मापुस्कर |
| | बागमळा | १००८ ब | राजेंद्र पांडुरंग पारकर | प्रवीण प्रभाकर पडते |

सही/-
**सौ.हर्षदा निखील मयेकर**
सरपंच
ग्रुप ग्रामपंचायत नागांव

## SRM E–TENDER NOTICE (SECOND CALL)

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website **https://srmetender.mahatransco.in** for the following Tender specification.

| Sr. No. | Tender / Notice No. | Particulars of Tender | Estimated Cost of Tender |
|---|---|---|---|
| 1 | **Tender No:- EE/EHV (O&M)/DIVN/MHD/ Tech/E-Tender-13/ IInd Call / 2026-27 Dtd.13.06.2026 RFx No. 7000040064** | **Sub:-** Second Call for SRM E-Tender for providing Closing and Tripping Coil for various makes of CB at 220 kV Kandalgaon Ss,220 kV Vilebhagad Ss,100 kV Roha and 100 kV Mhasala Substation under EHV (O&M) Division Mahad. | **Rs. 4,85,496/- (Including GST)** |

EMD will be the 1% of the estimated cost or 5000/- whichever is the highest & tender fee will be the 500/- + GST. Bid submission is from **13.06.2026 @ 00:00 hrs to 22.06.2026 @23:59 Hrs** for above tender. For further details visit our website:- **https://srmetender.mahatransco.in.**

**Contact Person:-** The Addl. Executive Engineer, (O) : Phone No.8793505100

**Note:** All eligible Suppliers / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL

**Sd/-**
**Executive Engineer**
**EHV (O&M) Dn, Mahad**

## जाहिर नोटीस

सर्व जनतेस कळविण्यांत येते की, आमचे अशिलांनी मौजे वढाव खुर्द, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेली मिळकत मिळकतीचे विद्यमान मालक सतीश राजाराम वर्तक यांचेकडून विकत घेण्याची ठरविलेली आहे. सदरची मिळकत निर्वेध व बोजाविरहीत असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी आमचे अशिलास दिलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पैसे) |
|---|---|---|---|
| वढाव खुर्द ता.अलिबाग जि.रायगड | १ | क्षेत्र ०.२०.०० पो.ख.०.००.०० एकूण ०.२०.०० | ५.०५ |

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, लिज, फरोक्त, साठेकरार, कोर्टात दावा, मृत्यूपत्र, अखत्यारपत्र, भागिदारी, वहिवाट, पोटगी, करार-मदार, विसार पावती, वारसा हक्क, वहिवाटीचा जाण्या-येण्याचा मार्ग, आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी हि नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांचे मुदतीत खालील सही करणार खरेदीदारांतर्फे अॅडव्होकेट यांचेकडे लेखी कळवावे. येणेप्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व विनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पुर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग.
दिनांक : १५/०६/२०२६

**अॅड. विजय अनंत पेढवी**
श्रीकृपा, मु.नांदाईपाडा, पो. झिराड,
ता.अलिबाग, जि.रायगड.
मो. नं. ९८२२१८६७४०

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस कळविण्यात येते की, मौजे आमली, ता. मुरूड जि.रायगड येथील खालील नमुद असलेली जमिन मिळकत. सदर मिळकतीचे विद्यमान मालक जगदीश जनार्दन जोशी यांनी विक्री व्यवहारास काढलेली आहे. सदरची मिळकत ही निर्वेध व बोजाविरहित असल्याचा भरोसा आमचे अशिल प्रीतम प्रभाकर दळवी यांस विद्यमान मालक यांनी दिला असून सदर मिळकतीशी विक्री व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्याची खातरजमा करणेकामी जाहिर नोटिस प्रसिद्ध करण्याचे काम आमच्याकडे दिलेले आहे. त्या संबंधीत मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट क्रमांक | क्षेत्र हे.आर | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| आमली ता.मुरुड | ११३ | ०-१६-०० | २.१३ |

वर वर्णन केलेली मिळकत या जाहिर नोटिसचा विषय आहे.

तरी वरील मिळकतीच्या संदर्भात इतर कोणाचीही गहाण, दान, बक्षिस, लीज, फरोक्त, पोटगी, साठेकरार वहिवाटीचे येणेजाणेचे मार्ग, वारसहक्क आदी कोणत्याही प्रकारचे हक्क व हितसंबंध असल्यास वा त्यांचे वरील मिळकतीच्या सदर विक्री व्यवहारास कोणाचीही हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या मुदतीत खालील सही करणारे यांच्याकडे कळवावी. येणेप्रमाणे सदर विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदरचे मिळकतीचा व्यवहार पुर्ण करतील. व त्यानंतर मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची तमाम जनतेने नोंद घ्यावी हे कळावे.

दि. १५/०६/२०२६

**अॅड. मोहनिश मनोहर ठाकुर**
रा. चिंचघर, पो.बोर्ली, ता.मुरूड, जि.रायगड
मो.नं. ८०८००१९११५

## जाहीर सूचना / सावधानतेची सूचना

सर्वसामान्य जनतेला याद्वारे सूचित करण्यात येते की, आमचे अशील (Client) यांनी चांगिबाई महादू भल्ला आणि इतर ३६ जणांविरुद्ध ("प्रतिवादी") मा. मुख्य दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, पनवेल यांच्यासमोर विशेष दिवाणी दावा क्र. १०२/२०२६ (Special Civil Suit No. 102 of 2026) दाखल केला आहे. या दाव्याद्वारे प्रतिवादींना खाली वर्णन केलेल्या जमिनींची विक्री करणे, हस्तांतरण करणे, त्यावर बोजा निर्माण करणे, ताबा सोडणे, अनोळखी/त्रयस्थ पक्षाचे हक्क निर्माण करणे, कोणताही सामंजस्य करार (MOU), करारनामा (Agreement), विकास करारनामा (Development Agreement), कुलमुखत्यारपत्र (Power of Attorney) करणे किंवा इतर कोणत्याही प्रकारे व्यवहार करण्यास मनाई करणारे मनाईहुकूम (injunctions) मागितले आहेत.

पुढे असे की, सदर जमिनींच्या संदर्भात दिनांक १५.०४.२०२६ रोजीची 'लिस पेंडन्स'ची सूचना (Notice of Lis Pendens - प्रलंबित दाव्याची नोटीस) दुय्यम निबंधक, पनवेल यांच्याकडे नोंदणीकृत करण्यात आली आहे.

सर्वसामान्य जनतेला याद्वारे पुढे सावध करण्यात येते की, उपरोक्त खटला प्रलंबित असतानाही, प्रतिवादी खाली वर्णन केलेल्या जमिनींविषयी व्यवहार करण्यासाठी त्रयस्थ पक्षांना प्रवृत्त करण्याचा प्रयत्न करीत आहेत. खाली वर्णन केलेल्या जमिनींच्या संदर्भात प्रतिवादींशी केलेला कोणताही व्यवहार सुरुवातीपासूनच शून्य व अवैध (null and void ab initio) असेल आणि तो आमच्या अशीलावर बंधनकारक असणार नाही.

सर्वसामान्य जनता, विकासक (developers), गुंतवणूकदार (investors), वित्तीय संस्था (financial institutions) आणि संबंधित सर्व व्यक्तींना याद्वारे सावध करण्यात येते की, त्यांनी खालील जमिनींच्या संदर्भात प्रतिवादींशी किंवा त्यांच्यामार्फत हक्क सांगणाऱ्या कोणत्याही व्यक्तीशी कोणताही व्यवहार किंवा व्यवस्था करू नये:

**जमिनींचे वर्णन**

**गाव** – नानोशी | **तालुका** – पनवेल | **जिल्हा** – रायगड

| अनु. क्र. | सर्वे क्र. | क्षेत्र (हेक्टर - आर - प्रति) |
|---|---|---|
| १. | १८ | ३-५८-०० |
| २. | २० | ९-८१-०० |
| ३. | ३५ | ७-८५-०० |
| ४. | ३६ | ८-२५-०० |
| | एकूण क्षेत्र | २९-४९-०० |

उपरोक्त जमिनींच्या संदर्भात कोणतीही विक्री, हस्तांतरण, विकास करार, सामंजस्य करार (MOU), बोजा निर्माण करणे, त्रयस्थ पक्षाचे हक्क निर्माण करणे किंवा इतर कोणताही व्यवहार हा विशेष दिवाणी दावा क्र. १०२/२०२६ च्या निकालाच्या अधीन राहील आणि तो आमच्या अशीलावर बंधनकारक असणार नाही. आमचे अशील कायद्यानुसार उपलब्ध असलेले सर्व कायदेशीर हक्क आणि उपाय राखून ठेवत आहेत.

दिनाकं १६ जून २०२६ रोजी

**दीपा बिश्त**
**अॅडव्होकेट**
पत्ता: ३ रा मजला, सुनामा हाऊस,
१४० ऑगस्ट क्रांती मार्ग, शालिमार हॉटेलच्या समोर,
कॅम्प्स कॉर्नर, मुंबई – ४०० ०२६.
ईमेल: adv.deepabisht@gmail.com

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टा मध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकाकडुन आमचे अशिलांनी कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्या पासून १४ (चौदा) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

**मौजे - पाचखडकवाडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रूपये | आकार पैसे |
|---|---|---|---|---|---|
| निरज नाथ | २२ | ३ | ०-६६-०० | ० | ३१ |
| सुनिल रामराव पारसकर | | यापैकी विक्री केलेले क्षेत्र हे ० आर ३३ पॉ ३७ मात्र. | | | |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

कार्यालयीन पत्ता :- मु. पो. कशेळे,
कर्जत - मुरबाड रोड, सरकारी दवाखान्या समोर,
ता. कर्जत, जि. रायगड. ४१०२०१

सही/-
**अॅड. भुपेश तानाजी पेमारे**
मो. नं. ९१५८२७७७२८
दिनांक :- १६/०६/२०२६

---

दि. २४/०४/२०२६. अर्जदारतर्फे वकील अॅड.एस.के.वाकडे

**अलिबाग येथील सिव्हील जज्ज सिनिअर डिव्हिजन यांचे कोर्टात.**

दिवाणी चौकशी अर्ज.६१/२०२६

श्रीमती. मालती यशवंत नाईक
वय - ७९ वर्षे, धंदा-गृहिणी,
रा. परे गल्ली, नवा पाडा, पो.नागांव,
ता.अलिबाग, जि.रायगड. — अर्जदार

**विरुद्ध**

१) श्री. गणेश यशवंत नाईक,
वय ४८ वर्षे, धंदा-शेती व नोकरी,
रा. परे गल्ली, नवा पाडा, पो.नागांव,
ता. अलिबाग, जि. रायगड.
२) श्री. भरत यशवंत नाईक,
वय ५९ वर्षे, धंदा-शेती व नोकरी,
रा.परे गल्ली, नवा पाडा, पो.नागांव,
ता.अलिबाग, जि.रायगड.
३) सौ. श्रेया चंद्रकांत नाईक
(पुर्वीची अलका यशवंत नाईक),
वय ५० वर्षे, धंदा- गृहिणी,
रा. परे गल्ली, नवा पाडा, पो.नागांव,
ता. अलिबाग, जि. रायगड.
४) श्री. विनय प्रल्हाद दळवी
वय २६ वर्षे, धंदा-गृहिणी,
रा.नवेनगर, कुरुळ, पो.कुरुळ,
ता.अलिबाग, जि.रायगड.
५) सौ. तेजल संकेत पाटील
वय २८ वर्षे, धंदा-गृहिणी,
रा. नवेनगर, कुरुळ, पो. कुरुळ,
ता.अलिबाग, जि.रायगड.
६) सौ.प्रभा सुरेश वैद्य,
(पुर्वीची प्रभा यशवंत नाईक)
वय ५७ वर्षे, धंदा-गृहिणी,
रा.८, महालक्ष्मी सोसायटी,
९ दुर्गा सॉ मीलच्या मागे,
हरणी कॉलनी, वडोदरा,
गुजरात ३९००२२. — सामनेवाले

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

अर्जदार यांचे पती व सामनेवाले नं.१ ते ३ व ६ चे वडील व सामनेवाले नं.४ व ५ यांचे आजोबा श्री.यशवंत गणपत नाईक हे दि.०५/०९/२०२४ रोजी मयत झालेले आहेत. कै. यशवंत गणपत नाईक नावे असलेल्या खालील वर्णनाच्या मिळकतीसंदर्भात अर्जदार यांनी वारस असल्याबाबतचा दाखला मिळण्याकरीता बॉम्बे रेग्युलेशन अॅक्ट VIII ऑफ १८२७ अन्वये या न्यायालयाकडे अर्ज केलेला आहे.

**अ) घर मिळकतीचे वर्णन :**

| मौजे | ग्रापमपंचायत | घर नं. | क्षेत्र (चौ. फूट) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|---|
| नागांव, ता.अलिबाग, जि.रायगड | नागांव | ११५५ | ६०० (५५.७६ चौ.मी.) | ५४० |

**ब) जमिन मिळकतीचे वर्णन:**

| मौजे | गट नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| नागांव, ता.अलिबाग, जि.रायगड. | ११४२ | ०-२२-७० | ५.२९ |

एकूण क्षेत्र ०-२२-७० हे.आर. पैकी ०-०७-० हे.आर. इतक्या क्षेत्राची मिळकत.

आणि ज्याअर्थी, सदर अर्जदार यांनी दाखल केलेल्या अर्जाबाबत कोणासही कसल्याही प्रकारचे म्हणणे वा हरकत दाखल करण्याची असल्यास अशा लोकांनी दि.१९/०६/२०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता न्यायालयात स्वतः अगर त्यांच्या कायदेशीर प्रतिनिधी मार्फत हजर राहून आपले म्हणणे दाखल करावे. दि. १९/०६/२०२६ रोजी अगर तत्पूर्वी सदर वारस दाखला देणेबाबत अर्जास कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदारास वारस दाखला देण्यात येईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

आज दिनांक २४ माहे एप्रिल २०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

सही/- **लिपीक** **दिवाणी न्यायालय व स्तर** **अलिबाग-रायगड.**

सही/- **अधिक्षक** **दिवाणी न्यायालय क. स्तर** **अलिबाग-रायगड.**

---

दि. २४/०४/२०२६. अर्जदारतर्फे वकील अॅड.एस.के.वाकडे

**अलिबाग येथील सिव्हील जज्ज सिनिअर डिव्हिजन यांचे कोर्टात.**

दिवाणी चौकशी अर्ज. ६२/२०२६

श्रीमती. मालती यशवंत नाईक
वय - ७९ वर्षे, धंदा - गृहिणी,
रा. परे गल्ली, नवा पाडा, पो. नागांव,
ता. अलिबाग, जि. रायगड. — अर्जदार

**विरुद्ध**

१) श्री. गणेश यशवंत नाईक,
वय ४८ वर्षे, धंदा-शेती व नोकरी,
रा. परे गल्ली, नवा पाडा, पो. नागांव,
ता. अलिबाग, जि. रायगड.
२) श्री. भरत यशवंत नाईक,
वय ५९ वर्षे, धंदा-शेती व नोकरी,
रा. परे गल्ली, नवा पाडा, पो. नागांव,
ता.अलिबाग, जि.रायगड.
३) सौ. श्रेया चंद्रकांत नाईक
(पुर्वीची अलका यशवंत नाईक),
वय ५० वर्षे, धंदा - गृहिणी,
रा. परे गल्ली, नवा पाडा, पो. नागांव,
ता. अलिबाग, जि. रायगड.
४) श्री. विनय प्रल्हाद दळवी
वय २६ वर्षे, धंदा - गृहिणी,
रा. नवेनगर, कुरुळ, पो. कुरुळ,
ता. अलिबाग, जि. रायगड.
५) सौ. तेजल संकेत पाटील
वय २८ वर्षे, धंदा - गृहिणी,
रा. नवेनगर, कुरुळ, पो. कुरुळ,
ता. अलिबाग, जि. रायगड.
६) सौ. प्रभा सुरेश वैद्य,
(पुर्वीची प्रभा यशवंत नाईक)
वय ५७ वर्षे, धंदा-गृहिणी,
रा.८, महालक्ष्मी सोसायटी,
९ दुर्गा सॉ मीलच्या मागे,
हरणी कॉलनी, वडोदरा,
गुजरात - ३९००२२. — सामनेवाले

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

अर्जदार यांचे पती व सामनेवाले नं.१ ते ३ व ६ चे वडील व सामनेवाले नं.४ व ५ यांचे आजोबा श्री. यशवंत गणपत नाईक हे दि.०५/०९/२०२४ रोजी मयत झालेले आहेत. कै. यशवंत गणपत नाईक नावे असलेल्या खालील वर्णनाच्या बँक खात्यासंदर्भात अर्जदार यांनी वारस असल्याबाबत सक्सेशन सर्टीफिकेट (वारस दाखला) मिळण्याकरीता इंडियन सक्सेशन अॅक्ट १९२५ कलम ३७२ प्रमाणे या न्यायालयाकडे अर्ज केलेला आहे.

**बँक खात्याचे वर्णन**

| बँकेचे नांव | अकाऊंट नंबर | रक्कम | खातेदाराचे नांव |
|---|---|---|---|
| बँक ऑफ इंडिया, नागांव, | १२१०१०११०००२५८७ | १,३३,१९३/- | यशवंत गणपत नाईक |

आणि ज्याअर्थी, सदर अर्जदार यांनी दाखल केलेल्या अर्जाबाबत कोणासही कसल्याही प्रकारचे म्हणणे वा हरकत दाखल करण्याची असल्यास अशा लोकांनी दि. १९/०६/२०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता न्यायालयात स्वतः अगर त्यांच्या कायदेशीर प्रतिनिधी मार्फत हजर राहून आपले म्हणणे दाखल करावे. दि. १९/०६/२०२६ रोजी अगर तत्पूर्वी सदर सक्शेशन सर्टीफिकेट (वारस दाखला) देणेबाबत अर्जास कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदारास सक्शेशन सर्टीफिकेट (वारस दाखला) देण्यात येईल याची सर्वांनी दयावी.

आज दिनांक माहे एप्रिल २०२६ रोजी माझ्या सहीनिशी वन्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

सही/- **लिपीक** **दिवाणी न्यायालय व स्तर** **अलिबाग- रायगड.**

सही/- **अधिक्षक** **दिवाणी न्यायालय क. स्तर** **अलिबाग- रायगड.**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की, आमचे अशिल १) श्री. अतुल मारुती माळी २) श्री. निलेश मारुती माळी ३) श्री. प्रशांत मारुती माळी ४) श्री. विलास दत्तात्रेय भोईर खालील वर्णन केलेली जमिन मिळकत तीचे विद्यमान मालक श्री. वासुदेव किसन चौधरी व सत्यवान सुकऱ्या म्हात्रे यांचे कडून विकत घेण्याचे ठरवीले आहे.

**मिळकतीचे वर्णन मौजे. कळंब, ता. कर्जत, जि. रायगड.**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| १११ | १ | १-५७-५० | १-६७ |

वरील विद्यमान मालक श्री.वासुदेव किसन चौधरी व सत्यवान सुकऱ्या म्हात्रे यांचे हिस्सेमधील वरील मिळकतीमधील (खाते क्रं.१४४५) क्षेत्र १-५७-५० हे.आर. गुंठे मिळकत खरेदीखताने देत आहेत.

तरी वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचा साठेकरार, खरेदीखत, ताबा कब्जा, वहीवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, लिज, वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास हि जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून चौदा दिवसांचे आत खालील सही करणार अॅडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही.

कळावे

दि. १६/०६/२०२६

**अॅड. अजय दत्तात्रेय भोईर**
पत्ता पोही, कळंब, कर्जत,
ता. कर्जत, जि. रायगड
मो.-८१४९६५७५३२.

# कर्जतमध्ये पाणीटंचाईच्या झळा तीव्र

## •जलसाठे कोरडे •२८ ठिकाणी शासनाच्या टँकरमधून पाणी

**| नेरळ | प्रतिनिधी |**

कर्जत या दुर्गम आणि आदिवासी भागाने तयार झालेली तालुक्यात पिण्याच्या पाण्याची टंचाई वाढली आहे. शासनाचे १४ टँकर कर्जत तालुक्यात पाणी टंचाई दूर करण्यासाठी फिरत आहेत.मात्र तरीदेखील अनेक लोकांना पाण्याचे पाणी आणण्यासाठी वणवण करावी लागत आहे.

तालुक्यात एका बाजूला डोंगरी भाग, त्यात आदिवासी भाग तर तालुक्याच्या मध्यभागातून वाहणारी पेज आणि उल्हास नदी या बारमाही वाहत्या नद्या सोडल्या तर अन्य सर्व भागातून वाहणाऱ्या नद्या कोरड्या पडल्या आहेत. तालुक्याच्या भौगोलिक स्थितीमुळे सर्वत्र भूजल पातळी खालावली असून तालुक्यात पाणीटंचाई लक्षात घेऊन कृती आराखडा राबविला जात आहे. कर्जत पंचायत समितीचे गटविकास अधिकारी आणि तहसीलदार यांच्याकडून कर्जत तालुका पाणीटंचाई कृती आराखडा अंमलबजावणी सुरू आहे.




गतवर्षी तालुक्यात रेल्वे पट्ट्यात पाणीटंचाईची झळ बसली आणि त्यानंतर उमरोली ग्रामपंचायत मधील आषाणे येथे गावात पहिला टँकर सुरू झाला.यावर्षी देखील याच ठिकाणी शासनाचा पहिला टँकर सुरू झाला आहे.त्यामुळे या ठिकाणी आणि तालुक्यात फेल ठरलेल्या जलजीवन मिशन कर्जत तालुक्यातील पाणी टंचाई वाढ करणाऱ्या ठरत आहेत.

### टँकरने पाणीपुरवठा होणारी गावे

आषाणे,कोषाणे,पळसदरी, पाथरज, मोगरज, खानंद आणि धामणी

### या आदिवासी वाड्यांना टँकरने पाणी

किरवली ठाकूरवाडी, सावरवाडी ठाकूरवाडी, पळसदरी ठाकूरवाडी, वर्णे ठाकूरवाडी, चिमटे वाडी, जांभूळवाडी, झुगरेवाडी, किरवली, पेटारवाडी, लोभेवाडी, पिंगळस, फणसवाडी, भक्ताचीवाडी, सराईवाडी, पाच खडकवाडी, मोहपाडा, मेचकरवाडी, धोत्रेवाडी, बणाचीवाडी, रजपे कातकरीवाडी

रायगड जिल्हाधिकारी स्तरावर मागविण्यात आलेल्या निविदेनुसार कर्जत तालुक्यासाठी १४ टँकर मंजूर करण्यात आले आहेत. या प्रत्येक टँकरची क्षमता १४ हजार लिटर इतकी आहे. या टँकरद्वारे पाणीटंचाईग्रस्त गावे आणि वाड्यांना पाणीपुरवठा केला जात आहे. सध्या तालुक्यातील सात गावे आणि २२ वाड्यांमध्ये टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू आहे. पेज नदीमधून पाणी उचलून लोकांना पुरवठा करण्यात येत आहे. गटविकास अधिकारी सुशांत पाटील यांच्याकडे आलेली मागणी लक्षात घेऊन त्या टंचाईग्रस्त गावे आणि वाडी यांची पाहणी केली जाते आणि टँकर सुरू केला जातो. पाणीपुरवठा विभागाचे अभियांत्रिकी सहायक गणेश जाधव हे पेज नदीवर बसून टँकर भरून पाठवण्याचे तसेच प्रसंगी टँकर वेळेवर पोहचतो की नाही हे टँकर मध्ये लावलेले जी पी एस ट्रकर यांची पाहणी करून नियंत्रित करीत आहेत.

# संजय निकम यांना 'महाराष्ट्ररत्न'



**| पाली /बेणसे | प्रतिनिधी |**

संविधान अमृत महोत्सवाचे औचित्य साधून तेजस सेवा प्रतिष्ठान, संगमनेर या संस्थेच्या वतीने राज्यस्तरीय महाराष्ट्ररत्न पुरस्कार सोहळ्याचे भव्य आयोजन करण्यात आले होते. यामध्ये पनवेल तालुक्यातील जिल्हा परिषद शाळेत कार्यरत असणारे शिक्षक संजय दौलत निकम यांचा महाराष्ट्ररत्न पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला.

उत्तम गायक, सुलेखनकार, साहित्याची आवड असणारे आणि संविधान विषयक जनजागृतीमध्ये नेहमी अग्रेसर राहणारे व्यक्तिमत्त्व म्हणून त्यांची ओळख आहे. त्यांच्या या चौफेर कामगिरीची दखल घेऊन त्यांना या प्रतिष्ठेच्या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

हा पुरस्कार सोहळा माजी महसूल मंत्री बाळासाहेब थोरात, ज्येष्ठ विधिज्ञ संघराज रुपवते, ज्येष्ठ व्याख्याते प्रा. मुकुंद भारसाकळे, आमदार डॉ. किरण लहामटे, माजी पदवीधर आमदार सुधीर तांबे आणि आयोजक रवींद्र घोसाळे यांच्या प्रमुख उपस्थितीत आणि हस्ते संपन्न झाला. या प्रसंगी संजय निकम यांच्यासोबत त्यांच्या पत्नी आणि मुलगा स्वराज निकम यांचाही विशेष सन्मान करण्यात आला.

संविधान अमृत महोत्सवाच्या निमित्ताने राज्यभरातून अनेक संविधानप्रेमी या सोहळ्याला उपस्थित होते. याप्रसंगी संविधानाचा प्रचार आणि प्रसार करणारे प्रसिद्ध व्याख्याते प्राध्यापक मुकुंद भारसाखळे यांचे अभ्यासपूर्ण व्याख्यान पार पडले. महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांमधील प्रतिनिधींनी या कार्यक्रमाला हजेरी लावली होती. प्रत्येक जिल्ह्यातील एका गुणवंत व्यक्तीच्या कार्याचा आढावा घेऊन, त्यांच्या योगदानाचा सन्मान म्हणून हा महाराष्ट्ररत्न पुरस्कार प्रदान करण्यात आल्याचे आयोजकांनी सांगितले.

## नि|व|ड|क



### प्रकाश वाढवे पोलीस उपनिरीक्षकपदी

**रसायनी :** खालापूर पोलीस ठाण्यातील सपो उनि.गुप्तचर विभाग यांची पोलीस उप निरीक्षक पदी नेमणूक झाल्याने त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. पोलीस उपनिरीक्षक प्रकाश वाढवे हे अनेक वर्ष खालापूर तालुक्यात पोलीस दलात काम करीत असून गुप्तचर विभागात त्यांची नेमणूक आहे. पोलीस उप निरीक्षक पदी निवड होताच अप विभागीय पोलीस अधिकारी डॉ विशाल नेहुल, खालापूर पोलीस निरीक्षक सचिन पवार, खोपोली पोलीस निरीक्षक सचिन हिरे, रसायनी पोलीस निरीक्षक अभिजित भुजबळ, सपोनि. मोहन बहाडकर, सपोनि.भालेराव, पोलीस उप निरीक्षक शिवाजी जुंदरे,खालापूर पोलीस पाटील संघटनेचे अध्यक्ष अनंत ठोंबरे, खालापूर पोलीस ठाण्यातील अधिकारी, कर्मचारी यांनी त्यांचे अभिनंदन केले.

### स्मार्ट मीटरमुळे ग्राहकांच्या तक्रारी घट

**रायगड :** राज्यात महावितरणतर्फे आतापर्यंत १ कोटी २० लाख स्मार्ट मीटर बसविण्यात आले आहेत. स्मार्ट मीटरमुळे अचूक रिडिंग होते. राज्यात स्मार्ट मीटरचे प्रमाण वाढल्यानंतर ग्राहकांच्या वीजबिलाच्या तक्रारी खूप कमी झाल्या आहेत. स्मार्ट मीटर बसविल्यानंतर संबंधित ग्राहकाला मोबाईल अ‍ॅपद्वारे दर तासाला त्याचा वीज वापर मोबाईल फोनवर समजतो. त्यामुळे वीजबिलाबाबत पारदर्शिता राहते. स्मार्ट मीटरमुळे मिळणाऱ्या माहितीच्या आधारे ग्राहकाला त्याच्या वीजवापरावर व वीजबिलावर नियंत्रण ठेवणे शक्य होते. स्मार्ट मीटरच्या अ‍ॅपद्वारे ग्राहकाला त्या घरात अथवा कार्यालयात अर्थिंगची समस्या अथवा वीजगळती होत असल्यास समजते. त्या माहितीचाही ग्राहकाला लाभ होतो. ग्राहकाने कोणत्या वेळेला किती वीज वापरली हे स्मार्ट मीटरमुळे समजते. त्या आधारे घरगुती वीज ग्राहकांना सकाळी ९ ते सायंकाळी ५ या वेळेत वापरलेल्या विजेसाठी प्रती युनिट ८५ पैसे सवलत मिळते. याशिवाय मोबाईल अ‍ॅपद्वारे बिल भरल्यास डिजिटल पेमेंटची सवलत आणि गो ग्रीनची दरमहा दहा रुपये सवलत मिळते.

### पोलिसांच्या वाहनाला दुचाकीची धडक

नवीन पनवेल : पोलिसांच्या वाहनाला दुचाकीने धडक दिली. या झालेल्या अपघातात दुचाकी वरील दोघेजण जखमी झाले. या अपघाता प्रकरणी ईशान राजीव (वय २० वर्ष, राहणार सेक्टर १७, रोडपाली) याच्या विरोधात कळंबोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस हवालदार अजय मोरे हे दहशतवाद विरोधी पथक नवी मुंबई येथे कार्यरत आहेत. ते त्यांच्या ताब्यातील वाहन क्रमांक एम एच ०१ ई एन ६४४२ हे लोटस हॉस्पिटल, रोडपाली येथील टी पॉईंट येथे वळण घेऊन पोलीस मुख्यालयाकडे जात होते. यावेळी ईशान याने मोटरसायकल क्रमांक एम एच ४६ सीएस ०१४१ ही फुडलँड सिग्नल कडून पुरुषार्थ ब्रिजकडे जाणाऱ्या रोडवर स्पीड ब्रेकरकडे दुर्लक्ष करून वेगाने चालवली. सरकारी वाहनाला समोरील बाजूने ठोकर मारली. या अपघातात ईशान राजीव आणि त्याच्या पाठीमागे बसलेली श्रीया गोरे ही जखमी झाली. या अपघातात पोलिसांच्या वाहनाचे नुकसान झाल्याचे पोलिसांनी सांगितले.



### मनसेचा 'सूचना व तक्रार पेटी' उपक्रम

**पनवेल ग्रामीण :** महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त महाराष्ट्र नवनिर्माण सेना, कळंबोली शहराच्या वतीने राबविण्यात आलेल्या 'सूचना व तक्रार पेटी' या उपक्रमाचे उद्घाटन उत्साहात पार पडले. या उपक्रमाचे उद्घाटन पनवेल महानगर अध्यक्ष योगेश चिले, महानगर सचिव पराग बालड आणि उल्हासराव कदम यांच्या हस्ते करण्यात आले. हनुमान मंदिर, सेक्टर-२ येथून उपक्रमाची सुरुवात करण्यात आली. त्यानंतर कळंबोली शहरातील विविध प्रभागांमध्ये सूचना व तक्रार पेट्या ठेवून नागरिकांच्या समस्या, सूचना आणि तक्रारी संकलित करण्यात आल्या. या उपक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. रस्ते, पाणीपुरवठा, ड्रेनेज, वीज, स्वच्छता तसेच इतर नागरी सुविधांबाबत अनेक नागरिकांनी आपल्या सूचना व तक्रारी नोंदवल्या. प्राप्त झालेल्या तक्रारी संबंधित विभागांकडे पाठपुरावा करून मार्गी लावण्यात येणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली. यावेळी मनसेचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या उपक्रमाचे आयोजन कळंबोली शहर अध्यक्ष राहुल शिरीष चव्हाण यांनी केले होते.

# पनवेलमध्ये मनसेकडून वृक्षारोपण

## औषधी वृक्षांच्या लागवडीतून पर्यावरण संवर्धनाचा संदेश

**| पनवेल | प्रतिनिधी |**

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त पनवेल महानगर महिला आघाडीच्या वतीने पनवेल व नवीन पनवेल परिसरात वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. पनवेल महानगर अध्यक्ष स्वरूपा सुर्वे यांच्या पुढाकाराने हा उपक्रम राबविण्यात आला.

राजसाहेब ठाकरे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यासाठी विविध औषधी व पर्यावरणपूरक वृक्षांची लागवड



करण्यात आली. विशेषतः कडूलिंब, जांभूळ यांसारख्या औषधी गुणधर्म असलेल्या झाडांचे रोपण करून हरित पर्यावरणाच्या जतनाचा संकल्प करण्यात आला.

या उपक्रमाद्वारे झाडे लावा, पर्यावरण वाचवा हा संदेश नागरिकांपर्यंत पोहोचविण्यात आला. वाढते प्रदूषण, बदलते हवामान आणि पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी वृक्षारोपणाचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले.

यावेळी पनवेल महानगर सचिव आशिता पाटील, नवीन पनवेल सचिव मनीषा देशमुख, नवीन पनवेल उपशहर अध्यक्ष मानसी सकपाळ, नवीन पनवेल उपशहर अध्यक्ष संदीप जाधव तसेच नवीन पनवेल विभाग अध्यक्ष अंकुर पाटील उपस्थित होते.

# साडीच्या आमिषाने दागिने केले लंपास

**नवीन पनवेल :** आमचे शेठ सरदार यांना दहा वर्षानंतर मुलगा झाला आहे, तुम्हाला साडी भेटली का? असे सांगून महिलेच्या गळ्यातील दागिने फसवून नेल्याप्रकरणी तिघांविरोधात कळंबोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. मंगल कोरडे सावंत फ्लोअर मिल येथे दळण टाकून घरी परत जात होत्या. यावेळी तीन अनोळखी इसमानी त्यांना गाठले आणि आमचे शेठ सरदार यांना दहा वर्षानंतर मुलगा झाला आहे तुम्हाला साडी भेटली का असे सांगून त्यांना कळंबोली येथे घेऊन गेले. या ठिकाणी त्यांची दिशाभूल करून त्यांच्याकडील सोन्याचे दागिने घेऊन ते पळून गेले.

# नावंढे ग्रामपंचायत निवडणुकीची प्रभाग निहाय आरक्षण सोडत जाहीर

**| खोपोली | प्रतिनिधी |**

नावंढे ग्रामपंचायतीवर गेल्या तीन वर्षापासून प्रशासक बसल्याने येथील निवडणूक केव्हा लागणार याकडे साऱ्यांचे लक्ष लागून राहिले होते. तर अनेक जण प्रभाग निहाय आरक्षण सोडतीकडे लक्ष लागून राहिले असता गेल्या ३ वर्षापासून अनेक जण निवडणुकीसाठी मोर्चेबांधणी करत असताना १२ जून रोजी प्रभाग निहाय आरक्षण सोडतीने अनेकांची हिरमोड केल्याने या ग्रामपंचायतीमधील बहुसंख्य भावी सदस्य हे भावी राहणार हे मात्र निश्चित बनल्याने येथील निवडणुकीत सर्वसामान्य नागरिकाला का? घराणेशाहीला पसंती देणार याकडे साऱ्यांचे लक्ष लागून राहिले आहे.

बहुचर्चित नावंढे पंचायतमध्ये निवडणुकीत २९०७ मतदार मतदानाचा हक्क बजावणार असताना येथील निवडणूक केव्हा लागणार याकडे भावी उमेदवारांसह मतदारांचे लक्ष लागून राहिले असताना प्रभाग निहाय आरक्षण सोडत १२ जून रोजी जाहीर झाली असता यामध्ये ११ जागांसाठी सर्वसाधारण पुरुष तीन व महिला तीन, नामप्र पुरुष एक व महिला एक, अनुसूचित जमाती पुरुष एक व महिला दोन असे आरक्षण जाहीर झाल्याने अनेक भावी उमेदवारांची या आरक्षण सोडतीने हिरमोड झाल्याचे पाहायला मिळाले.

# रोहा बस स्थानकाची दुरवस्था




**| चणेरा | प्रतिनिधी |**

■ प्रवाशांचे हाल
■ पंखे गायब
■ नागरिक त्रस्त

तालुक्याचे प्रमुख वाहतूक केंद्र म्हणून ओळखल्या जाणाऱ्या रोहा बस स्थानकाचा कारभार सध्या अक्षरशः रामभरोसे सुरू असल्याचे चित्र समोर आले आहे. राज्यभर उन्हाचा पारा चाळीशीच्या पुढे गेला असताना रोहा बस स्थानकात प्रवाशांसाठी आवश्यक असलेल्या मूलभूत सुविधांचा पूर्णपणे बोजवारा उडाल्याचे दिसून येत आहे. एकीकडे उकाड्याने हैराण झालेले प्रवासी तर दुसरीकडे अस्वच्छता, दुर्गंधी आणि गैरसोयींमुळे संतप्त झाल्याचे चित्र आहे.

बस स्थानकातील प्रवासी प्रतीक्षागृहात बसविण्यात आलेल्या पंख्यांपैकी तब्बल दोन पंखे गायब असल्याचे निदर्शनास आले आहे. या ठिकाणी नवीन पंख्यांची व्यवस्था करण्यात आलेली नसल्याने कडक उन्हात प्रवाशांना घामाच्या धारांमध्ये बसची प्रतीक्षा करावी लागत आहे. हे पंखे चोरीला गेले की नादुरुस्त झाल्याने काढून टाकण्यात आले, याबाबत प्रशासनाकडून कोणतीही स्पष्ट माहिती दिली जात नसल्याने प्रवाशांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

याहूनही गंभीर बाब म्हणजे बस स्थानक परिसरात सांडपाण्याचा योग्य निचरा होत नसल्याने घाण पाणी उघड्यावर वाहत आहे. त्यामुळे संपूर्ण परिसरात असह्य दुर्गंधी पसरली असून डास, माशा आणि विविध संसर्गजन्य आजारांचा धोका वाढला आहे. स्वच्छ भारत, सुंदर भारतच्या घोषणा केवळ फलकांपुरत्याच मर्यादित राहिल्या असून प्रत्यक्षात बस स्थानकात घाणीचे साम्राज्य निर्माण झाल्याची प्रतिक्रिया प्रवाशांकडून व्यक्त होत आहे.

रोहा हे तालुक्याचे मुख्य ठिकाण असल्याने दररोज हजारो प्रवासी या बस स्थानकातून प्रवास करतात. मात्र त्यांना अपेक्षित सुविधा मिळण्याऐवजी विविध गैरसोयींचा सामना करावा लागत आहे. शौचालय परिसरातून येणारी दुर्गंधी, फेरीवाल्यांचा वाढता वावर, सर्वत्र साचलेली घाण, अस्वच्छ वातावरण तसेच रात्रीच्या वेळी अपुऱ्या प्रकाश व्यवस्थेमुळे प्रवाशांची मोठी गैरसोय होत आहे.

# आमिष दाखवून दागिने पळवले

**नवीन पनवेल :** महिलेला दोन अनोळखी इसमानी कपडे, पैसे आणि खाऊ देण्याचे आमिष दाखवले आणि त्यांच्या गळ्यातील सोन्याचे दागिने आणि रोख रक्कम चोरून नेली. या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला. रामूबाई घरत या बाजार खरेदीसाठी आल्या होत्या. यावेळी दोन अनोळखी इसमानी त्यांना कपडे, पैसे आणि खाऊ देण्याचे आमिष दाखवले आणि त्यांच्या गळ्यातील दागिने पिशवीत काढण्यास सांगितले आणि बिस्कीट पुडे पिशवीत ठेवण्याच्या बहाण्याने पिशवीतून त्यांचे दागिने आणि पैसे काढून घेऊन फसवणूक केली.

# गारमाळ धनगरवाडा ग्रामस्थांचे उपोषण मागे

**| खोपोली | प्रतिनिधी |**



चावणी ग्रामपंचायत हद्दीतील गारमाळ धनगरवाडा येथील ग्रामस्थांचे रस्त्यासाठी चावणी ग्रामपंचायत आणि हिरानंदानी कंपनी विरोधात उपोषणकर्ते मारुती शेडगे आणि ग्रामस्थांनी आजपासून आमरण उपोषण चालू केले होते, गेल्या अनेक वर्षापासून या वाड्याकडे जाण्यासाठी पक्का रस्ता नसल्याने येथील ग्रामस्थांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे, त्यामुळे चावणी ग्रामपंचायत आणि हिरानंदानी कंपनी विरोधात आमरण उपोषण चालू केले होते याची गंभीर दखल चावणी ग्रामपंचायतने घेतली असून चावणी ग्रामपंचायतने लेखी आश्वासन ग्रामस्थांना दिल्याने त्यांनी अखेर उपोषण मागे घेतले आहे

गारमाळ धनगरवाडा येथे धनगर समाजाची गेल्या अनेक वर्षांपासून वस्ती आहे मात्र या गावाकडे जाण्यासाठी आजही पक्का रस्ता नाही तर पावसाळ्यात येथील ग्रामस्थांना पायपीट करत शाळेतील लहान मुले, गरोदर महिला यांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे

त्यामुळे दिवसेंदिवस होणाऱ्या नाहक त्रासाला कंटाळून येथील ग्रामस्थ मारुती शेडगे यांच्या नेतृत्वाखाली येथील ग्रामस्थ आणि महिला येथील रस्त्यावर बसून आमरण उपोषणाला बसले होते.

# उरणला महागाई विरोधात मोर्चा

**| चिरनेर | प्रतिनिधी |**

उरण शहरात चार फाटा ते गांधी चौक असा रविवारी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या वतीने महागाई विरोधात मोर्चा काढण्यात आला होता. या महागाई विरोधाच्या मोर्चात रोजी रोटी दे न सके ओ सरकार निकम्मी है, ओ सरकार बदलनी है, व ओ सरकार बदलनी है म्हणत सरकारच्या सर्वसामान्य जनता विरोधी धोरणांवर हल्ला केला.

वाढती प्रचंड महागाई कमी करा, गॅस,डिझेल, पेट्रोलची दरवाढ मागे घ्या,लाल बावटे की जय आदी जोरदार घोषणाबाजी करीत हा मोर्चा गांधी चौकात आल्यानंतर येथे निदर्शने करण्यात आली. यावेळी कामगार नेते कॉ. भूषण पाटील, हेमलता पाटील, संजय ठाकूर यांची




यथोचित भाषणे झाली.

देशात बारा वर्षांपासून भाजपा आणि पंतप्रधान मोदींची सत्ता आहे. या सत्ता काळात वाढत्या महागाई, बेरोजगारी, पेपर फुटीने दरवर्षी विद्यार्थ्यांचे आयुष्य उध्वस्त होत असल्याचा त्याचप्रमाणे यामुळे सर्वसामान्य कामगार, कष्टकरी, मागास आणि आदिवासी यांच्या जगण्याचा हक्क हिरावून घेणारी धोरणे राबविणे सुरू आहे. २०१४ ला जनतेला बहुत हुई महंगाई की मार चा नारा देत भ्रष्ट काँग्रेसपासून सुटका करीत अच्छे दिन आणण्याचा वादा केला होता. प्रत्यक्षात मात्र या बारा वर्षात गॅस सिलेंडर ४५० वरून ९५० रुपयांवर म्हणजे दुपटीने वाढला आहे. यात आणखी वाढ होण्याची शक्यता आहे. तर दुसरीकडे सर्वसामान्य जनतेच्या महागाईत थेट वाढ करणाऱ्या पेट्रोल डिझेलने शंभरी पार केली आहे. शेतकऱ्यांना शेतीवरून हुसकावून लावून भूमिहीन यामुळे कोकण किनारपट्टीवरील स्थानिक भूमीपुत्र नष्ट करण्याचा डाव आखला जात आहे. या सर्व परिस्थितीचा समाचार यावेळी घेण्यात आला. या मोर्चात महिला, कामगार तसेच तरुणही सहभागी झाले होते. मोर्चात मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष, सीआयटीयु कामगार संघटना, जनवादी महिला संघटना, डीआयएफआय युवक संघटना, किसान सभा या संघटना सहभागी झाल्या होत्या.

## आदिवासी वाड्यांवर पोहोचवली शिक्षण गंगा | पाच जिर्णोद्धारीत शाळा झाल्या पूर्ण

# अतिदुर्गम शाळांसाठी 'सारथी'चा पुढाकार

**| महाड | प्रतिनिधी |**

रायगड किल्ल्याच्या कुशीत वसलेल्या निजामपूर या अति दुर्गम आदिवासी भागात आदिवासींचे मोठ्या वस्तीचे दोन पाडे आहेत. मूलभूत सुविधांपासून कोसो दूर असणाऱ्या ह्या सर्व पाड्यांवर सारथी फाऊंडेशन गेली अनेक वर्षे कार्यरत आहे. गेल्याच महिन्यात चोवीस मे रोजी खालच्या आदिवासी पाड्यावर आदिवासी बांधवांना नूतन इमारत राजश्री महादेव सामंत यांच्या आर्थिक सहायातून बांधून देण्यात आली होती. आता दुसऱ्या वरच्या आदिवासी भागात जुन्या मोडकळीस आलेल्या शाळेचा जीर्णोध्दारे शहाजीराव आणि रेखा सवदे यांच्या योगदानातून सारथी फाऊंडेशन मार्फत पार पडले आहे.



सदरच्या शाळेचे उद्घाटन सोहळा नुकताच तेरा जून रोजी माजी आमदार आणि माजी राज्यमंत्री रमेश शेंडगे यांच्या शुभ हस्ते करण्यात आले.

तालुका महाड, जिल्हा रायगड येथील या धरणग्रस्त पाड्यावर गेली सत्तावीस वर्षे अनेक आदिवासी कुटुंबे वास्तव्यास आहेत. एवढ्या दीर्घ काळातही येथे मूलभूत सुविधा आणि शैक्षणिक सोयींचा कायम अभाव राहिला. पूर्वीची शाळा इमारत पूर्णपणे जीर्ण अवस्थेत होती. छोट्या व तात्पुरत्या खोल्यांमध्ये मुलांना दाटीवाटीने बसावे लागत होते. १९५६ रोजी बांधण्यात आलेली ही शाळा वादळी वाऱ्यात थेट धोकादायक बनत होती. या परिस्थितीचा थेट फटका विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला बसत होता. रायगड जिल्ह्यात गेली चाळीस वर्षे दुर्गम भागात निस्वार्थपणे कार्यरत असलेले ज्येष्ठ समाजसेवक आणि सारथी फाऊंडेशनचे अध्यक्ष अशोक जंगले यांच्या निदर्शनास ही दयनीय परिस्थिती आली आणि त्यांनी या विद्यार्थ्यांसाठी नवीन, सुरक्षित व सुसज्ज शाळा उभारण्याचा निर्धार केला. त्यांच्या पुढाकाराने सारथी फाऊंडेशनच्या माध्यमातून आता येथे प्रशस्त वर्गखोली, वीज जोडणी, पंखे आणि ट्यूबलाईटसह सुसज्ज अशी नवी इमारत उभी राहिली आहे.या सोहळ्यास परिसरातील आदिवासी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. सारथी फाऊंडेशनचे अध्यक्ष अशोक जंगले, महेश चव्हाण, निलेश पवार, गौरव जंगले, लक्ष्मणराव व्हटकर, सखाराम डोईफोडे, रेखा सवदे, प्रभाकर सावंत, दीपक शेळके, हनुमंतराव साठे यांची उपस्थिती होती. यावेळी सर्व विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले.

## सोन्याच्या नावाने भानगड

आखाती युद्ध संपण्याची चिन्हे नाहीत. अधूनमधून अमेरिका व इराण कराराच्या जवळ आले अशा बातम्या येतात. पुन्हा हल्ले सुरु होतात. या युद्धाने भारतातील पेट्रोल व गैसच्या किमती वाढल्या आहेत. त्यातून महागाई भडकली आहे. त्यातच जून अर्धा गेला तरी पाऊस सुरू झालेला नाही. याचा परिणाम अन्नधान्य उत्पादनावर होणार आहे. शेतीच्या संदर्भात आणखी एक वाईट परिणाम होणार आहे. तो म्हणजे खताच्या टंचाईचा. नत्रयुक्त खतांच्या उत्पादनासाठी आवश्यक असलेला अमोनिया आणि युरिया मोठ्या प्रमाणावर पश्चिम आशियातील देशांत तयार होतो. इराण, कतार, सौदी अरेबिया आणि इतर आखाती देश जागतिक युरिया निर्यातीतील महत्त्वाचे पुरवठादार आहेत. जगातील सुमारे ३६ टक्के युरिया निर्यात आखाती प्रदेशातून होते. भारत हा या युरियाचा मोठा आयातदार आहे. इराण युद्धामुळे होर्मुझ सामुद्रधुनीतील जहाजवाहतुकीवर परिणाम झाला. ही सामुद्रधुनी जागतिक खत व्यापारासाठी अत्यंत महत्त्वाची मानली जाते. अमोनिया, युरिया आणि फॉस्फेट खतांच्या मोठ्या प्रमाणातील वाहतूक याच मार्गाने होते. युद्धामुळे हा मार्ग असुरक्षित झाल्याने खत पुरवठा साखळी विस्कळीत झाली आहे. भारताने खत उत्पादनात मोठी प्रगती केली असली तरी अनेक प्रकारच्या खतांसाठी तो अजूनही आयातीवर अवलंबून आहे. विशेषतः डीएपी (डाय-अमोनियम फॉस्फेट), अमोनिया आणि काही प्रमाणात युरियासाठी परदेशी पुरवठ्यावर अवलंबित्व कायम आहे. युद्धामुळे जागतिक बाजारात खतांच्या किमती झपाट्याने वाढल्या आहेत आणि त्यामुळे भारताचा आयात खर्च मोठ्या प्रमाणात वाढला आहे. युद्धानंतर जागतिक बाजारात युरियाच्या किमतींमध्ये २० ते ५० टक्क्यांपर्यंत वाढ झाल्याचे विविध अहवाल दर्शवतात. नैसर्गिक वायूच्या वाढलेल्या किमतींमुळे उत्पादन खर्चही वाढला आहे. खतटंचाईचा पहिला आणि सर्वात मोठा परिणाम शेतकऱ्यांवर होतो. योग्य वेळी खत उपलब्ध न झाल्यास पिकांच्या वाढीवर परिणाम होतो. विशेषतः तांदूळ, गहू, मका, ऊस आणि कापूस यांसारख्या पिकांना नत्रयुक्त खतांची मोठी गरज असते. खतांचा पुरवठा कमी झाल्यास उत्पादन घटण्याची शक्यता वाढते. खतटंचाई ही केवळ कृषी क्षेत्राची समस्या नाही; ती देशाच्या अन्नसुरक्षेशी निगडित आहे. जर खतांच्या कमतरतेमुळे पिकांचे उत्पादन घटले, तर अन्नधान्याचा पुरवठा कमी होईल. त्याचा परिणाम अन्नधान्याच्या किमतींवर होईल आणि महागाई वाढू शकते.

### अन्नसुरक्षेचा प्रश्न

जागतिक खत उत्पादक कंपन्यांनीही इशारा दिला आहे की युद्धामुळे खत पुरवठा खंडित राहिल्यास जागतिक अन्नसुरक्षेला धोका निर्माण होऊ शकतो. भारतासारख्या मोठ्या लोकसंख्येच्या देशात अन्नधान्य उत्पादनात अगदी किरकोळ घट झाली तरी त्याचे व्यापक आर्थिक परिणाम होऊ शकतात. ग्रामीण भागातील गरीब आणि लहान शेतकरी यांना त्याचा सर्वाधिक फटका बसतो., वाढत्या जागतिक किमतींमुळे खत अनुदानाचा बोजा प्रचंड वाढत आहे. खत मंत्रालयाने चालू आर्थिक वर्षासाठी अनुदान निधी वाढविण्याची मागणी केल्याची माहिती समोर आली आहे. युद्धामुळे निर्माण झालेल्या संकटामुळे भारताला दीर्घकालीन उपाययोजनांचा विचार करावा लागत आहे. हरित अमोनिया आणि हरित हायड्रोजन यांसारख्या पर्यायी तंत्रज्ञानाकडे खत उद्योगाचे लक्ष वेधले गेले आहे. भारतीय खत कंपन्या आता हरित अमोनियाच्या पुरवठ्याचे पर्याय शोधत आहेत. मार्चमधील आणीबाणीच्या आदेशानंतर हा गॅस पुरवठा सामान्य प्रमाणाच्या केवळ ७० टक्क्यांपर्यंत मर्यादित करण्यात आला. परिणामी, देशांतर्गत युरियाचे उत्पादन एकाच महिन्यात तब्बल एक-चतुर्थांशाहून अधिक घटले. ही तूट भरून काढण्यासाठी भारताने जागतिक बाजारपेठेकडे मोर्चा वळवला, पण तिथेही युरियाचा भाव २७ फेब्रुवारीच्या ४८४ डॉलर प्रति टनावरून मार्चअखेर थेट ६८८ डॉलरवर जाऊन भिडला होता. आज भारताला तातडीने लागणाऱ्या २.५ दशलक्ष टन युरियाच्या पूर्व निविदेत प्रति टन ९५९ डॉलर यापेक्षा कमी बोली लागलेली नाहीये अशी अवस्था आहे, ही किंमत या वर्षीच्या जानेवारीतील प्रति टन युरियाच्या किमतीच्या जवळपास दुप्पट होती. गेल्या वर्षी खत अनुदानाचे बिल १.८६ लाख कोटी रुपये होते. आता त्यात किमान १० टक्क्यांनी वाढ होण्याची दाट शक्यता आहे; आणि ही वाढ युद्ध किती काळ चालते यावर अवलंबून आहे. काही अंदाजानुसार हा आकडा यापेक्षाही खूप मोठा असू शकतो. खत अनुदानाचा बजेटमधील वाढणारा हा प्रत्येक रुपया म्हणजे देशातील रस्ते, शाळा किंवा रुग्णालयाच्या विकासावर खर्च न करता तिकडून इकडे वळवलेला असेल. थोडक्यात सांगायचे तर, हे इराण-इस्राएल-अमेरिका युद्ध भारताच्या ग्रामीण भागात एकतर खतांच्या टंचाईच्या रूपात येईल किंवा मग विकासाला खीळ घालणाऱ्या आर्थिक संकटाच्या रूपात. यातून सुटकेचा तिसरा कुठलाही मार्ग नाही. या संकटावर सरकारने पावले उचलली आहेत.

### सरकारची भूमिका

मार्च महिन्यात सरकारने स्पॉट बेसिसवर दररोज अतिरिक्त ७.३१ दशलक्ष मेट्रिक स्टँडर्ड क्यूबिक मीटर गॅस खरेदी केला, त्यामुळे देशातील युरिया प्रकल्पांना होणारा गॅस पुरवठा तब्बल २३ टक्क्यांनी वाढला. आगामी खरीप हंगामासाठी खतांचा साठा गेल्या वर्षीच्या तुलनेत संपूर्ण खरीप हंगामाभर मुबलक खतं उपलब्ध होतील अशी परिस्थिती असेल की नाही, हे पूर्णपणे सामुद्रधुनी पुन्हा उघडते की नाही यावर अवलंबून आहे. भारताने २०२३ पासूनच युरिया आयातीवरील स्वतःचे अवलंबित्व पूर्णपणे संपवण्याबाबत मोठ्या प्रमाणावर चर्चा केली आहे. त्यासाठी २०२५ पर्यंत देशात नवे कारखाने सुरू करण्याचे आश्वासनही देण्यात आले होते, मात्र प्रत्यक्षात हे कारखाने अजूनही सुरू झालेले नाहीत. अशा परिस्थितीत सध्या निर्माण झालेली तूट भरून काढण्याचा एकमेव मार्ग म्हणजे, जागतिक बाजारात जवळपास दुप्पट पैसे मोजून युरिया खरेदी करणे. पण चिंतेची बाब अशी की, हा आयात मार्गही धोक्यात आहे; कारण ईराणसमर्थित कुद्स फोर्सने होर्मुझच्या सामुद्रधुनीपासून ते बाब अल-मंदाबपर्यंतच्या सागरी मार्गावर हल्ले वाढवण्याची जी धमकी दिली आहे, ती जर खरी ठरली तर हा उरलेला मार्गही पूर्णपणे ठप्प होऊ शकतो. युद्धात प्रत्यक्ष लढून जितके लोक मरत नाहीत, त्यापेक्षा कितीतरी जास्त लोक भुकेमुळे मरतात. भारत या युद्धात थेट सामील नसला, तरी तो एका युद्धाचे भीषण परिणाम नकळतपणे सोसत आहे. आगामी ९० दिवसांमधील सर्वात मोठा प्रश्न हाच आहे की, खरीप पेरणीचा हा महत्त्वाचा कालावधी संपण्यापूर्वी युरिया खत शेतकऱ्यांच्या शेतांपर्यंत पोहोचणार की नाही. सध्या संपूर्ण जगाचे लक्ष होर्मुझच्या सामुद्रधुनीतून जाणाऱ्या तेलवाहू जहाजांवर केंद्रित आहे, मात्र अन्न सुरक्षेचा विचार करता आता जितकी नजर तेलाच्या जहाजांवर आहे, तितकीच किंबहुना त्याहून अधिक नजर खतांच्या जहाजांवरही ठेवण्याची गरज आहे.

---

**। विचार**

# पश्चिम बंगालमध्ये ‘महाराष्ट्र पॅटर्न’

***शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस या दोन प्रादेशिक पक्षांमधील फुटींनी भारतीय राजकारणाला नवा संदर्भ दिला. उत्तुंग नेतृत्व असलेल्या पक्षांमध्येही मतभेदांमुळे विभाजन होऊ शकते, हे त्यातून दिसले. पक्षातील नेतृत्वाचे केंद्रीकरण, पुढील पिढीच्या नेतृत्वाबाबतचे प्रश्न, स्थानिक नेत्यांमधील स्पर्धा आणि सत्तेच्या दीर्घकाळाच्या वापरातून निर्माण होणारा असंतोष हे आता बंगालमध्ये तृणमूल काँग्रेस पक्षाच्या जीवावर उठणारे मुद्दे ठरले आहेत.***

**राही भिडे**

पश्चिम बंगालच्या राजकारणात गेल्या दीड दशकात सर्वाधिक प्रभावी ठरलेले एक नाव म्हणजे ममता बॅनर्जी. डाव्या आघाडीच्या प्रदीर्घ सत्तेला धक्का देत त्यांनी तृणमूल काँग्रेसला राज्यातील प्रमुख राजकीय शक्ती म्हणून उभे केले आणि बंगालच्या राजकारणाचा चेहरामोहराच बदलून टाकला; मात्र कोणत्याही पक्षाचा सर्वात कठीण काळ हा विरोधकांशी लढताना नसतो, तर पक्षांतर्गत असंतोष उफाळून येतो तेव्हा असतो. सध्या ममता बॅनर्जींना अशाच प्रकारच्या आव्हानांचा सामना करावा लागत आहे. एखाद्या पक्षातील आमदारांचा फुटीर गट तयार होणे किंवा खासदारांमध्ये नाराजी वाढणे, ही केवळ संघटनात्मक समस्या नसते. ती नेतृत्वावरील विश्वास, निर्णयप्रक्रिया आणि पक्षाच्या भवितव्याबाबत निर्माण झालेल्या प्रश्नांची अभिव्यक्ती असते. पक्षातील मोठा गट वेगळी भूमिका घेऊ लागल्याचा थेट परिणाम पक्षाच्या जनाधारावर आणि कार्यकर्त्यांच्या मनोबलावर होतो. तृणमूल काँग्रेससारख्या व्यक्तिकेंद्रित पक्षासाठी तर हे आव्हान अधिक गंभीर ठरू शकते. ममता बॅनर्जी यांचे राजकीय यश त्यांच्या संघर्षशील प्रतिमेवर उभे आहे. रस्त्यावर उतरून आंदोलन करणाऱ्या, केंद्र सरकारशी दोन हात करणाऱ्या आणि बंगाली अस्मितेचा मुद्दा प्रभावीपणे मांडणाऱ्या नेत्या म्हणून त्यांनी स्वतःची ओळख निर्माण केली; परंतु दीर्घकाळ सत्तेत राहिल्यानंतर कोणत्याही पक्षात सत्तेचा थकवा, गटबाजी आणि नेतृत्वाविषयी प्रश्न निर्माण होणे स्वाभाविक असते. सत्तेची केंद्रित रचना अनेकदा नव्या नेतृत्वाला संधी देण्यात अपयशी ठरते आणि त्यातून असंतोष वाढतो. याचाच फायदा विरोधक घेतात. आमदारांपाठोपाठ तृणमूल काँग्रेसचे खासदारही फुटल्याने याबाबतच्या चर्चेने देशात जोर धरला.

पश्चिम बंगालमध्ये भारतीय जनता पक्षाने गेल्या काही वर्षांमध्ये आपला प्रभाव वाढवण्याचा प्रयत्न सातत्याने केला आहे. दुसरीकडे काँग्रेस आणि डावे पक्षही नव्याने राजकीय अवकाश शोधत आहेत. अशा परिस्थितीत तृणमूल काँग्रेसमध्ये अंतर्गत मतभेद वाढले, तर त्याचा सर्वाधिक लाभ विरोधी पक्षांना होऊ शकतो. कारण निवडणुका केवळ मतांच्या बळावर जिंकल्या जात नाहीत; त्यासाठी संघटनेची एकजूट आणि कार्यकर्त्यांचा आत्मविश्वासही तितकाच महत्त्वाचा असतो. मात्र, ममता बॅनर्जी यांच्या राजकीय कारकिर्दीकडे पाहता संकटांमधून मार्ग काढण्याची क्षमता वारंवार दिसून आली आहे. अनेक वेळा त्यांना राजकीयदृष्ट्या संपवण्याचे अंदाज व्यक्त करण्यात आले; पण त्यांनी पुनरागमन करून टीकाकारांना उत्तर दिले. त्यामुळे सध्याचे आव्हान कितीही गंभीर वाटत असले, तरी त्याचा अंतिम परिणाम काय होईल, हे सांगणे अद्याप घाईचे ठरेल. खरा प्रश्न ममता बॅनर्जी यांच्या वैयक्तिक राजकीय भवितव्याचा नाही; तर तृणमूल काँग्रेस पक्षाच्या संस्थात्मक ताकदीचा आहे. पक्ष केवळ एका व्यक्तीच्या करिष्म्यावर टिकून राहू शकतो का, की तो व्यापक नेतृत्व विकसित करून पुढील पिढीसाठी स्वतःला सक्षम बनवू शकतो, या प्रश्नाचे उत्तर आगामी काळात मिळेल. राजकारणात कोणतीही सत्ता कायमस्वरूपी नसते. जनतेचा विश्वास, पक्षाची अंतर्गत एकता आणि बदलत्या परिस्थितीशी जुळवून घेण्याची क्षमता यावरच राजकीय अस्तित्व अवलंबून असते. तृणमूल काँग्रेससमोर खरोखरच फुटीचे संकट उभे राहत असेल, तर ममता बॅनर्जींसाठीच नव्हे, तर पश्चिम बंगालच्या राजकीय भवितव्यासाठीही महत्त्वाचा टप्पा ठरेल.

२०११ मध्ये डाव्या आघाडीच्या तब्बल ३४ वर्षांच्या सत्तेला धक्का देत ममता बॅनर्जी यांनी बंगालच्या राजकारणात एका नव्या युगाची सुरुवात केली. ‘परिवर्तन’च्या घोषणेसह सुरू झालेला हा प्रवास अनेक निवडणुकांमधील विजय, मजबूत जनाधार आणि व्यक्तिकेंद्रित नेतृत्वामुळे अधिक बळकट होत गेला; मात्र कोणत्याही पक्षाचा किंवा नेतृत्वाचा राजकीय उत्कर्ष कायमस्वरूपी नसतो. काळाच्या ओघात सत्ताविरोधी भावना, संघटनात्मक विसंगती, नेतृत्वाभोवतीचे केंद्रीकरण आणि नव्या राजकीय आव्हानांमुळे मजबूत वाटणाऱ्या पक्षांनाही उतरती कळा लागते. अलीकडच्या काळात तृणमूल काँग्रेसमध्ये वाढत असलेली अंतर्गत अस्वस्थता, विविध गटांमधील मतभेद आणि नेतृत्वाच्या उत्तराधिकाराबाबत निर्माण होत असलेली चर्चा पाहता पश्चिम बंगालमध्येही ‘महाराष्ट्र पॅटर्न’सारखी परिस्थिती निर्माण झाली आहे. अर्थात, महाराष्ट्रातील राजकीय घडामोडी आणि बंगालची परिस्थिती यांच्यात मूलभूत फरक आहेत, तरीही पक्षातील अंतर्गत तणाव वाढत गेल्यास होणारे दूरगामी परिणाम केवळ तृणमूल काँग्रेसपुरते मर्यादित राहणार नाहीत, तर पश्चिम बंगाल आणि राष्ट्रीय राजकारणालाही प्रभावित करू शकतात. तृणमूल काँग्रेसमधील अनेक नेते स्वतःच्या राजकीय महत्त्वाकांक्षा बाळगून आहेत. स्थानिक पातळीवर विविध शक्तिकेंद्रे निर्माण झाली आहेत. अशा परिस्थितीत नेतृत्वाकडून सर्वांना समान न्याय मिळत नसल्याची भावना निर्माण झाल्यास असंतोष वाढणे स्वाभाविक ठरते. फुटीर गट अजूनही ममता यांना नेत्या मानत असला, तरी त्यांच्यामागे आता सुमारे वीसच आमदार आणि आठ ते दहा खासदार उरल्याने त्यांचा गट अल्पमतात आला आहे.

‘उतरती कळा’ हा शब्द वापरताना सावधगिरी आवश्यक आहे. कारण एखादा पक्ष काही अडचणींचा सामना करत असला, तरी राजकीयदृष्ट्या संपुष्टात येत आहे, असे मानणे चुकीचे ठरू शकते. तरीही काही संकेत दुर्लक्षित करता येणार नाहीत. दीर्घकाळ सत्तेत राहिल्यानंतर सत्ताविरोधी भावना निर्माण होणे हे लोकशाहीचे स्वाभाविक वैशिष्ट्य आहे. प्रशासनातील त्रुटी, भ्रष्टाचाराचे आरोप, स्थानिक पातळीवरील नाराजी आणि रोजगारासारख्या प्रश्नांवरील असमाधान यांचा परिणाम सत्ताधारी पक्षावर होत असतो. तृणमूल काँग्रेसलाही या समस्यांचा सामना करावा लागत आहे. एके काळी परिवर्तनाचे प्रतीक असलेला पक्ष सत्तास्थापित व्यवस्थेचा भाग बनल्यामुळे विरोधकांना सरकारविरोधी वातावरण निर्माण करण्यासाठी अधिक संधी मिळाली. याशिवाय, भाजपने गेल्या दशकात बंगालमध्ये स्वतःचा प्रभाव लक्षणीयरीत्या वाढवला आहे. एकेकाळी नगण्य उपस्थिती असलेला पक्ष आज सत्तेत आला आहे. मोठ्या प्रादेशिक पक्षांमध्ये फूट पडल्यावर अनेकदा नवीन पक्ष किंवा नवीन राजकीय आघाड्या जन्माला येतात. पश्चिम बंगालमध्येही अशी शक्यता नाकारता येत नाही. तृणमूल काँग्रेस हा केवळ पश्चिम बंगालपुरता मर्यादित पक्ष नाही. राष्ट्रीय पातळीवर विरोधी राजकारणात त्याची महत्त्वाची भूमिका राहिली आहे. संसदेत पक्षाचे प्रतिनिधित्व, विविध राष्ट्रीय मुद्द्यांवरील भूमिका आणि केंद्र सरकारविरोधी राजकीय आघाड्यांमधील सहभाग यामुळे तृणमूलचे महत्त्व वाढले आहे; परंतु आता पक्षात उभी फूट पडल्यामुळे राष्ट्रीय विरोधी राजकारणावर त्याचा परिणाम होऊ शकतो. विशेषतः भाजपविरोधी व्यापक आघाडी उभारण्याच्या प्रयत्नांमध्ये एक महत्त्वाचा घटक दुर्बल होईल.


दुसरीकडे, काँग्रेससाठी ही संधी असू शकते. पश्चिम बंगालमध्ये अनेक वर्षांपासून आपला गमावलेला राजकीय प्रभाव परत मिळवण्यासाठी काँग्रेस प्रयत्नशील आहे. तृणमूल काँग्रेसची ताकद कमी झाली, तर काँग्रेसला काही प्रमाणात राजकीय अवकाश मिळू शकतो. तसेच प्रादेशिक पक्षांच्या राजकारणावरही याचा परिणाम होईल. कारण तृणमूल काँग्रेस अनेक प्रादेशिक पक्षांसाठी एक यशस्वी मॉडेल मानला जात होता. त्या मॉडेलमध्येच अंतर्गत अस्थिरता दिसू लागली, तर इतर प्रादेशिक पक्षांनाही संघटनात्मक पुनर्रचना करण्याची गरज भासेल. म्हणूनच ममता बॅनर्जी यांच्यासमोरील सर्वात मोठे आव्हान विरोधक नाहीत, तर पक्षाची अंतर्गत एकजूट टिकवून ठेवणे हे आहे. कोणत्याही पक्षाचे दीर्घकालीन यश केवळ करिष्माई नेतृत्वावर अवलंबून राहत नाही. मजबूत संघटना, सक्षम नेतृत्वाची दुसरी फळी आणि संस्थात्मक निर्णयप्रक्रिया हे तितकेच महत्त्वाचे घटक असतात. ममतांनी आपल्या पक्षात संवादाची प्रक्रिया अधिक व्यापक केली, विविध नेत्यांना निर्णयप्रक्रियेत सहभागी केले आणि उत्तराधिकाराबाबतची अनिश्चितता दूर केली, तर प्रतिमा बदलू शकते. अन्यथा, असंतोषाचे रूपांतर संघटनात्मक आव्हानांमध्ये होण्याची शक्यता वाढेल. अंतर्गत मतभेद, नेतृत्वाचे केंद्रीकरण आणि वाढती राजकीय स्पर्धा यांचा योग्य वेळी सामना केला नाही, तर मजबूत वाटणारे किल्लेही ढासळू शकतात. पश्चिम बंगालसमोरील खरा प्रश्न तृणमूल काँग्रेसमध्ये फुटीचा नाही, तर बदलत्या सामाजिक, आर्थिक आणि राजकीय अपेक्षांशी हा पक्ष स्वतःला कितपत जुळवून घेऊ शकतो, हा आहे. त्याचे उत्तरच ममतांच्या नेतृत्वाचे आणि तृणमूल काँग्रेसच्या भवितव्याचे मोजमाप ठरणार आहे. पश्चिम बंगालच्या राजकीय इतिहासामध्ये अवघ्या दीड दशकापूर्वी, म्हणजेच २०११ मध्ये, ज्या डाव्या आघाडीच्या ३४ वर्षांच्या अभेद्य किल्ल्याला सुरुंग लावून ममता बॅनर्जी यांनी परिवर्तन घडवून आणले होते, त्याच तृणमूल काँग्रेसला आज अस्तित्वाच्या सर्वात मोठ्या संकटाचा सामना करावा लागत आहे. बंगालच्या विधानसभा निवडणुकीमध्ये तृणमूल काँग्रेसचा पराभव होऊन भाजपचे सुवेंदू अधिकारी मुख्यमंत्र्यांच्या गादीवर बसल्यानंतर महिन्याभरातच तृणमूल काँग्रेसमध्ये उभी फूट पडली. महाराष्ट्रात ज्याप्रमाणे शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाबाबत घडले, हुबेहूब तोच महाराष्ट्र पॅटर्न आता कोलकात्याच्या गल्लीबोळात आणि विधानसभेत यशस्वीपणे राबवला गेला आहे. तृणमूलच्या ८० पैकी सुमारे ५८ आमदारांनी आणि २९ पैकी सुमारे वीस खासदारांनी पक्षाचे राष्ट्रीय सरचिटणीस अभिषेक बॅनर्जी यांचे नेतृत्व नाकारत, हकालपट्टी झालेले नेते ऋतब्रत बॅनर्जी आणि काकोली घोष यांच्या पाठीशी उभे राहण्याचा निर्णय घेतला. विधानसभेच्या अध्यक्षांनी या बंडखोर गटाला मान्यता देऊन ऋतब्रत बॅनर्जी यांची नवे विरोधी पक्षनेते म्हणून निवड केली. अवघ्या १५ वर्षांमध्ये सत्तेच्या शिखरावरून विरोधी बाकांवर आणि तिथून थेट पक्षाच्या विभाजनापर्यंत पोहोचलेली तृणमूलची ही घसरण केवळ एका प्रादेशिक पक्षाची पडझड नाही, तर ती भारतीय राजकारणातील विशिष्ट कार्यशैलीच्या मर्यादा स्पष्ट करणारी घटना आहे.

---

**। चर्चा आजची**

# दरडीचे संकट संपेना

**प्रमोद जाधव**



विकासाच्या नावाखाली रायगड जिल्ह्यातील असंख्य डोंगर पोखरण्यात आले. त्यामुळे जिल्ह्यात दरडीचे संकट दिवसेंदिवस वाढत आहे. डोंगर माथ्याजवळ व पायथ्याशी असलेल्या शेकडो घरांना आणि त्यामधील लाखो नागरिकांना मोठा धोका आहे. हे संकट संपविण्यासाठी प्रशासनाने योग्य पावले उचलणे गरजेचे आहे. डोंगर पोखरणाऱ्यांना दणका देणे गरजेचे आहे. तरच दरडीचे संकट संपण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

रायगड जिल्ह्याला निसर्गाने भरपूर दिले आहे. या निसर्गाच्या सानिध्यात राहण्यावर स्थानिकांसह पर्यटक कायमच भर देतात. उंच डोंगर, हिरवीगार झाडे, पावसाळ्यामध्ये त्या डोंगरांवर वाहणारे पाण्याचे धबधबे कायमच आकर्षण करणारे ठरत असतात. त्यामुळे पावसाळी सहलीचा आनंद कायमच घेतला जातो. परंतू गेल्या काही वर्षात रायगड जिल्ह्यातील डोंगर दिवसेंदिवस दिवस नष्ट होत आहे. विकासाच्या नावाखाली डोंगरच्या डोंगर पोखरली जात आहे. रस्त्याच्या लगत असलेले उंच डोंगर, दुतर्फा असलेली हिरवीगार झाडे गायब झाली आहेत. विकास कामांच्या नावाखाली जेसीबीच्या मदतीने डोंगरांमध्ये उत्खनन केले जात आहे. डोंगराचा भाग ढिसूळ झाला आहे. त्याचा परिणाम पावसाळ्यात अतिवृष्टीमध्ये होण्याची भिती निर्माण झाली आहे. जमीनीची धुप होऊन दगड, माती, व झाडे उन्मळून कोसळण्याच्या घटना घडू लागल्या आहेत. त्यामुळे पावसाळ्यात डोंगर भागात फिरण्याचा आनंद नष्ट झाला आहे.

गेल्या दहा वर्षात सुमारे चारशेहून अधिक जणांचा दरडीमुळे बळी गेल्याची माहिती समोर येत आहे. रायगड जिल्ह्यामध्ये यापुर्वी महाड व पोलादपूर तालुक्यात दरड कोसळून तीनशेहून अधिक जणांचा बळी गेला. काहीजण त्या दरडीखालीच गेले. २०२१ मध्ये महाड येथील तळीये येथे झालेल्या दरडीने ८४ जणांचा मृत्यू झाला होता. २०२३ मध्ये १९ ते २० जूलै मध्यरात्रीच्या सुमारास इरसालवाडी दरड कोसळली. या दरडीमध्ये अनेकांचा मृत्यू झाला. तर काही जण दरडीखाली दबले गेले. रायगड जिल्ह्यामध्ये दरड कोसळण्याच्या घटना दिवसेंदिवस वाढत आहेत. डोंगर भागाजवळील नागरिकांना जीव मुठीत घेऊन राहण्याची वेळ आली आहे. रायगड जिल्ह्यामध्ये पोलादपूरपासून पनवेलपर्यंत, कर्जत, रोहा, अलिबाग अशा अनेक ठिकाणी विकासाच्या नावाखाली डोंगरांचे खोदकाम केले जात आहे. जमीनीची धुप होऊन दगड, माती, व झाडे उन्मळून कोसळत आहेत. रायगड जिल्ह्यातील १३ तालुक्यांतील ३९२ दरडग्रस्त गावे आहेत. या गांवीमधील सुमारे अडीच लाख नागरिकांना दरडीचा धोका असण्याची शक्यता आहे. त्यातपोलादपूरमधील १३९, महाडमधील १२२, अलिबागमधील ०९, कर्जतमधील ०५, खालापूरमधील १२, तळामधील ०३, पनवेलमधील ०३, पेणमधील १३, रोहामधील २०, सुधागडमधील ०९, म्हसळामधील १४, श्रीवर्धनमधील १२, मुरूडमधील ०९,माणगांवमधील २२ गावांचा समावेश आहे. अलिबाग तालुक्यातील चिंचोटीसह, सोगाव आदीवासीवाडी, सागाव आदिवासीवाडी, वाडगाव, ताजपूर, जांभूळपाडा, वेलेटवाडी. रोहामधील किल्ले, खारगाव, तिसे, वाळुंजवाडी, कवळठे आदिवासीवाडी, वरसगाव मधली आळी, मेढा, घोसाळे, आरे बुद्रुक, संभे, नादवली, वावेखार, पाले खुर्दे, महादेववाडी, शेणवई आदीवासीवाडी, भागीरथी खार, कुंभोशी. मूरूडमधील सर्वे वावे, सावली, हिलसरडा सोसायटी, चेहेर, फोफळी, मिठेखार, राजपुरी, एकदरा या गावांसह वाड्यांचा समावेश आहे. जिल्ह्यात अजूनही पावसाने सुरुवात केली नाही. पावसाची प्रतिक्षा शेतकरी करीत आहेत. मात्र अतिवृष्टीसह वादळी वाऱ्यामुळे रायगड जिल्ह्यातील ३९२ गावांना दरडीचा धोका निर्माण झाला आहे. अडीच लाख नागरिकांसमोर दरडीचे संकट उभे राहण्याची शक्यता आहे.दरडीपासून बचाव करण्यासाठी आपत्कालीन विभागाने कंबर कसली आहे. अपदा मित्रांसह रेस्क्यू टीम आदी यंत्रणाशी संवाद साधण्याचे काम करण्यात आले आहे.भारतीय भूवैज्ञानिक सर्वेक्षण विभागाच्या अहवालानुसार, जिल्ह्यात ३९२ दडरडग्रस्त गावे आहेत. दरडग्रस्त गावांची एकपासून पाचपर्यंत वर्गवारी करण्यात आली आहे. २४० गावांमध्ये सार्वजनिक उद्घोषणा प्रणाली बसवण्यात आली आहे. जिल्हा नियंत्रण कक्षातून एकाचवेळी हवामानाची पुर्व सुचना प्रसारित केली जाणार आहे. धोक्याच्या सुचनेसाठी सायरन वाजविले जाणार असल्याचे सांगण्यात आल आहे. आपत्कालीन परिस्थितीत स्थानिकांची मदत मिळावी म्हणून जिल्ह्यातील ६०० अपदा मित्र आणि सखींची मदत घेतली जाणार आहे. यांना प्रशिक्षण देण्यात आले असून शोध, बचावाचे कीट, ओळखपत्र आदी सुविधा उपलब्ध केल्या आहेत.

दरडीसह पुरपरिस्थितीच्या काळात बचाव कार्य करण्यासाठी आपत्ती व्यवस्थापन विभागाने नियोजन केले आहे. जीव मुठीत घेऊन वाचविण्याचा प्रयत्न या दलामार्फत केला जाईल. परंतु दरडीच्या घटना घडू नये नये यासाठी प्रशासनाने ठोस पावले उचलणे गरजेचे आहे. नियम धाब्यावर बसवून डोंगर पोखरणाऱ्यांवर अंकुश असणे गरजेचे आहे. तरच दरडीच्या घटना टाळण्यास मदत होईल. आगामी काळात अशा घटना घडू नये यासाठी प्रशासन योग्य पावले उचलतील अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

---

**। दिनविशेष**

## आचार्य प्रफुल्लचंद्र रे भारतीय रसायनशास्त्रज्ञ

१९२२ मध्ये जेव्हा उत्तर बंगालमध्ये अचानक आलेल्या पुरामुळे लाखो लोक बेघर आणि उपाशी झाले, तेव्हा एक निवृत्त भारतीय रसायनशास्त्रज्ञ, शिक्षणतज्ज्ञ आणि परोपकारी अनेकांसाठी आशेचा किरण बनले. बंगाल रिलीफ कमिटीला एकत्रित करून, त्यांनी २५ लाख रुपयांहून अधिक रोख आणि वस्तू गोळा केल्या आणि बाधित भागात मदत पोहोचवली. २ ऑगस्ट हा त्यांचा जन्म दिवस आहे. ही कथा आचार्य प्रफुल्ल चंद्र रे यांची आहे. रे जर परदेशात स्थायिक झाले असते आणि प्रतिष्ठित संस्थांमध्ये काम करत राहिले असते तर त्यांना आरा दायी जीवन मिळू शकले असते, परंतु १८८८ मध्ये त्यांनी भारतात परतण्याचा जाणीवपूर्वक निर्णय घेतला. जवळजवळ एक वर्ष त्यांनी त्यांचे मित्र, महान आचार्य जगदीश चंद्र बोस यांच्यासोबत काम केले. रे हे एक दूरदर्शी होते आणि त्यांचा असा विश्वास होता की औद्योगिकीकरण हे भारताच्या प्रगतीकडे एक पाऊल आहे. त्यांनी भारतातील पहिली रासायनिक कारखाना किंवा औषध कंपनी म्हणून ओळखलीजाणारी एक कंपनी स्थापन केली. १९०१ मध्ये, बंगाल केमि कल अँड फार्मास्युटिकल वर्क्स लिमिटेडची साधी सुरुवात रे यांनी कलकत्त्याच्या ९१ अप्पर सर्कुलर रोड येथे भाड्याने घेतलेल्या घराच्या चार भिंतींच्या आत झाली. ७०० रुपयांच्या तुटपुंज्या भांडवलात स्थापन झालेल्या रे यांनी बंगाली तरुणांमध्ये उद्योजकतेची भावना निर्माण करण्यासाठी ही कंपनी सुरू केली जेणेकरून त्यांना परदेशी राज्यकर्त्यांकडून नोकऱ्या मिळवण्यासाठी धडपड करावी लागू नये. स्वदेशी तंत्रज्ञान, कौशल्य आणि कच्चा माल वापरून दर्जेदार रसायने, औषधे, औषधनिर्माण आणि घरगुती उत्पादने तयार करणारी पहिली भारतीय कंपनी म्हणून तिने इतिहास रचला. या उत्पादनांमध्ये अग्निशामक यंत्रे, शस्त्रक्रिया उपकरणे, टॅल्कम पावडर, टूथपेस्ट, ग्लिसरीन साबण, कार्बोलिक साबण इत्यादींचा समावेश होता. त्या काळात लोकप्रिय असलेले हे उत्पादन. जेव्हा रे ६० वर्षांचे झाले, तेव्हा त्यांनी विद्यापीठातील त्यांच्या उर्वरित सेवेचा सर्व पगार रसायनशास्त्र विभागाच्या विकासासाठी आणि दोन संशोधन फेलोशिप तयार करण्यासाठी आगाऊ दान केला. त्यांनी आंतरराष्ट्रीय चर्चासत्रे आणि काँग्रेसमध्ये अनेक भारतीय विद्यापीठांचे प्रतिनिधित्व केले. १९२० मध्ये ते भारतीय विज्ञान काँग्रेसचे अध्यक्ष म्हणून निवडले गेले. रे यांच्या नेतृत्वाखाली कंपनीची वाढ झाली आणि डॉ. आर.जी. कर, डॉ. एन.आर. सरकार, डॉ. एस.पी. सर्वाधिकारी, डॉ. अमूल्य चरण बोस यांसारख्या प्रतिष्ठित व्यक्तींमध्ये त्यांना आश्रय मिळाला आणि बंगाली तरुणांसाठी रोजगाराच्या संधी निर्माण झाल्या. संपूर्ण आयुष्य अविवाहित राहिलेले रे अखेर १९३६ मध्ये ७५ व्या वर्षी प्रोफेसर एमेरिटस म्हणून निवृत्त झाले. १६ जून १९४४ रोजी ८२ व्या वर्षी त्यांचे निधन झाले.

---

**लोकसंसद**

## गल्लीपासून दिल्लीपर्यंत विलीनीकरणांची चर्चा सत्यात उतरणारं काय ?



काही दिवसापूर्वी पश्चिम बंगाल विधानसभेच्या निवडणुका पार पडल्या यामध्ये माजी मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्या पक्षाचा मोठा दारुण पराभव झाला, कर्नाटकसह केरळ तसेच काही दक्षिणेकडील राज्यांचे नव्याने मुख्यमंत्री निवड करण्यात आली त्यामुळे काँग्रेसचा आत्मविश्वास दुणावला आहे याचं अनुषंगाने देशपातळीवर ममता बॅनर्जी यांचा तृणमूल काँग्रेस, महाराष्ट्रातील शरद पवारांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष काँग्रेसमध्ये विलीनीकरण करण्यासाठी ऑफर दिली आहे विशेष म्हणजे उद्धव ठाकरेंच्या शिवसेनाला सुद्धा काँग्रेसमध्ये या असे सांगितल्याचे बोलले जात असून तशा प्रकारचे वृत्त येतं आहेत त्यामुळे या बातम्यांना आणखीन बळ मिळाले आहे सन २०१४ पासून मोदी पर्व सुरु झाले आणि इकडे काँग्रेसची पडझड वाढली तशातच काही सभांमधून पीएम मोदींनी देश काँग्रेसमुक्त करण्याची डरकाळी फोडली होती पण सद्या काँग्रेस पुन्हा एकदा नव्याने सर्वांना घेवून उभारी घेण्यासाठी किंवा पक्ष संघटना बांधणी करण्यासाठी अशा एकाच विचारधारेच्या प्रादेशिक पक्षांना विलीनीकरणांचा प्रस्ताव दिल्याचे बोलले जात आहे सन १९९९ म्हणजे २७ वर्षापूर्वी काँग्रेस मधून बाहेर पडून शरद पवारांनी राष्ट्रवादीची स्थापना केली, ममता बॅनर्जी यांनीही तसेच केले आहे विलीनीकरणांचा प्रस्ताव जर या पक्षप्रमुखांनी स्वीकारला तर देशांतील राजकिय समीकरणे नव्याने उदयाला येणारं आहेत सद्या प्रादेशिक पक्षांची अवस्था फार बिकट होवून बसली आहे त्यामुळे अशा गोष्टी होण्याची शक्यता नाकारता येत नाही विलीनीकरणाच्या बदल्यात शरद पवारांना राज्यसभेचे विरोधी पक्षनेते, महाराष्ट्रात काँग्रेसचे सरकार आल्यास सुप्रिया सुळेंना मुख्यमंत्री, ममता बॅनर्जीना काँग्रेसचे राष्ट्रीय उपाध्यक्ष, महासचिव, आणि ठाकरेंना काँग्रेसचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष, खासदार अशी ऑफर दिल्याचे वृत्त आहे मात्र या सर्व गोष्टी जर तर च्या आहेत त्यामुळे आगामी काळात काय निर्णय होतो ते पहाणे मोठे औत्सुक्याचे ठरणारं आहे !

**– राजू जाधव, मांगूर जि. बेळगांव**

### अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

१६ जून

१) श्री. हरिश्चंद्र श्रीपत पिळणकर अलिबाग, १६-६-१९५३

२) श्रीम. जयश्री जगदिश कवळे अलिबाग, १६-५-१९६२

३) श्रीम. स्वाती भालचंद्र वाडकर अलिबाग, १६-५-१९५८

### कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क-** ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)
९२२६०५५१५५ (अमित शहानंद)
- मुख्य संपादक, कृषीवल

**आजचे अन्नदाते**

शिल्पा प्रताप गंभीर, अधिक मास निमित्ताने अलिबाग



**कै. नारायण लक्ष्मण नाईक, स्मरणार्थ, चौल बेलाई, अलिबाग**

# शाळांमध्ये घुमला घंटेचा गजर

## नवप्रवेशित विद्यार्थ्यांचे जल्लोषात स्वागत

### ■ म्हसळ्यात चिमुकल्यांचा किलबिलाट



**| म्हसळा | प्रतिनिधी |**

उन्हाळी सुट्टी संपताच सोमवार दि.१५ पासून जिल्ह्यातील शाळांमध्ये घंटेचा गजर घुमायला लागला असून शाळांमध्ये चिमुकल्यांचा किलबिलाट सुरू झाला आहे. शाळेच्या पहिल्याच दिवशी पी.एम.श्री. शाळेत मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. धूमधडाक्यात प्रवेशोत्सव साजरा करण्यात आला. ६ ते १४ वयोगटातील प्रत्येक बालक शिक्षण प्रवाहात यावा, यासाठी म्हसळा पंचायत समिती शिक्षण विभागातर्फे विविध उपक्रम राबविण्यात आले. त्यामध्ये प्रामुख्याने प्रभातफेरी, विद्यार्थी पदयात्रा, पालकांच्या गृहभेटी, शाळा व परिसर स्वच्छता, रांगोळी आणि फुलांची सजावट इत्यादी उपक्रमांचा समावेश करण्यात आला.

म्हसळा नगराध्यक्ष सुनिल शेडगे, उपनगराध्यक्ष कमल जाधव, पं. स. सदस्या समृद्धी चाचले, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष शशिकांत शिर्के, शा.व्य. समिती माजी अध्यक्ष सुशिल यादव, सदस्य अंकुश नटे, निता दर्गे, मुख्याध्यापिका सुमित्रा खेडेकर, शिक्षक नरेश मुंडे, जयश्री गायकवाड, इंदिरा चौधरी, श्रीधर उमदी आदि मान्यवर उपस्थित होते. सुरुवातीस सुमित्रा खेडेकर यांनी प्रास्ताविक केले. नगराध्यक्ष सुनिल शेडगे, सुशिल यादव यांनी विद्यार्थ्यांचे स्वागत करून मार्गदर्शन केले. प्रवेशोत्सव उपक्रमाचे औचित्य साधून इ.१ ली ते ४च्या विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तके आणि मोफत गणवेशाचे वाटप मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

**| पाली/गोमाशी | प्रतिनिधी |**

शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीला आयोजित करण्यात आलेल्या शाळा प्रवेशोत्सवानिमित्त संत नामदेव माध्यमिक विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, नांदगाव येथे नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे लेझीम पथक, ढोल ताशाच्या गजरात फुलांची उधळण करत औक्षण करून प्रवेशोत्सव साजरा करण्यात आला.

यावेळी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष जगदीश सुतार यांच्या हस्ते नवप्रवेशित विद्यार्थ्यांना शालेय पुस्तकांचे वाटप, डोंबिवली महाबँक सेवानिवृत्त परिवार यांच्या वतीने देण्यात आलेल्या शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. या शैक्षणिक साहित्य वाटपामुळे आर्थिक अडचणीत असलेल्या पालकांना मोठा दिलासा मिळाला असून विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले. शाळेच्या वतीने सांगण्यात आले की, शिक्षण सर्वांसाठी सुलभ व्हावे आणि एकही विद्यार्थी आर्थिक कारणामुळे मागे राहू नये, या उद्देशाने दरवर्षी प्रवेशोत्सवात मोफत शैक्षणिक साहित्य वाटपाचा उपक्रम राबवला जातो.





# शिक्षक-विद्यार्थ्यांचे अनोखे नाते खुलले

**| पनवेल | प्रतिनिधी |**

वहाळ येथील जिल्हा परिषद शाळेत नव्या शैक्षणिक वर्षाच्या पहिल्याच दिवशी उत्साहाचे आणि आनंदाचे वातावरण पाहायला मिळाले. विद्यार्थ्यांचे शिक्षकांनी प्रेमाने स्वागत करत त्यांच्याशी संवाद साधला. नव्या वर्गात प्रवेश करताना विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यांवर उत्सुकता, आनंद आणि हास्य झळकत होते. विविध खेळ, गप्पा आणि उपक्रमांच्या माध्यमातून शिक्षक आणि विद्यार्थ्यांमधील जिव्हाळ्याचे नाते अधिक दृढ झाले. शिक्षणाचे महत्त्व पटवून देत विद्यार्थ्यांना नव्या शैक्षणिक प्रवासासाठी प्रेरित करण्यात आले. शाळेच्या परिसरात सर्वत्र चैतन्याचे वातावरण निर्माण झाले होते.

# शाळेचा पहिला दिवस उत्साहात

## ● विद्यार्थ्यांचे औक्षण करून स्वागत

**| आगरदांडा | प्रतिनिधी |**

नवीन शैक्षणिक वर्षाच्या पहिल्या दिवशी शहरातील मुरूड जंजिरा नगरपरिषद शाळा क्रमांक १,२,३,४,५ या शाळांमध्ये उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले. विद्यार्थ्यांचे औक्षण करून फुलांनी व शुभेच्छा देऊन स्वागत करण्यात आले.



■ (छायाचित्र : गणेश चोडणेकर)

यावेळी मुरुड जंजिरा नगरपरिषदेचे आरोग्य व शिक्षण सभापती तथा उपनगराध्यक्ष विरेंद्र भगत, महिला बालकल्याण समिती सभापती नगमाना खानजादे, बांधकाम सभापती यास्मिन कादिरी, पाणीपुरवठा सभापती पांडुरंग आरेकर, पर्यटन व नियोजन सभापती रुपेश रणदिवे, नगरसेवक मनिष विरुकुड, नगरसेवक नितिन आबुर्ले, नगरसेवक श्रीकांत खोत, मुरूड जंजिरा नगरपरिषदेचे प्रशासकीय अधिकारी नंदकुमार आंबतेकर, मुख्याध्यापक दिनेश भोईर, उपशिक्षिका सायली गुंजाळ, शिक्षण सेवक शशिकांत किंबहुने, शिक्षण सेविका प्रीती सैदाने, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष रोहन निशाणदार, सदस्य कल्पना गंबास, माजी मुख्याध्यापिका तथा शाळा व्यवस्थापन समिती सदस्या नैनीता कर्णिक आदी उपस्थित होते.

यावेळी उपनगराध्यक्ष विरेंद्र भगत व नगरसेवक मनिष विरुकुड यांनी विद्यार्थ्यांना चॉकलेट देण्यात आले. त्यानंतर विद्यार्थ्यांना मोफत शालेय पाठ्यपुस्तके व गणवेशांचे वाटप करण्यात आले.

# विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तक, गणवेशाचे वाटप

**| माणगाव | प्रतिनिधी |**

शैक्षणिक वर्ष २०२६-२७ ची सुरुवात सोमवार दि.१५ जून २०२६ रोजी झाली. माणगाव नगरपंचायत हद्दीतील रायगड जिल्हा परिषद शाळा विकास कॉलनी या शाळेत शासन उपक्रमानुसार विद्यार्थ्यांचा प्रवेशोत्सव तसेच विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके व गणवेश वाटप करण्यात आले. हा वाटप कार्यक्रम माणगाव पंचायत समितीचे सभापती विलास शिंदे, गटविकास अधिकारी शुभदा पाटील, गटशिक्षणाधिकारी सुरेखा तांबट, केंद्रप्रमुख शंकर शिंदे आदी मान्यवरांच्या उपस्थितीत मोठ्या उत्साहात व आनंददायी वातावरणामध्ये पार पडला.



या कार्यक्रमाच्या सुरुवातीस उपस्थित मान्यवरांचे शाळेच्या विद्यार्थ्यांनी लेझीमच्या तालावर नाचत स्वागत केले. तर शाळेचे शिक्षकवर्ग व व्यवस्थापन कमिटी यांनी इयत्ता पहिलीच्या विद्यार्थ्यांची स्वागत पाऊले उठवून औक्षण केले. तद्नंतर कार्यक्रमास उपस्थित मान्यवर आणि पालकांचा शाळेतर्फे सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमात मार्गदर्शन करताना माणगाव पंचायत समितीचे सभापती विलास शिंदे म्हणाले की, माणगाव तालुक्यामध्ये अतिशय आनंदाच्या वातावरणामध्ये शाळेचा पहिला दिवस साजरा करीत असताना राजिप विकास कॉलनी शाळेत विद्यार्थ्यांना शासनाच्या उपक्रमानुसार विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके व गणवेश वाटप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. अशा कार्यक्रमांतून विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळून त्यांच्यात उत्साह निर्माण होत असतो. शाळेतील विद्यार्थ्यांचा बौद्धिक विकास व्हायला पाहिजे, विद्यार्थी हा सर्वगुण संपन्न झाला पाहिजे.

# गुलाब पुष्प देऊन शाळेत स्वागत

**| पनवेल | प्रतिनिधी |**

शाळेच्या पहिल्या दिवसाचे औचित्य साधत रायगड जिल्हा परिषदेची शाळा इनामपुरी सेक्टर ३७ खारघर या ठिकाणी पहिलीत दाखल झालेल्या मुलांचे शाळेतील पहिले पाऊल त्यांचे कापडावर आणि कागदावर ठसे घेऊन पालकांना दिले. याच वेळेस पहिलीच्या मुलांचे औक्षण करून गुलाब पुष्प देऊन शाळेत स्वागत केले. पहिलाच दिवशी शालेय विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके वाटप केली, याचा आनंद विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर ओसांडून वाहत होता. याचवेळी मुलांना शाळेचे गणवेश वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून पनवेल महानगरपालिकेचे नगरसेवक तुषार पाटील आणि शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष वामन म्हात्रे हे उपस्थित होते.



# विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद

**| कोलाड | प्रतिनिधी |**

आंबेवाडी येथील एम.पी. एस.एस. इंग्लिश मिडीयम स्कूलमध्ये विद्यार्थांचे जल्लोषात स्वागत करण्यात आले. उन्हाळी सुट्टीनंतर शाळा पुन्हा सुरू झाल्याने शाळांमध्ये विद्यार्थ्यांचा किलबिलाट ऐकू येऊ लागला. तब्बल दीड महिन्यांच्या सुट्टीनंतर मित्र-मैत्रिणींना भेटण्याचा आनंद विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर दिसून आला.

नवीन शैक्षणिक वर्षाच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांनी उत्साहात शाळेत हजेरी लावली. शाळेमध्ये विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ, चॉकलेट, कॅडबरी देऊन तसेच टाळ्यांच्या गजरात स्वागत करण्यात आले. नवीन पुस्तके, वह्या, गणवेश आणि शालेय साहित्य घेऊन विद्यार्थी शाळेत दाखल झाले. सर्वच चिमुकल्यांचे विशेष स्वागत करण्यात आले. शाळेमध्ये स्वागत समारंभ, सांस्कृतिक कार्यक्रम तसेच मार्गदर्शनपर उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. शिक्षकांनी नवीन शैक्षणिक वर्षाच्या अभ्यासक्रमाची माहिती देत विद्यार्थ्यांना नियमित उपस्थित राहण्याचे आवाहन केले. पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर शाळा परिसरातील स्वच्छता, सुरक्षितता आणि विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी आवश्यक व्यवस्था करण्यात आल्याचे शाळा प्रशासनाकडून सांगण्यात आले.

# माजगाव शाळेत 'पहिले पाऊल' उपक्रम

## ● विद्यार्थ्यांच्या स्वागतासाठी रॅलीचे आयोजन

**| पाताळगंगा | प्रतिनिधी |**

राजिप शाळा माजगाव येथे शैक्षणिक वर्षाच्या पहिल्या दिवशी शाळा प्रवेशोत्सव कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न करण्यात आला.नविन विद्यार्थ्यांच्या स्वागतासाठी गावातून भव्य रॅली काढून, दाखल झालेल्या विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या शालेय जीवनातील पहिला दिवस स्मरणात रहावे यासाठी 'शाळेतील पहिले पाऊल' हा अनोखा उपक्रम राबविण्यात आला. नवागत विद्यार्थ्यांच्या पायांचे ठसे कागदावर उमटवून त्यांचे स्वागत करण्यात आले. यावेळी इयत्ता पहिली ते सातवीच्या



विद्यार्थ्यांना शासनाकडून उपलब्ध करून देण्यात आलेली मोफत पाठ्यपुस्तके आणि गणवेशांचे वाटप करण्यात आले. विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यावर शाळेचा भर असल्याचे यावेळी सांगण्यात आले.कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात मुख्याध्यापक सुनील सातुनकर यांनी विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास हेच शाळेचे प्रमुख उद्दिष्ट असल्याचे सांगितले. या कार्यक्रमाला सरपंच दिपाली पाटील,उपसरपंच वंदना महाब्दी, सदस्य राजेश पाटील, नरेश पाटील, सूर्यकांत कांबळे, केंद्रप्रमुख जे.पी. परदेशी तसेच ग्रामस्थ व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.हा कार्यक्रमाच्या यशस्वी करण्यासाठी शिक्षक सोहाली सातुनकर, भूषण पिंगळे, अर्चना शेलार आणि घनशाम तिखंडे यांनी विशेष परिश्रम घेतले.

**धाटाव केंद्रीय शाळेची घंटा वाजली** | **औक्षण करून विद्यार्थ्यांचे स्वागत**

# लेझीमच्या तालावर चिमुकल्यांचा प्रवेशोत्सव

**| धाटाव | प्रतिनिधी |**

काही महिन्यांच्या सुट्टीनंतर सोमवारपासून पुन्हा एकदा राज्यभरातील शाळांची घंटा वाजली आहे. रोह्यात धाटाव केंद्रीय शाळेत पहिल्याच दिवशी इयत्ता पहिलीत प्रवेश घेणाऱ्या चिमुकल्यांचे स्वागत करण्यासाठी एका आगळ्यावेगळ्या शालेय प्रवेशोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. नेहमी रडतरडत शाळेत येणारी मुले चेहऱ्यावर आनंद आणि डोक्यावर कागदी टोपी घालून उत्साहाने शाळेची पायरी चढताना दिसली. पुष्पवृष्टी, औक्षण आणि लेझीमच्या तालावर नाचत चिमुकल्यांचा प्रवेशोत्सव करून स्वागत करण्यात आले.



मुख्याध्यापक आणि सर्व शिक्षकांनी सोमवार दि.१५ जून रोजी सकाळी १० वाजता शाळेच्या मुख्य प्रवेशद्वारावरच मुलांचे स्वागत केले. शाळेला रंगीबेरंगी फुगे, सुबक रांगोळी आणि तोरणांनी सजविण्यात आले होते. नवीन प्रवेशित बालकांना कुंकवाच्या लालबुंद पाण्यात लक्ष्मीच्या पावलांप्रमाणे पायाचे ठसे उमटवीत सन्मानाने आत आणण्यात आले. प्रत्येक विद्यार्थ्याला गुलाब पुष्प, चॉकलेट आणि नवीन पुस्तकांचा संच देऊन त्यांचे रोहा पंचायत समितीच्या सभापती विजया पाशिलकर यांनी औक्षण केले.

याप्रसंगी केंद्रप्रमुख नारायण गायकर, मुख्याध्यापिका वनिता पवार, सहशिक्षिका उज्वला गोळे, मोहिनी पाटील, सहशिक्षक राजु वारे, सहशिक्षका मेघा देवकर, विशेष शिक्षिका कल्पना नागरे, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष अशोक भोकटे, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष गणेश कदम, मेघा ठाकूर यांसह पालकवर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

याठिकाणी सहाय्यक प्रशासन अधिकारी, शिक्षण विभाग प्राथमिक रायगड जिल्हा परिषद संजय कवितके, रोहा तालुका गटशिक्षणाधिकारी मेघना धायगुडे यांनीही शाळेच्या प्रवेशोत्सव कार्यक्रमाला सदिच्छा भेट दिली. त्यामुळे शाळेच्या पहिल्या दिवशी रडणाऱ्या मुलांऐवजी हसणारी आणि बागडणारी मुलेच सर्वत्र पाहायला मिळत होती.

या संपूर्ण कार्यक्रमाचे खुमासदार सूत्रसंचालन सहशिक्षिका उज्वला गोळे यांनी तर सहशिक्षक राजू वारे यांनी इंग्रजीत आभार प्रदर्शन करून उपस्थितांची मने जिंकली. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व शिक्षक वृंदाचे विशेष सहकार्य लाभले. एकूणच, लेझिमचा ताल, पुष्पगुच्छ, लक्ष्मीच्या पावलांप्रमाणे औक्षण, शिक्षकांचा आपुलकीचा हात आणि मुलांचा किलबिलाट, यामुळे हा प्रवेशोत्सव चांगलाच रंगतदार आणि संस्मरणीय ठरला.

## निवडक



### दर्यागाव येथे अंगणवाडी केंद्राचे उद्घाटन

**पाली/गोमाशी :** एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत सुधागड तालुक्यातील दर्यागाव क्र. २६ अंगणवाडी केंद्राच्या नूतन इमारतीचे उद्घाटन नुकतेच मोठ्या उत्साहात पार पडले. या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती रायगड जिल्हा चिटणीस शेकाप नेते सुरेश खैरे, माजी सभापती राम शिद, गोमा हंबीर, शिक्षक राजू बांगारे, कोकाटे यांच्यासह ग्रामस्थ, महिला इतर मान्यवर उपस्थित होते. नवीन इमारतीमुळे दर्यागाव परिसरातील अंगणवाडीच्या कामाला गती मिळणार असून बालकांच्या शिक्षण आणि आरोग्यासाठी हा महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे. नूतन इमारतीमुळे ० ते ६ वर्ष वयोगटातील मुलांना, गर्भवती आणि स्तनदा मातांना अधिक स्वच्छ, सुरक्षित आणि सोयीस्कर वातावरणात पूरक पोषण आहार, पूर्व-शालेय शिक्षण आणि आरोग्य तपासणीच्या सुविधा मिळणार आहेत. नूतन इमारत उद्घाटनप्रसंगी सुरेश खैरे यांनी अंगणवाडी सेविकांच्या कार्याचे कौतुक केले आणि ग्रामीण भागातील बालकांच्या सर्वांगीण विकासासाठी अशा केंद्रांची भूमिका महत्त्वाची असल्याचे सांगितले. या कार्यक्रमाला गावातील पालक, अंगणवाडी सेविका, प्राथमिक शिक्षक, मदतनीस आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.




### केंद्र शाळा कुडली येथे प्रवेशोत्सव

**सुतारवाडी :** नवीन शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभी केंद्र शाळा कुडली येथे शाळा प्रवेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे फुलांचा वर्षाव, औक्षण आणि टाळ्यांच्या गजरात स्वागत करण्यात आले. विद्यार्थ्यांसह पालक, शिक्षक आणि ग्रामस्थांनीही या कार्यक्रमात उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. यावेळी शाळा परिसर आकर्षक रांगोळ्या, फुगे आणि स्वागत फलकांनी सजविण्यात आला होता. विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तके व शैक्षणिक साहित्याचे वितरण करण्यात आले. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना शिक्षणाचे महत्त्व पटवून देत नियमित शाळेत उपस्थित राहण्याचे आवाहन केले. शाळा प्रवेशोत्सवाचा उद्देश प्रत्येक बालकाला शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणणे आणि शाळेच्या पहिल्या दिवसाचे उत्सवात रूपांतर करणे हा आहे. राज्यभर हा उपक्रम उत्साहात राबविण्यात येत असून विद्यार्थ्यांचे आनंददायी वातावरणात स्वागत केले जात आहे. कार्यक्रमाच्या शेवटी सर्व मान्यवरांनी विद्यार्थ्यांना उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. केंद्र शाळा कुडलीचा प्रवेशोत्सव विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलवणारा आणि नव्या शैक्षणिक वर्षाची प्रेरणादायी सुरुवात ठरला. त्यावेळी शाळेतील मुख्याध्यापिका सुशीला म्हात्रे, मोहन राठोड, अविनाश जाधवर तसेच सर्व पालक कमिटीचे सदस्य अध्यक्ष उपस्थित होते.



### सुधागड शाळेत विद्यार्थ्यांचे स्वागत

**कळंबोली :** नवीन शैक्षणिक वर्षाच्या पहिल्या दिवशी कळंबोली येथील सुधागड विद्यालयात विद्यार्थ्यांच्या स्वागतासाठी आयोजित करण्यात आलेला शाळा प्रवेशोत्सव मोठ्या उत्साहात पार पडला. यावेळी पनवेल महापालिकेचे स्थायी समिती सभापती बबन मुकादम यांच्या हस्ते विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. तसेच विद्यार्थ्यांना शालेय पुस्तकांचे वाटप करून नव्या शैक्षणिक वर्षासाठी शुभेच्छा देण्यात आल्या. कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांमध्ये मोठा उत्साह पाहायला मिळाला. शाळेच्या पहिल्याच दिवशी नवागत विद्यार्थ्यांचे औक्षण करून व गुलाब पुष्प देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले. यामुळे विद्यार्थी व पालकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते. यावेळी बबन मुकादम म्हणाले की, 'सुधागड शाळा ही खऱ्या अर्थाने गोरगरिबांची शाळा असून जात, धर्म, पंथ किंवा जात-पात न पाहता सर्वांना समान संधी देणारी कळंबोलीतील एक आदर्श शिक्षणसंस्था आहे. या शाळेचे नाव केवळ रायगड जिल्ह्यातच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रात उज्ज्वल व्हावे, हीच इच्छा आहे.' विद्यार्थ्यांच्या स्वागताने आणि पुस्तक वितरणाने नवीन शैक्षणिक वर्षाची सुरुवात झाली.



### पहिल्या दिवशी चिमुकल्यांचे स्वागत


**सुतारवाडी :** सर्वत्र सोमवारी (दि.१५) शाळा-कॉलेज सुरू झाले. शाळेच्या पहिल्या दिवशी शाळेचा परिसर विद्यार्थ्यांनी गजबजून गेला आणि शालेय वातावरण निर्माण झाले. सुतारवाडी येथील डॉ. जी. आर. राजे प्री प्रायमरी इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांनी पहिल्या दिवसाची आपली हजेरी लावून आपला आनंद व्यक्त केला. यावेळी शिक्षकांनी सर्व विद्यार्थ्यांना शालेय वस्तू व चॉकलेट देऊन त्यांचे स्वागत केले. यावेळी विद्यार्थ्यांचे पालकही मोठ्या संख्येने उपस्थित होते. डॉ. जी.आर. राजे प्री प्रायमरी इंग्लिश मीडियम स्कूलचे संस्थापक डॉ. रमेश राजे यांनी सर्व विद्यार्थ्यांना व पालकांना सन २०२६ व २०२७ च्या शैक्षणिक वर्षासाठी विद्यार्थी शिक्षक पालक यांना शुभेच्छा दिल्या. डॉ. जी.आर राजे प्री प्रायमरी इंग्लिश मीडियम स्कूल सुतारवाडी हे स्कूल २०२३ मध्ये सुतारवाडी येथे सुरू करण्यात आले. या स्कूलमध्ये सुतारवाडी, कामत, गौळवाडी, येरळ, जामगाव. जाधव वाडी, ढोकळेवाडी, दुरटोली, तसेच अन्य परिसरातील विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. प्ले ग्रुपपासून सिनियर के.जी.पर्यंत या ठिकाणी उत्तम दर्जाचे शिक्षण दिले जाते.

## निवडक



### दहशतवाद्यांना रोखण्याची तालीम

**उरण :** सागरी सुरक्षेला कोणताही धोका निर्माण झाल्यास त्याला चोख प्रत्युत्तर देण्यासाठी उरण पोलिसांनी पिरवाडी लँडिंग पॉइंट येथे मोठ्या प्रमाणावर मॉक ड्रिल आयोजित केली. या सरावाद्वारे दहशतवादी घुसखोरीला कशा पद्धतीने प्रतिसाद दिला जाईल, याचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक सादर करण्यात आले. या मॉक ड्रिलमध्ये समुद्रमार्गे घुसखोरी करणाऱ्या दहशतवाद्यांचा शोध घेऊन कारवाई करण्याचा सराव करण्यात आला. या कारवाईदरम्यान एका दहशतवाद्याला ठार करण्यात आले, तर दुसऱ्या दहशतवाद्याला जिवंत पकडण्यात आल्याचे दृश्य साकारण्यात आले. यावेळी दहशतवाद्यांकडील शस्त्रसाठा व दारूगोळा जप्त करण्यात आला. ठार झालेल्या दहशतवाद्याला रुग्णवाहिकेद्वारे रुग्णालयात पाठविण्यात आले, तर पकडलेल्या संशयिताला पुढील चौकशीसाठी पोलीस ठाण्यात हलविण्यात आल्याचा सराव करण्यात आला. सागरी सुरक्षेच्या दृष्टीने आयोजित करण्यात आलेल्या या मोहिमेत जलद प्रतिसाद पथकाचे २५ जवान, ओएनजीसी सीआयएसएफचे अधिकारी व कर्मचारी, सिडको अग्निशमन दल, वैद्यकीय पथक, वाहतूक शाखा, सागरी सुरक्षा शाखा, बॉम्ब शोधक व नाशक पथक, उरण पोलीस ठाणे, मोरा सागरी पोलीस ठाणे, होमगार्ड यांनी सहभाग घेतला.



### निरीक्षकाची हजेरी कागदावरच?

**पनवेल :** पनवेल रेल्वे स्थानकाकडे जाणाऱ्या नवीन रस्त्यावर गेल्या काही दिवसांपासून कचऱ्याचे साम्राज्य पसरले असून, या समस्येकडे संबंधित भागाच्या स्वच्छता निरीक्षकांचे साफ दुर्लक्ष होत असल्याचे समोर आले आहे. दिवसेंदिवस या ठिकाणी कचऱ्याचे ढीग वाढत चालल्याने परिसरात प्रचंड दुर्गंधी सुटली आहे. हे अधिकारी पालिकेत फक्त हजेरी लावण्यापुरतेच येतात की प्रत्यक्ष जमिनीवर उतरून काम करतात? असा संतप्त सवाल आता त्रस्त नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. उघड्यावरील या कचऱ्यामुळे परिसरात रोगराई पसरण्याची दाट भीती निर्माण झाली आहे. असे असतानाही कर्तव्यावर असलेले स्वच्छता निरीक्षक या भागाची पाहणी करण्यासाठी फिरकत नसल्याचे चित्र आहे. अधिकारी नेमके एसी केबिनमध्ये बसून असतात की हजेरी लावून निघून जातात, हेच नागरिकांना कळेनासे झाले आहे. कचरा टाकणाऱ्यांवर कारवाई करणे आणि परिसर साफ ठेवणे ही ज्यांची जबाबदारी आहे, त्यांचेच या परिस्थितीकडे अक्षम्य दुर्लक्ष होत आहे.



### रोह्यात रक्तदान शिबीर संपन्न

**धाटाव :** महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त तसेच मनसेचे माजी रायगड जिल्हा सचिव अमोल पेणकर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून महाराष्ट्र नवनिर्माण सेनेतर्फे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. रोहे सार्वजनिक बांधकाम उपविभागाच्या विश्रामगृह येथे सकाळी ९ ते दुपारी २ या वेळेत हे शिबिर उत्साहात पार पडले. राज्य रक्त संकलन परिषद, अलिबाग यांच्या सहकार्याने आयोजित करण्यात आलेल्या या शिबिरात ३० रक्तपिशव्यांचे संकलन करण्यात आले. कोरोना काळाचा अपवाद वगळता सातत्याने रक्तदान शिबिरांचे आयोजन करण्यात येत असून, आजवर अनेक रक्तदात्यांनी या उपक्रमात सहभाग नोंदविला आहे. कार्यक्रमाचे उद्घाटन उपजिल्हाध्यक्ष शिवराज पोलसानी यांच्या हस्ते करण्यात आले. यानंतर रक्तदान शिबिरास सुरुवात झाली. या उपक्रमाची संपूर्ण जबाबदारी तालुका अध्यक्ष अक्षय रटाटे, महेश वाडकर, साहिल म्हसकर, विघ्नेश म्हसकर, रुपेश कोल्हटकर, मयूर कोल्हटकर, नितीन मुंडे, प्रताप खंडारे आणि सुमित कांबळे यांनी यशस्वीपणे पार पाडली.यावेळी पत्रकार महादेव सरसंबे, महेंद्र मोरे, रवींद्र कानेकर, सचिन साळुंखे, उद्धव आव्हाड, नितीश सकपाळ आणि महेश मोहिते यांची विशेष उपस्थिती लाभली.

### टोरंट प्रकल्प हटवण्याची मागणी

**नेरळ :** कर्जत तालुका पर्यावरण पूरक तालुका म्हणून ओळखला जातो.या तालुक्यातील हरित पट्टा उध्वस्त करणारा टोरंट कंपनी कडील जलविद्युत प्रकल्प रद्द करावा अशी मागणी शिवसेना ठाकरे पक्षाचे वतीने करण्यात आली आहे. कर्जत तालुक्यात टोरंटो हा वीज निर्मिती प्रकल्प उभारण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. या प्रकल्पामुळे कर्जत तालुक्यातील हरित पट्टा म्हणजेच ग्रीन झोनला धोका पोहोचणार असून पर्यावरणाची मोठी हानी होणार आहे.यामुळे या प्रकल्पाला तालुक्यातून विरोध होतो आहे याची दखल शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे महिला आघाडीने घेतली आहे.कर्जत परिसरात प्रस्तावित करण्यात आलेल्या धरण प्रकल्पाबाबत शिवसेना ठाकरे गटाच्या महिला आघाडीने चिंता व्यक्त केली आहे. या प्रकल्पामुळे कर्जत तालुका आणि परिसरातील मौल्यवान नैसर्गिक जंगले, वनसंपदा, जैवविविधता आणि पर्यावरणीय समतोल धोक्यात येण्याची शक्यता आहे.

## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- दुकानगाळा भाड्याने मिळेल. ९४२३३७५१९८
- नागावमधील हॉटेलमध्ये काम करण्यासाठी स्टाफची आवश्यकता आहे. ऑल राऊंडर कुक (कॉंटिनेंटल सुद्धा येणे आवश्यक) रेस्टॉरंट कॅप्टन, मेन्टेनन्स पर्सन, इच्छुक उमेदवारांनी सकाळी १० ते ६ या वेळेत संपर्क साधावा अथवा व्हॉटसअॅप वर मेसेज करावा. मोबा. ७५५९१८४६१२
- Office staff required Graduates can call for interview. Trainee undergraduates required. Call 9150717038

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

# भिरा फाटा बनला 'डेंजर झोन'

## ठेकेदाराचा मनमानी कारभार; बायपास रस्त्यावर गतिरोधक टाकण्याची गरज

**| कोलाड | प्रतिनिधी |**

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग ६६ वरील कोलाड येथील वरसगांव भिरा फाट्यावरील बायपास रस्त्यावर तसेच भिरा फाट्यावर गतिरोधक (स्पीड ब्रेकर) टाकण्याची गरज असुन या कामात ठेकेदाराकडून मनमानी कारभार सुरू असल्याचा दिसून येत आहे.यामुळे भिरा फाटा हा डेंजर झोन बनला असुन नागरिकांमधून तीव्र संताप व्यक्त करण्यात येत आहे.

मुंबई-गोवा महामार्गांवरील वरसगांव भिरा फाट्यावर महाड कडून मुंबई बाजुकडे येणाऱ्या व मुंबईकडून महाड बाजुकडे जाणाऱ्या मार्गांवर गतिरोधक बसविण्यात आला आहे.तो ही अतिशय निस्कृष्ठ दर्जाचे आहेत यामुळे अनेक अपघात घडत आहेत. तर कोलाड कडून भिराकडे जाणाऱ्या बायपास रस्त्यावर गतिरोधक नाही यामुळे येथे अतिवेगाने येणाऱ्या वाहनांमुळे येथे अपघाताचा धोका वाढला आहे.यामुळे येथे रस्त्याला गतिरोधक बसविणे आवश्यक आहे.परंतु यांची कल्पना संबंधित ठेकेदार याला दिली असतांनाही येथे गतिरोधक बसविण्यात आले नाही. यामुळे कोणाचा नाहक बळी गेला तर याला जबाबदार कोण? अशी संतप्त प्रतिक्रिया



रहिवाशी नागरिक व प्रवाशी यांच्याकडून करण्यात येत आहे.

मुंबई-गोवा महामार्गावरून वरसगांव भिरा फाट्यावरून ताम्हिणी मार्गी पुणेकडे जाणारा राष्ट्रीय महामार्ग असुन या मार्गावरून असंख्य खेडेगावातील नागरिक ये-जा करीत असतात. यामुळे या मार्गावर उड्डाण पुलाची आवश्यता होती. परंतु या ठिकाणी उड्डाणपूल न बनविण्याची गरज का भासली नाही.? का येथील सर्वे डोळे झाकून केला आहे काय? असा संतप्त सवाल नागरिकांकडून केला जात आहे.

दरम्यान, या ठिकाणी कम ीत कमी वाहनांचा वेग कमी करण्यासाठी गतिरोधक बसविणे गरजेचे असुन या संबंधात पत्रकारांनी महामार्ग ठेकेदार यांना दूरध्वनीद्वारे संपर्क साधला असता ठेकेदार यांनी ३१ मे रोजी गतिरोधक करून देण्याचे आश्वासन दिले होते. परंतु आज १२ दिवस झाले तरी गतिरोधकाचे काम पूर्ण केले नाही.यामुळे संबंधित ठेकेदारावर प्रशासनाचे कोणतेही वचक नसल्याने ठेकेदाराचा मनमानी कारभार सुरु असल्याचे नागरिकांकडून संताप व्यक्त करण्यात येत आहे.

> उड्डाण पुलाचे काम पूर्ण न झाल्यामुळे वाहने बायपास रस्त्यावरून अतिवेगाने जात आहेत. यामुळे अपघाताचा धोका वाढला असुन स्थानिक नागरिकांच्या जिवाला धोका निर्माण झाला आहे. यामुळे येथे गतिरोधक बसविण्यात यावे, अशी मागणी होत असतांना संबंधित ठेकेदार दुर्लक्ष करीत आहे. यामुळे कोणाचा नाहक बळी गेला तर याला जबाबदार संबंधित ठेकेदार असेल.
> -डॉ. संजय पाटील, सामाजिक कार्यकर्ते

## भूमिअभिलेख कार्यालयात 'नकल'साठी वेळेची बंधने

### दिवसभर अर्ज आणि वितरण व्हावे, नागरिकांची मागणी

**| कर्जत | प्रतिनिधी |**

जमिनीचे ७/१२ उतारे, फेरफार नोंदी, नकाशे यांसारख्या कागदपत्रांच्या 'नकल' प्रती मिळवण्यासाठी भूमिअभिलेख कार्यालयाने ठरवून दिलेल्या विशिष्ट वेळेमुळे ग्रामीण भागातील नागरिकांची मोठी गैरसोय होत आहे. अर्ज स्वीकारण्याची वेळ सकाळी १० .३० ते १.३० आणि नकल वितरणाची वेळ दुपारी २ ते ५.३० अशी बंधने असल्याने कर्जतसह आसपासच्या तालुक्यातून येणाऱ्या नागरिकांना दिवसभर थांबावे लागते किंवा पुन्हा फेरी मारावी लागते. त्यामुळे नकल अर्ज स्वीकारण्यापासून ते



वितरणापर्यंतची वेळ दिवसभराची असावी, अशी ठाम मागणी अमोघ कुळकर्णी यांनी केली आहे.

भूमिअभिलेख कार्यालयात नकलसाठी सध्या अर्ज स्वीकारण्याची वेळ मर्यादित, साधारण २-३ तास, नकल वितरणाची वेळ वेगळी, दुपारनंतरची मर्यादित वेळ वेगळी याचा परिणाम असा होतो की, कर्जत, नेरळ, खालापूर, मुंबई आणि पुणे यासारख्या दूरच्या गावातून सकाळी ९ वाजता निघालेला शेतकरी अर्ज देऊन दुपारी ३ वाजेपर्यंत कार्यालयाबाहेर उन्हा तान्हात, उपाशी तिष्ठत बसतो. किंवा अर्ज देऊन दुसऱ्या दिवशी पुन्हा यावे लागते.काही शेतकरी शेती सोडून येतो. बसचा खर्च, दिवस वाया. वेळ ठरवून दिल्याने अर्धा दिवस फक्त नकलसाठी जातो. जर अर्ज आणि वितरण दिवसभर सुरू असेल तर आम्ही आलो की काम करून घरी जाऊ शकू,अशी मागणी आरटीआय अध्यक्ष अमोघ कुळकर्णी यांनी व्यक्त केली.

## लाडक्या बहिणीच्या चेहऱ्यावर हास्य

**| माणगाव | प्रतिनिधी |**

राज्य शासनाच्या महत्त्वाकांक्षी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेमुळे लाखो महिलांच्या आयुष्यात आर्थिक आधाराची नवी किरण निर्माण झाली. घरखर्च, मुलांचे शिक्षण, आरोग्य आणि दैनंदिन गरजा भागवण्यासाठी मिळणाऱ्या या आर्थिक मदतीमुळे अनेक महिलांना आत्मविश्वास मिळाला. त्यामुळे त्यांच्या चेहऱ्यावर हास्य फुलले आहे. मात्र आता या योजनेच्या लाभार्थ्यांची झालेली छाननी अनेक महिलांसाठी धक्कादायक ठरली आहे. रायगड जिल्ह्यात या योजनेसाठी तब्बल ६ लाख २६ हजार ३४ महिलांनी अर्ज दाखल केले होते. त्यापैकी ५ लाख ७६ हजार ३४ महिला पात्र ठरल्या असल्या, तरी जवळपास ५० हजार महिलांना अपात्र ठरविण्यात आले आहे. या आकड्यांमुळे अनेक कुटुंबांमध्ये चिंता आणि संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे.

शासनाने योजनेत पारदर्शकता राखण्यासाठी आणि खऱ्या लाभार्थ्यांपर्यंत मदत पोहोचावी यासाठी ई-केवायसी प्रक्रिया अनिवार्य केली होती. अनेक महिलांनी अर्ज भरला, मात्र आवश्यक कागदपत्रांची पूर्तता, ई-केवायसी अथवा इतर तांत्रिक प्रक्रिया वेळेत पूर्ण न केल्याने त्यांना लाभापासून वंचित राहावे लागले.

## बाळ्यामामांच्या हस्तक्षेपाने भूमिपुत्रांना दिलासा

**| उरण | प्रतिनिधी |**

खासदार सुरेश म्हात्रे (बाळ्यामामा) यांच्या पाठपुराव्यामुळे सिंगापूर पोर्टमधून काही वर्षांपूर्वी कामावरून कमी करण्यात आलेल्या भूमिपुत्र सुरक्षा रक्षकांना पुन्हा रोजगार मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. रायगड सुरक्षा मंडळामार्फत या सुरक्षा रक्षकांना जेएनपीए परिसरात पोस्टिंग देण्याच्या प्रक्रियेला सुरुवात झाली आहे.

मुंबई उच्च न्यायालयाच्या विविध आदेशांनुसार ट्रॅफिक वॉर्डन आणि सुरक्षा रक्षकांच्या रिक्त जागा भरण्याबाबत कार्यवाही करण्याची मागणी सातत्याने होत होती. उरण सामाजिक संस्थेने नवी मुंबई वाहतूक विभागाकडे यासंदर्भात निवेदन दिले होते. त्यानंतर खासदार सुरेश म्हात्रे यांनी संबंधित अधिकाऱ्यांशी संपर्क साधून पाठपुरावा केला.

रायगड सुरक्षा मंडळाने सिंगापूर पोर्टमधील नोंदणीकृत सुरक्षा रक्षकांपैकी काही जणांची निवड प्रक्रिया राबविली होती. त्यामध्ये लखपती परशुराम भोईर आणि ज्ञानेश्वर गजानन पाटील (कुंडेगाव, उरण) यांची निवड करण्यात आली असून त्यांना जेएनपीएमध्ये रुजू करून घेण्यात आले आहे. याशिवाय उर्वरित पात्र भूमिपुत्र सुरक्षा रक्षकांनाही रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न सुरू राहणार असल्याचे संबंधितांनी स्पष्ट केले आहे.

### रामचंद्र सुतार यांचे निधन

**पाली/गोमाशी :** सुधागड तालुक्यातील महागाव येथील ज्येष्ठ समाजसेवक रामचंद्र सुतार यांचा अपघाती मृत्यू शुक्रवारी (दि.१२) झाला. शुक्रवारी झालेल्या या अपघात त्यांना गंभीर दुखापत झाली. उपचारापूर्वीच त्यांची प्राणज्योत



मालवली. त्यांच्या अकस्मात जाण्याने महागाव परिसरात शोककळा पसरली आहे. शेतकरी कामगार पक्षाचे संघटन वाढण्यासाठी नेहमी कार्यरत असायचे.रामचंद्र सुतार हे सामाजिक, राजकीय, क्रीडा आणि शैक्षणिक क्षेत्रात नेहमीच सक्रिय होते. त्यांचे शांत आणि संयमी व्यक्तिमत्त्व सर्वांनाच प्रिय होते.

## नेरळ ग्रामपंचायतीचे आरक्षण जाहीर

**| नेरळ | प्रतिनिधी |**

नेरळ ग्रामपंचायत मधील सार्वत्रिक निवडणुकीसाठी सदस्यांची आरक्षण सोडत काढण्यात आली. १७ जागांसाठी काढण्यात आलेल्या आरक्षण सोडतीत प्रभाग दोन मधील तिन्ही जागा या सर्वसाधारण झाल्याने अनेकांच्या निवडणूक लढवण्याच्या इच्छा पूर्ण होण्याची शक्यता आहे. दरम्यान तालुक्यातील मुदत संपत आलेल्या ३९ ग्रामपंचायत मधील सदस्य पदांचे आरक्षण काढण्यात आले.

मुदत संपलेल्या नेरळ ग्रामपंचायतीची आरक्षण सोडत मंडळ अधिकारी विश्वास गडदे यांच्या अध्यक्षतेखाली काढण्यात आली. या सोडतीत नेरळ ग्रामपंचायतमधील एकूण १७ जागांपैकी एक जागा अनुसुचित जाती,तीन जागा अनुसुचित जमाती आणि चार जागा नागरिकांचा मागास प्रवर्ग साठी आरक्षित ठेवण्यात आल्या आहेत. तर एकूण १७ जागांपैकी नऊ जागा महिलांसाठी राखीव ठेवण्यात आल्या आहेत. सुरुवातीला जात निहाय आरक्षण काढण्यात आले आणि नंतर महिला आरक्षण काढण्यात आले.महिला आरक्षणाची सोडत चिठ्ठी उचलून काढण्यात आली आणि नऊ वर्षाची काव्या लिये हिच्या हस्ते या चिठ्ठ्या काढण्यात आल्या.नेरळ ग्रामपंचायत मधील एकूण लोकसंख्या १८४२९ असून त्यात १२५१ अनुसूचित जातींची तर अनुसूचित जमातीची लोकसंख्या २८८१ इतकी आहे. त्या आरक्षण सोडतीत महिला आरक्षण काढण्यात आले त्यात अनुसूचित जातीमधील एक, अनुसूचित जमातीमधील दोन आणि नागरिकांचा मागास प्रवर्ग मधील एक अशा पाच आणि सर्वसाधारण मधील नऊ पैकी चार जागा या महिला राखीव ठेवण्यात आल्या.

या आरक्षण सोडतीला रायगड जिल्हा परिषदेच्या सदस्या सुनीता मोरे,पंचायत समितीचे सदस्य भगवान चंचे यांची उपस्थिती होती. निवडणूक आरक्षण जाहीर करण्यासाठी आलेल्या मंडळ अधिकारी विश्वास गडदे यांना ग्रामपंचायत प्रशासक सुजित धनगर आणि ग्रामपंचायत अधिकारी अरुण कार्ले यांनी सहकार्य केले. स्थानिक ग्रामस्थांनी गर्दी केली होती.आरक्षण सोडतीत प्रभाग दोन मधील तिन्ही जागा या सर्वसाधारण झाल्याने मोठी उत्सुकता निर्माण झाली आहे.

## कर्जतमध्ये भाताच्या पेरण्या संकटात

**| नेरळ | प्रतिनिधी |**

कर्जत तालुक्यात दहा हजार हेक्टर जमिनीवर खरीप हंगामात भाताची शेती केली जाते.साधारण जून महिन्याचे पहिल्या आठवड्यात भाताचे वाण यांची पेरणी केली जाते.मात्र यावर्षी दुसरा आठवडा उलटला तरी भाताची पेरणी झालेली नाही आणि त्यामुळं कर्जत तालुक्यातील शेतकरी संकटात सापडला आहे.



महाराष्ट्रात साधारणपणे ७ जूनच्या सुमारास मान्सूनचे आगमन होते. संपूर्ण वर्षभराची शेती आणि पाण्याचे नियोजन या जूनमधील पावसावर अवलंबून असते.जूनमध्ये पाऊस आला नाही आणि मान्सूनचे लांबलेले आगमन यामुळे शेतकरी चिंतेत आहे.गतवर्षी मे महिना पाऊस पडत होता आणि नंतर पावसाने विश्रांती घेतली.त्यामुळे अनेक शेतकऱ्यांचे भाताचे वाण एकतर शेतात कुजले आणि अनेक शेतकऱ्यांना दुबार किंवा तिसऱ्यांदा भाताचे वाण शेतात टाकावे लागले होते.मान्सून अद्याप केरळमध्ये वेळेवर पोहोचला नाही, तर त्याचा थेट परिणाम महाराष्ट्रातील आगमनावर झाला आहे. अरबी समुद्रातील हवामानाचे बदल किंवा हिंदी महासागरातील प्रवाहांची गती मंदावल्यामुळे मान्सूनचे आगमन ५ ते १० दिवस उशिरा होते. परिणामी, जूनचे पहिले दोन आठवडे कोरडे गेले आहेत.

एल निनो हा घटक मान्सून रोखण्यास प्रमुख कारणीभूत ठरला असून हवामानशास्त्रामध्ये तो पावसाचा आगमनाला रोखणारा सर्वात मोठा घटक समजला जात आहे. महासागरातील पाण्याचे तापमान जेव्हा सरासरीपेक्षा जास्त वाढते, त्याला एल निनो म्हणतात. याचा परिणाम म्हणून भारतातील मान्सूनचे वारे कम कुवत होतात आणि जून महिन्यात पावसाचे प्रमाण लक्षणीयरीत्या घटते. अरबी समुद्रातील चक्रीवादळ यांनी मान्सूनची दिशा बदलली आहे. ग्लोबल वॉर्मिंगमुळे पावसाचे चक्र पूर्णपणे बदलले आहे असून जून महिन्यात संततधार पाऊस पडायचा, आता मात्र पावसाचे दिवस कमी झाले आहेत. तापमान वाढल्यामुळे ढग तयार होण्याच्या प्रक्रियेत अडथळे आले आहेत.

जूनचे मध्यापर्यंत पाऊस झालेला नाही आणि त्यामुळे खरिपाची पेरणी करता आलेली नाही. अनेकांची धुळपेरणी देखील फुकट गेलेली आजे. उन्हाळ्यामुळे आधीच आटलेले पाण्याचे साठे जूनमध्ये पाऊस अद्याप पडला नाही. त्यामुळे चाऱ्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. जून महिन्यातील निघालेली पावसाची तूट ही प्रामुख्याने एल निनो, चक्रीवादळे आणि जागतिक तापमानवाढ यांसारख्या भौगोलिक आणि पर्यावरणीय घटकांचा परिणाम आहे. निसर्गाचा हा लहरीपणा लक्षात घेता, शेतकऱ्यांनी हवामान खात्याचा अंदाज घेऊनच पेरणीचा निर्णय घ्यावा असे आवाहन कृषी विभागाने केले आहे.

### चंद्रकांत चौधरी यांचे निधन

**नवीन पनवेल :** उत्तरशिव येथील चंद्रकांत (भाई) विश्वनाथ चौधरी यांचे १० जून रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्यावर



स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांचा दशक्रिया विधी १९ जून रोजी नाशिक येथे होणार असून उत्तरकार्य २२ जून रोजी राहत्या घरी उत्तरशिव येथे होणार आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, मुले, सुना, नातू, नात असा मोठा परिवार आहे.

### पोलिसांकडून १ लाख ७० हजाराचा दंड वसूल | दुचाकीस्वारांना हेल्मेट वापरण्याचे आवाहन

## बेशिस्त वाहनचालकांवर कारवाईचा बडगा

**| धाटाव | प्रतिनिधी |**

रोहा पोलिसांनी हेल्मेट न वापरता वाहन चालवणाऱ्या दुचाकी चालकांवर कारवाईचा बडगा उगारला आहे. यामध्ये सुमारे १ लाख ७० हजार रकमेची दंड वसुली करण्यात आली आहे. दरम्यान कारवाई ही मोटरसायकल चालकांच्या सुरक्षिततेसाठी असून सर्वांनी हेल्मेट वापरावे असे आव्हान पोलीस निरीक्षक मारुती पाटील यांनी केले आहे.

रायगड जिल्ह्यामध्ये गेल्या वर्षभरात हेल्मेट न वापरल्याने ७५ मोटर सायकल चालकांच्या मृत्यू झाल्याची घटना घडल्या



आहेत. ही बाब अतिशय गंभीर आहे.नागरिकांना व तरुण वर्गाला स्वतःच्या जीवाची काळजी राहिलेली नाही हेच यावरून दिसून येते.रायगड जिल्हा अधीक्षक आचल दलाल यांच्या आदेशानुसार रोह्याम ध्ये पोलीस निरीक्षक मारुती पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली वाहतूक पोलिसांनी हेल्मेट न वापरणाऱ्यांवर कारवाई सुरू केली आहे.यामध्ये १ हजार रुपये दंडाची रक्कम आहे.ज्या रस्त्यावर काही ठिकाणी अपघात घडतात अशा ठिकाणांना पोलिसांनी स्वतः भेट देत त्या ठिकाणी काही उपाय योजना म्हणून गतिरोधक लावता येतील का याची पाहणी केली. रोह्यात सर्वच ठिकाणी स्पीड ब्रेकर लावणे शक्य नाही.त्यामुळे वाहन चालकांनी ओव्हरटेक करू नये.ओव्हरटेक केल्याने फार वेळ वाचतो असे नाही त्यामुळे आपण वाहन सावकाश चालवली पाहिजे.

आपल्या घरी आपले कुटुंब वाट पाहत आहे याचे भान गाडी चालवताना प्रत्येकाने राखले पाहिजे. १ हजार रुपये दंड भरण्यापेक्षा सहाशे रुपयाचा हेल्मेट घेतला तर आपला जीव नक्कीच वाचेल.पुण्यावरून हेल्मेट घालून आलेल्या इसमाने मेढा रस्त्यावर आल्यावर हेल्मेट काढला व पुढे सदर व्यक्तीचा अपघात झाला जर हेल्मेट असता तर तो वाचला असता अशी झालेली घटनाही याठिकाणी रोह्याचे पोलीस निरीक्षक मारुती पाटील पत्रकारांना सांगितली.

अपघाताच्या वेळी डोक्याला गंभीर दुखापत होऊन अनेकांना आपला जीव गमवावा लागतो,हे भीषण वास्तव समोर ठेवून पोलिसांनी ही मोहीम तीव्र केली आहे.केवळ दंड वसूल करणे हा या कारवाईचा उद्देश नसून,वाहनचालकांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण करणे हा मुख्य हेतू आहे. पोलिसांनी सर्व दुचाकीस्वारांना घराबाहेर पडताना अनिवार्यपणे आयएसआय मार्क असलेले दर्जेदार हेल्मेट वापरण्याचे आवाहन केले आहे.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टा मध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालका कडुन आमचे अशिलांनी कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत कळवावे. मुदती मध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

**मौजे नालधे, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत**

| मालकाचे नांव | सर्व्हे नं. | प्लॉट नं. | क्षेत्र आर.चौ.मी | आकार रु.-पै. |
|---|---|---|---|---|
| १) मानसी शैलेंद्र शिंदे<br>२) शैलेंद्र दिलीप शिंदे | ७९ | ६६ | ५२१.०० | ५२-१० |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

सही/-

**ॲड. भुपेश तानाजी पेमारे**

मो.नं. ९१५८२७७७२८

दिनांक :- १६/०६/२०२६

कार्यालयीन पत्ता :- मु. पो. कशेळे, कर्जत - मुरबाड रोड, सरकारी दवाखान्या समोर, ता. कर्जत, जि. रायगड. ४१०२०१

---

फोन नं. - ७७७६९६००४४

ग्रुप ग्रामपंचायत नागाव

मु.पो.नागाव, ता. अलिबाग, जि. रायगड पिनकोड ४०२२०४

जावक क्र. ४४८ — दिनांक १२/६/२०२६

## जाहिर निविदा

ग्रुप ग्रामपंचायत नागांव ता.अलिबाग, जि. रायगड कडून ग्रामनिधी अंतर्गत खालील प्रमाणे साहित्य पूरवठ्यासाठी जाहीर निविदा मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र | कामाचे नाव | अंदाजित रक्कम | काम पूर्ण करण्याची मुदत | स्त्रोत |
|---|---|---|---|---|
| १ | संगणक खरेदी करणे | २,००,०००/- | ६ महिने | ग्रामनिधी |
| २ | प्रिंटर खरेदी करणे | ७०,०००/- | ६ महिने | ग्रामनिधी |

अटी व शर्ती

१) निविदा दरपत्रके मोहोरबंद पाकीटामध्ये मा. सरपंच ग्रामपंचायत नागांव यांचे नावे दि. १६/०६/२०२६ ते दि. २२/०६/२०२६ रोजी पर्यंत सुट्टीचे दिवस सोडून सकाळी १० ते १ वाजेपर्यंत कार्यालयीन वेळेमध्ये ग्रामपंचायत कार्यालयात स्विकारण्यात येतील.

२) कोणत्याही एक किंवा सर्वच निविदा/दरपत्रके स्वीकारणेचा किंवा नाकारणेचा अधिकार खाली सही करणाऱ्यांनी राखून ठेवला आहे.

३) पत्रव्यवहार केला जाणार नाही.

४) दिलेल्या मुदतीनंतर आलेली निविदा/दरपत्रके स्वीकारली जाणार नाहीत.

५) या कामासाठी आलेल्या निविदा/ दरपत्रके पैकी कोणत्याही निविदा दरपत्रके किंवा सर्व निविदा दरपत्रके कोणतेही कारण न देता फेटाळण्याचे अधिकार राखून ठेवण्यात आले आहेत. आणि निविदा/दरपत्रके पाठविण्याच्या कोणत्याही व्यक्तीला किंवा संस्थेला निविदा दरपत्रके फेटाळण्याबाद्दल स्पष्टीकरण मागता येणार नाही.

६) ग्रामपंचायत कार्यालयात प्राप्त झालेल्या निविदा/दरपत्रके दि. २९/०६/२०२६ रोजी दुपारी ०३ वाजता ग्रामपंचायत कार्यालयात मा. सरपंच यांचे समक्ष उघडण्यात येतील.

सही/-

**सौ. हर्षदा निखील मयेकर**

सरपंच

ग्रुप ग्रामपंचायत नागांव

---

## नोटीस

सर्व जनतेस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालीलप्रमाणे नमुद मौजे आगरकोट, ता.अलिबाग, जि.रायगड येथील मिळकत आमचे अशिल यांनी विद्यमान मालक अर्चना चंदन कोळी यांचेकडून कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदरहू मिळकत ही निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीच्या विद्यमान मालकांनी दिलेला असला तरी, या खरेदी-विक्री व्यवहाराबाबत कोणाचीही कोणतीही हर हरकत दावा, लिज, पोटगी, बक्षिसपत्र, मृत्युपत्र, तारण, ताबा/गहाण इ. स्वरूपाचे हक्क व हितसंबंध असल्यास ते योग्य त्या लेखी पुराव्यासह निम्न स्वाक्षांकीत खरेदीदार यांच्या वकीलांकडे ही जाहिर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत कळवावे. मुदतीत हरकत न आल्यास सदरहू मिळकत ही निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल खरेदी व्यवहार पूर्ण करतील व तद्नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही व अशा हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत हे सर्वांस कळावे

**मौजे आगरकोट, ता. अलिबाग, जि. रायगड**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्रफळ (हे.आर.चौ.मी) | आकार (रू.पैसे) |
|---|---|---|---|
| आगरकोट ता.अलिबाग | ७/१/१ | ०-०७-८०<br>पो.ख. ०-००-९०<br>एकुण ०-०८-७० | ४.९१ |

दिनांक : १५/०६/२०२६

अशिलांची सही

**ॲड. समीर सुरेश नाईक**

जिल्हा न्यायालय रायगड-अलिबाग

ऑफिस पत्ता: फ्लॅट नं. १०३, पहिला मजला, बी विंग, मोरेश्वर अपार्टमेंट

जे.एस.एम कॉलेज जवळ, अलिबाग-रायगड

मोबा. ९७६७०१०९०२

---

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस, वित्तीय संस्था आणि बँका यांना या जाहीर नोटिशीद्वारे सूचित करण्यात येते की, खालील परिशिष्टात नमूद केलेल्या शेतजमिनी या आमच्या अशील श्रीमती कृष्णाबाई बाबू नवाळी (माहेरची कृष्णाबाई रामजी पाटील) (रा.मु.विंधणे, पो.दिघोडे, ता.उरण, जि. रायगड) यांच्या कायदेशीर हक्काच्या असून, या मिळकतींसंदर्भात खालीलप्रमाणे जाहीर ताकीद देण्यात येत आहे:

१. मौजे विंधणे, ता. उरण येथील खालील परिशिष्टात नमूद केलेल्या शेतजमिनी या मूळ कुळ वहिवाटदार आणि पूर्वज कै. धवजी गणा पाटील यांच्या मालकीच्या व कसत असलेल्या 'वडिलोपार्जित एकत्र हिंदू कुटुंबाच्या मिळकती' (Ancestral Joint Hindu Family Properties) आहेत. या सर्व मिळकतींमध्ये आमच्या अशिलांचा कायदेशीर वारस (कै.रामजी धवजी पाटील यांची मुलगी) म्हणून १/२ (अर्धा) अविभक्त हिस्सा आहे. सदर वडिलोपार्जित जमिनींचे कुटुंबात अद्याप कोणतेही कायदेशीर वाटप झालेले नाही.

२. असे असतानाही, कै. काशिनाथ धवजी पाटील यांचे वारस १. श्रीमती पार्वती नरेश पाटील, २. सौ. जागृती नरेश पाटील (घरत), ३. सौ. स्वाती नरेश पाटील (घरत), ४. श्रीमती धनश्री नरेश पाटील (कोळी), ५. कु. योगिता नरेश पाटील, आणि ६. कु. प्रतिक्षा नरेश पाटील (सर्व रा. मु. विंधणे, ता.उरण ) यांनी महसुली रेकॉर्डवर खोट्या फेरफार नोंदी करून व आमच्या अशिलांचा कायदेशीर हक्क व पूर्वखरेदीचा हक्क (Right of Pre-emption) डावलून, यातील सर्व्हे नं. २४/२ ही मिळकत स्वतःला मालक भासवून बेकायदेशीररीत्या त्रयस्थ व्यक्तींना (श्री. मुरकुटे व श्री. थोरात) दस्त क्र. २९४२/२०२३ ( दिनांक २१/०८/२०२३) अन्वये विकली आहे.

३. सदर बेकायदेशीर खरेदीखत व खोटे फेरफार रद्द करण्यासाठी आणि सर्व जमिनींचे कायदेशीर वाटप मिळण्यासाठी आमच्या अशिलांनी संबंधितांना कायदेशीर नोटीस बजावली असून, ते सक्षम दिवाणी न्यायालयात 'वाटप, ताबा आणि खरेदीखत रद्द करणे (Suit for Partition & Cancellation of Sale Deed) यासाठी दावा दाखल करण्याच्या प्रक्रियेत आहेत. आता उर्वरित जमिनींची (१८/८, १८/५ व १६/६/ब) आणि २४/२ ची देखील श्रीमती पार्वती नरेश पाटील व इतर वारस परस्पर विल्हेवाट लावण्याच्या किंवा त्यावर त्रयस्थ व्यक्तीचे हक्क निर्माण करण्याच्या प्रयत्नात असल्याचे आमच्या अशिलांच्या निदर्शनास आले आहे.

त्यामुळे, या जाहीर नोटिशीद्वारे सर्वसामान्य जनता, विकासक, वित्तीय संस्था, बँका आणि इतर सर्व संबंधितांना सक्त ताकीद देण्यात येते की, कोणीही व्यक्ती किंवा संस्थेने खालील परिशिष्टात नमूद केलेल्या कोणत्याही मिळकतीबाबत श्रीमती पार्वती नरेश पाटील आणि त्यांचे इतर वारस किंवा त्यांचे कोणतेही प्रतिनिधी यांच्याशी खरेदी-विक्रीचा, साठेखताचा, भाडेपट्ट्याचा, गहाणखताचा, बक्षीसपत्राचा विकासाचा (Development Agreement) किंवा इतर कोणताही आर्थिक अथवा कायदेशीर व्यवहार करू नये.

तसे केल्यास, तो व्यवहार आमच्या अशिलांवर कायदेशीररीत्या बंधनकारक राहणार नाही आणि सुरुवातीपासूनच बेकायदेशीर (Void ab initio) मानला जाईल. सदर बेकायदेशीर व्यवहारातून उद्भवणाऱ्या सर्व धोक्यांना, आर्थिक नुकसानीस व कायदेशीर परिणामांना ती व्यक्ती/संस्था स्वतः जबाबदार राहील. याची गंभीर नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन ''परिशिष्ट''**

रायगड जिल्ह्यातील, उरण तालुक्यातील आणि दुय्यम निबंधक उरण यांच्या कार्यक्षेत्रातील मौजे विंधणे येथील वडिलोपार्जित एकत्र हिंदू कुटुंबाच्या शेतजमीन मिळकती : सर्व्हे नं.: २४/२ (क्षेत्र ०-१६-२०), सर्व्हे नं. : १८/८ (क्षेत्र ०-०९-१०), सर्व्हे नं. : १८/५ ( क्षेत्र ०-३२-४०), सर्व्हे नं. : १६/६/ब

**(विनोद यु.शिंदे)**

ॲडव्होकेट

ऑ. ५ आणि ६, ऑरा लेक्सिस्का,

प्लॉट नं. ६, सेक्टर १७, खांदा कॉलनी,

नवीन पनवेल (पश्चिम) ४१० २०६.

मो. ९५९४६५९९६५ ई मेल: vshinde1908@gmail.com

---

## जाहीर नोटीस

**या नोटीसव्दारे कळविण्यात येते की, मौजे-हातनोली, तालुका-खालापुर, जिल्हा रायगड, येथील (१) सव्व्हे / हिस्सा क्रमांक-६४/१/ब, क्षेत्र सुमारे ०-९६-३० हे. आर. पी., पोटखराबा ०-२०-५० हे. आर. पी., एकूण क्षेत्र १-१६-८० हे. आर. पी. (२) सर्व्हे/हिस्सा क्रमांक-६४/१/अ, क्षेत्र सुमारे ०-२५-९० हे. आर. पी., पोटखराबा ०-०५-५० हे. आर. पी., एकूण क्षेत्र ०-३१-४० हे. आर. पी. (३) सर्व्हे/हिस्सा क्रमांक-६३/१/ब, क्षेत्र सुमारे ०-०६-१० हे. आर. पी., पोटखराबा ०-०१-८० हे. आर. पी., एकूण क्षेत्र ०-०७-९० हे. आर. पी. (४) सर्व्हे/हिस्सा क्रमांक-६३/१/अ/२, क्षेत्र सुमारे ०-२३-३० हे. आर. पी., पोटखराबा ०-०२-५० हे. आर. पी., एकूण क्षेत्र ०-२५-८० हे. आर. पी. (५) सर्व्हे/हिस्सा क्रमांक-६३/१/अ/१/अ, क्षेत्र सुमारे ०-२८-४० हे. आर. पी., पोटखराबा ०-०४-१० हे. आर. पी., एकूण क्षेत्र ०-३२-५० हे. आर. पी. आणि (६) सर्व्हे/हिस्सा क्रमांक-६२/४/ब/१, क्षेत्र सुमारे ०-३७-२० हे. आर. पी., पोटखराबा ०-०१-५० हे. आर. पी., एकूण क्षेत्र ०-३८-७० हे. आर. पी. क्षेत्राच्या जमिनी फरझाना इकबाल खान आणि मोहम्मद इकबाल अफाक खान यांच्या मालकीच्या असून, सदर जमिनींच्या मिळकतीबाबत आमचे अशिल हे मूळ मालक यांच्याबरोबर विकसनाचा व्यवहार करण्यास इच्छुक आहेत.**

**सदर वर वर्णन केलेल्या जमीन मिळकतीवर जर कोणत्याही व्यक्तीचा विक्री, गहाण, दान, बक्षीस, लिज, पोटगी, कोर्ट, जप्ती, वहिवाट अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क, दावा असा हितसंबंध असल्यास त्यांनी सदरची जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांच्या आत योग्य त्या कागदपत्रांनिशी पूराव्यासह लेखी हरकत माझ्या कार्यालयीन पत्ता-४०६, शेल्टन क्युबिक्स, भूखंड क्रमांक ८७, सेक्टर क्रमांक १५, सी. बी. डी., बेलापुर, नवी मुंबई-४०० ६१४, या पत्त्यावर पाठवावी, जर १५ (पंधरा) दिवसांच्या आत कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास सदर जमीन मिळकत ही पूर्णपणे निर्वेध आहे, असे समजून अथवा कोणाचे हक्क, हितसंबंध असल्यास ते त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिलेले आहेत, असे समजून आमचे अशिल हे सदर जमिनींच्या मिळकतीबाबतचा विकसनाचा पुढील व्यवहार पूर्ण करतील याची नोंद घ्यावी**

**दिनांक : १६ जून २०२६**

**सही/-**

**श्री. सुनिल जे. गर्ग**

**वकील**

---

## जाहीर नोटीस

**या नोटीसव्दारे कळविण्यात येते की, मौजे-हातनोली, तालुका-खालापुर, जिल्हा-रायगड, येथील सर्व्हे/हिस्सा क्रमांक-६४/२, क्षेत्र सुमारे ०-१८-०० हे. आर. पी., क्षेत्राची जमीन (१) फरझाना इकबाल खान (२) मोहम्मद इकबाल आफाक खान (३) मोहम्मद नोमान इकबाल खान आणि (४) मोहम्मद फरहान इकबाल खान यांच्या मालकीची असून, सदर जमिनीच्या मिळकतीबाबत आमचे अशिल हे मूळ मालक यांच्याबरोबर विकसनाचा व्यवहार करण्यास इच्छुक आहेत.**

**सदर वर वर्णन केलेल्या जमीन मिळकतीवर जर कोणत्याही व्यक्तीचा विक्री, गहाण, दान, बक्षीस, लिज, पोटगी, कोर्ट, जप्ती, वहिवाट अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क, दावा असा हितसंबंध असल्यास त्यांनी सदरची जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांच्या आत योग्य त्या कागदपत्रांनिशी पूराव्यासह लेखी हरकत माझ्या कार्यालयीन पत्ता-४०६, शेल्टन क्युबिक्स, भूखंड क्रमांक ८७, सेक्टर क्रमांक १५, सी. बी. डी., बेलापुर, नवी मुंबई-४०० ६१४, या पत्त्यावर पाठवावी, जर १५ (पंधरा) दिवसांच्या आत कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास सदर जमीन मिळकत ही पूर्णपणे निर्वेध आहे, असे समजून अथवा कोणाचे हक्क, हितसंबंध असल्यास ते त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिलेले आहेत, असे समजून आमचे अशिल हे सदर जमिनींच्या मिळकतीबाबतचा विकसनाचा पुढील व्यवहार पूर्ण करतील याची नोंद घ्यावी**

**दिनांक : १६ जून २०२६**

**सही/-**

**श्री. सुनिल जे. गर्ग**

**वकील**

---

## ग्रामपंचायत दहिवली तर्फे गोवेले

**ता. माणगाव, जि रायगड**

**निविदा सूचना**

ग्रा.पं. दहिवली तर्फे गोवेले खालील कामाकरिता जास्तीत जास्त नोंदणीकृत, इच्छित ठेकेदाराकडून लिफाफा पद्धतीने मोहरबंद निविदा मागविण्यात येत आहे. स्था. प्र. दि. १३/०६/२०२६

| अ क्र | कामाचे नाव/वस्तूचे नाव | अंदाजपत्रक रक्कम | काम पूर्ण करावयाचा कालावधी | निविदा सादर करणेचा वेळ: अंतिम तारीख | वेळ | ठिकाण | १% इसारा रक्कम | कोरे निविदा फॉर्म फी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | दहिवली येथे गटाराचे काम करणे | १९४४२७/- | ३ महिने | २२/०६/२०२६ | स.१०.०० वा पर्यंत | ग्रा.पं. कार्यालय | १९४४/- | २००/- |
| २ | दहिवली मोहल्ला येथे अंतर्गत रस्ता करणे | १०००००/- | ३ महिने | २२/०६/२०२६ | स.१०.०० वा पर्यंत | ग्रा.पं. कार्यालय | १०००/- | २००/- |
| ३ | दहिवली मराठ आळी येथे अंतर्गत रस्ता करणे | १०००००/- | ३ महिने | २२/०६/२०२६ | स.१०.०० वा पर्यंत | ग्रा.पं. कार्यालय | १०००/- | २००/- |

**अटी व शर्ती**

१) प्राप्त निविदा दि. २३/०६/२०२६ रोजी स. ठीक १०.०० वाजता ग्रा.पं. दहिवली तर्फे गोवेले येथे उपस्थितांच्या समक्ष मा. सरपंच यांच्या हस्ते उघडणेत येईल.

२) कोणतेही एक अथवा अनेक निविदा कोणतेही कारण न देता नाकारणेचा अधिकार सरपंच दहिवली तर्फे गोवेले यांनी राखून ठेवला आहे.

३) प्रत्येक देयकाकडून शासन नियमाप्रमाणे रकमा कपात केल्या जातील. मा. उपअभियंता सा़ो. बांधकाम उपविभाग माणगाव यांचेकडील तांत्रिक अधिकारी व पं.स. माणगाव बांधकाम अभियंता तसेच ग्रा. पं.चे पदाधिकारी/सदस्य यांचेमार्गदर्शन व देखरेखीखाली सदर काम करणेचे असून, काम समाधानकारक नसेल तर त्याच स्थितीत थांबून कार्यारंभ आदेश रद्द करणेचा अधिकार ग्रा. पं. ने राखून ठेवला आहे.

४) काम अंतिम रित्या पूर्ण झाल्यानंतर ६ महिन्या नंतर कामाची स्थिती पाहून कपात केलेली सुरक्षा अनामत परत केली जाईल.

५) नोंदणीकृत ठेकेदार उपलब्ध न झाल्यास स्थानिक ठेकेदारांच्या निविदांचा विचार केला जाईल.

सही/-

**ग्रामपंचायत अधिकारी**
**ग्रामपंचायत दहिवली/गोवेले**
**ता. माणगांव जि. रायगड**

**सरपंच**
**ग्रामपंचायत दहिवली/ गोवेले**
**ता. माणगांव जि. रायगड**

---

## ग्रुप ग्रामपंचायत पळसगाव बु. माणगाव, ता. माणगांव, जि. रायगड.

## जाहीर निविदा

दिनांक :- १६/०६/२०२६

ग्रुप ग्रामपंचायत पळसगाव बु. यांचेकडील/स्वनिधी अंतर्गत खालील कामांकरिता अधिकृत ठेकेदार यांचेकडून जाहीर निविदा मागविणेत येत आहेत.

| अ क्र. | कामांचे नांव | कामांचे परिमाण संख्या | निधी स्त्रोत रक्कम | अंदाजपत्रकीय फॉर्म फी | निविदा फी (रू.) | इसारा फी १% (रू.) | निविदा स्विकारण्याचा अंतिम दिनांक व वेळ | निविदा उघडणेचा दिनांक व वेळ | काम पूर्ण करणेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पळसगाव बु. आंग्रेवाडी विहीर दुरुस्ती व गाळ काढणे | ०१ | ग्रामपंचायत फंड सन २०२६-२७ | ५००००/- | २०० | ५०० | २३/०६/२०२६ वेळ स.१०.०० ते सायं. ५.०० वा. | २४/०६/२०२६ | ३ महिने |
| २ | घरोशी पाणी साठवण टाकी दुरुस्ती. | ०१ | ग्रामपंचायत फंड सन २०२६-२७ | ५००००/- | २०० | ५०० | २३/०६/२०२६ वेळ स.१०.०० ते सायं. ५.०० वा | २४/०६/२०२६ | ३ महिने |

अटी व शर्ती : १) निविदा संबंधी सविस्तर माहिती ग्रामपंचायत कार्यालयात कार्यालयीन वेळेत पहावयास मिळेल. २) निविदा स्विकृती अंतिम दि. २३/०६/२०२६ असून अपूर्ण व उशिरा पोहोचलेल्या निविदांचा ग्रामपंचायत विचार करणार नाही. ३) निविदेसोबत अनामत रक्कम भरणा पावती/चलन जोडलेली असावी. ४) कोणतेही कारण न देता एक किंवा सर्व निविदा नाकारण्याचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे. ५) कामाच्या अंदाजपत्रकानुसार काम करणे बंधनकारक राहील. ६) निविदा मंजुरीअंती ठेकेदार/पुरवठादार यांस रीतसर करारनामा करून द्यावा लागेल. ७) कार्यारंभ आदेश प्राप्त झाल्यापासून विहित केलेल्या मुदतीचे कालावधीत काम पूर्ण करणे बंधनकारक राहील. अन्यथा नियमानुसार दंड व शास्ती लागू करणेत येईल. ८) साहित्य/वस्तू यांचा दर्जा व गुणवत्ता चांगली असावी. ९) शासनाकडून प्राप्त निधीच्या उपलब्धतेनुसार देयके अदा केली जातील. १० ठेकेदार/पुरवठादार यांचे बँक खाते राष्ट्रीयकृत बँकेत असावे व PFMS प्रणालीशी संलग्न असावे. ११) कामाच्या देयकातून सर्व शासकीय कपाती वजा करून देयक अदा केले जाईल. १२) मा. उपअभियंता (ग्रा.पा.पु/बांधकाम) उपविभाग माणगांव यांचे तांत्रिक मार्गदर्शनानुसार व मा.सरपंच ग्रा.पं. पळसगाव बु. यांचे देखरेखीखाली कामे पूर्ण करावयाची आहेत.

सही/-
**श्रीम. ऋतुजा बा. साळुंख**
ग्रामपंचायत अधिकारी
ग्रुप ग्रामपंचायत पळसगांव बु.
ता.माणगाव जि.रायगड

सही/-
**सौ. सोनाली नि.आंब्रे**
सरपंच
ग्रामपंचायत पळसगांव बु.
ता. माणगाव जि.रायगड

---

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे - टेकाळी, ता. अलिबाग, जि. रायगड येथील गट नं. ११, क्षेत्र ०-२४-६० हे. आर., पो.ख. ०-००-४० हे. आर ., एकूण क्षेत्र ०-२५-०० हे. आर., आकार ४.०० रू. पै. ही भातशेती मिळकत, या मिळकतीचे विद्यमान मालक सुनिता बळीराम वाघमारे रा. मु. फकीरपाडा, पो. झिराड ता. अलिबाग, जि. रायगड यांच्याकडुन आमच्या अशिलांनी सर्व हक्कांसह विकत घेण्याची ठरविलेली आहे. सदरहू मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिल यांस दिला आहे. याउपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसाहक्क व हितसंबंध वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार खरेदीदार यांचे वकिल यांजकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग,

तारीख : १५/०६/२०२६

**(ॲड. संजय द. म्हात्रे)**

पत्ता-श्रुती सारंग को.ऑप.हौ.सो.,ए विंग, रूम नं. ५, युनियन बँकेच्या समोर, ब्राम्हण आळी, अलिबाग, ता. अलिबाग जि. रायगड.

---

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मौजे देवघर, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाची जमिन मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक आसावरी अमोल भोसले यांचे कडुन कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.चौ.मी) | आकार (रू.पै) |
|---|---|---|---|
| देवघर, ता.अलिबाग | २५७ | ०-२१-१० जिरायत<br>०-००-५० पो.ख.<br>०-२१-६० एकुण | ६.०६ |

वर वर्णन केलेली जमिन मिळकत सदर नोटीसीचा विषय आहे.

सदरची मिळकत ही त्यांचे निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून, ती विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर, कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क या अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १५ (पंधरा) दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यासहीत लेखी स्वरूपात आणून देण्यात यावे. मुदतीत कोणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्काची आहे व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असुनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडुन दिला आहे. असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे

ठिकाण - अलिबाग

दिनांक -१५/०६/२०२६

**ॲड. विराज शरद अंबुकर**

रा.थेरोंडा, ता.अलिबाग, जि.रायगड

मोबा. क्र.९०२८८५१२८०

---

## जाहीर नोटीस

सर्व नागरीकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली जमिन मिळकत तिचे मालक श्री. संजीव भास्कर पाटील रा. वशेणी, ता. उरण, जि. रायगड यांचेकडुन विकत घेण्याचे ठरविले आहे त्या मिळकतीचे वर्णन पुढील प्रमाणे.

**जमिन मिळकतीचे वर्णन**

**मौजे मोग्रज, ता. कर्जत, जि. रायगड.**

| स.नं./हि.नं. | क्षेत्र हे. आर. पॉ. | आकार(रू.पै.) |
|---|---|---|
| १३/२/ब/१ | एकुण क्षेत्र ०-२५-०० | ०-२० |

सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत असल्याचा दावा विद्यमान मालक यांनी आमच्या अशिलांना केलेला आहे.

तरी वरील मिळकतीमध्ये अन्य कोणाचाही, कसलाही हक्क, हितसंबंध, बोजा, अथवा, गहाण, दान, लिज, पोटगी, हवाला, साठेकरार, विक्री करार, खरेदी मेन्टेनन्स, मेहेर, वारसाहक्क, लिन, चार्ज, ताबा, वहिवाट, इजमेंट हक्क, बँक लोन, वगैरेबाबत कसलाही हक्क व हितसंबंध अथवा हरकत वा तक्रार असल्यास अशा व्यक्तींनी सदर हरकतीबाबत त्या हरकतीसंबंधीच्या लेखी कागदोपत्री पुराव्यासह आपली तक्रार अगर हरकत खाली सही करणार यांच्याकडे नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत आणून द्यावी. सदर मुदतीत तक्रार वा हरकत न आल्यास सदरचा व्यवहार आमचे अशिल पुर्ण करतील व मागाहून येणारी हरकत आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी. मागाहून येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही हे सर्वांस कळावे.

ठिकाण: कर्जत

दिनांक : १६/०६/२०२६

सही /-

**ॲड. गीतांजली जी. फुलावरे.**

कार्यालय पत्ता: ''मधुतारा बिल्डींग'' गाळा नं.३

कचेरी रोड, कर्जत, ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१

मो. ८८८८०४५३७६/८६००३५२९८२

---

## जाहीर सुचना

सर्व लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की आमचे अशिल यांनी खालील वर्णनाची मिळकत तिचे मालक श्री शाहनाजी रुस्तम आरेस्तानी उर्फ शाहनाज बिजाज आरेस्तानी यांच्याकडुन कायमचे खरेदी करण्याचे ठरविले आहे.

**जमिन मिळकतीचे वर्णन**

**मौजे टाकवे, ता कर्जत जि रायगड येथील मिळकत**

वरील जमीन मिळकत सर्व्हे नं ९/४ एकुण ०.२०.०० गुंठे जागा विकत घेणार आहेत. तरी जमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाणखत, दान, भाडेपट्टा, लीज अथवा इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास आणि त्यांची आमचे अशिलाच्या खरेदीच्या व्यवहारात हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १० दिवसाच्या आत लेखीपुराव्यासह खाली नमुद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मिळकतीशी कोणतीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसलेही प्रकारचा हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलाच्या लाभात सोडुन दिलेला असुन त्यांनी आमचे अशिलाच्या खरेदीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

येणेप्रमाणे जाहीर सुचना आहे.

दिनांक : १६/०६/२०२६

**ॲड. देविदास यशवंत देवघरे**

पत्ता मु.पो कडाव ता कर्जत रायगड

भ्रमणध्वनी ९०२८५९२७९८

---

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मौजे नागांव, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाची जमिन मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक सोनाली दिलीप आचरेकर यांचे कडुन कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पै) |
|---|---|---|---|
| नागांव, ता.अलिबाग | २३६३ | ०-१५-३० बागायत<br>०-०३-७० पो.ख.<br>०-१९-०० एकुण | ७.१६ |

वर वर्णन केलेल्या मिळकतीमध्ये सोनाली दिलीप आचरेकर यांच्या नावे असणारे एकुण क्षेत्र ०-११-०० हे.आर., आकार ५ रू १५ पैसे या जमिन मिळकतीपैकी ०-०५-५० हे.आर., हि जमिन मिळकत या नोटीसीचा विषय आहे.

सदरची मिळकत ही त्यांचे निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून, ती विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर, कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क या अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १५ (पंधरा) दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यासहीत लेखी स्वरूपात आणून देण्यात यावे. मुदतीत कोणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्काची आहे व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असुनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडुन दिला आहे. असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे

ठिकाण- अलिबाग

दिनांक १५/०६/२०२६

**ॲड. राहूल रमेश नाईक**

मु.पो.नागांव, ता.अलिबाग,

जि.रायगड मोबा. क्र.९९२२७९८५२८

---

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की,

मौजे किहीम ता.अलिबाग, जि.रायगड येथील खालील नमूद जमिन मिळकत ही आमचे अशिल यांनी मिळकतीचे विद्यमान मालक श्री बाळकृष्ण केशन भिसे वगैरे यांचेकडुन खरेदी घेण्याचे ठरविलेले आहे.

**मिळकतींचे वर्णन**

| गट क्रमांक | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पैसे) |
|---|---|---|
| जुना ७३२<br>नवीन ३३२ | १-१६-४०<br>पैकी द्विपक्षी यांचे मालकीचे<br>०-४५-० गुंठे मिळकत | १६.५६ |

वरील मिळकती बाबत अन्य कोणाचाही कसलाही हक्क हितसंबंध बोजा, अथवा, गहाण, दान, लिज, पोटगी, बक्षिसपत्र, साठेकरार, भाडेपट्टाकरार, खरेदी मेन्टेनस, मेहेर, कर्ज वगैरे बाबतचा कसलाही हक्क व हितसंबंध अथवा विक्री व्यवहारास हरकत असल्यास अशा व्यक्तींनी सदर हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह आपल्या हरकती खाली सही करणार यांच्याकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत आणून द्यावी. सदर मुदतीत हरकत न आल्यास सदरचा व्यवहार आमचे अशिल पूर्ण करतील व मागाहून येणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही हे सर्वांना कळावे.

अलिबाग

तारीख १५/०६/२०२६

**ॲड. रेखा किरण वाघ**

R/o- B-6, Jewels of Alibag. Vidyanagar, Alibag, Dist-Raigad, Mob-9850811391

---

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस, या जाहीर नोटिशीद्वारे सूचित करण्यात येते की, खालील परिशिष्टात नमूद केलेली जमीन मिळकत ही आमच्या अशील श्रीमती पुष्पा अरुण नारंगीकर (रा. मु. विंधणे, पो. दिघोडे, ता. उरण, जि. रायगड) यांच्या कायदेशीर हक्काची आणि प्रत्यक्ष वहिवाटीतील मिळकत आहे.

आमच्या अशिलांनी सदर मिळकत १. श्रीमती पार्वती नरेश पाटील, २. कु. जागृती नरेश पाटील, आणि ३. कु. धनश्री नरेश पाटील (सर्व रा. मु. विंधणे, पो. दिघोडे, ता. उरण, जि. रायगड) यांच्याकडून दिनांक २७ जानेवारी २०१० रोजीच्या साठेखतान्वये (Agreement to Sale) विकत घेतलेली आहे.

सदर साठेखतानुसार आमच्या अशिलांनी मिळकतीचा संपूर्ण मोबदला त्याच वेळी अदा केलेला आहे आणि सदर मिळकतीचा प्रत्यक्ष, भौतिक आणि मोकळा ताबा आमच्या अशिलांना मिळालेला आहे. तेव्हापासून आमच्या अशिलांनी या मिळकतीवर स्वखर्चाने पक्के घर बांधले असून, त्या मिळकतीचा मालक म्हणून त्या सलग, उघड आणि शांततापूर्ण ताब्यात आहेत. मालमत्ता हस्तांतरण कायदा, १८८२ च्या कलम ५३ अ (Doctrine of Part Performance) नुसार आमच्या अशिलांच्या हक्कांचे पूर्णपणे कायदेशीर संरक्षण झालेले आहे.

असे असतानाही, श्रीमती पार्वती नरेश पाटील व इतर यांनी संगनमत करून लबाडीने व बेकायदेशीरपणे सदर मिळकतीचे बक्षीसपत्र कु. धनश्री नरेश पाटील हिच्या नावे करून घेतले आहे आणि त्या आधारे महसुली रेकॉर्डवर फेरफार क्र. ६७४७ (दिनांक २४/०१/२०२६) नोंदवून घेतला आहे. आता सदर व्यक्ती आमच्या अशिलांचे कायदेशीर हक्क डावलून या मिळकतीची परस्पर विल्हेवाट लावण्याच्या विक्री करण्याच्या किंवा त्यावर त्रयस्थ व्यक्तीचे हक्क निर्माण करण्याच्या प्रयत्नात असल्याचे आमच्या अशिलांच्या निदर्शनास आले आहे. आमच्या अशिलांनी या बेकायदेशीर कृत्याविरोधात त्यांना कायदेशीर नोटीस बजावली असून, सक्षम दिवाणी न्यायालयात दाद मागण्याची प्रक्रिया सुरू केली आहे.

त्यामुळे, या जाहीर नोटिशीद्वारे सर्व जनता, विकासक, वित्तीय संस्था, बँका, गुंतवणूकदार आणि इतर सर्व संबंधितांना सक्त ताकीद देण्यात येते की, कोणीही व्यक्ती किंवा संस्थेने सदर मिळकतीबाबत श्रीमती पार्वती नरेश पाटील, कु. जागृती नरेश पाटील, कु. धनश्री नरेश पाटील किंवा त्यांचे कोणतेही प्रतिनिधी यांच्याशी खरेदी-विक्रीचा, साठेखताचा, भाडेपट्ट्याचा, गहाणखताचा, बक्षीसपत्राचा किंवा इतर कोणताही आर्थिक अथवा कायदेशीर व्यवहार करू नये. तसे केल्यास तो व्यवहार आमच्या अशिलांवर कायदेशीररीत्या बंधनकारक राहणार नाही. आणि सदर बेकायदेशीर व्यवहारातून उद्भवणाऱ्या सर्व धोक्यांना, आर्थिक नुकसानीस व कायदेशीर परिणामांना ती व्यक्ती/संस्था स्वतः जबाबदार राहील. याची गंभीर नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन ''परिशिष्ट''**

रायगड जिल्ह्यातील, उरण तालुक्यातील आणि दुय्यम निबंधक उरण यांच्या कार्यक्षेत्रातील मौजे विंधणे येथील जमीन मिळकत :

- गट/स.क्र. : १८/८
- क्षेत्र ०-०८-३ हे. आर (पोटखराबा ०-००-८)
- आकार: रु. १.६९

**(विनोद यु. शिंदे)**

ॲडव्होकेट

ऑ. ५ आणि ६, ऑरा लेक्सिस्का,

प्लॉट नं. ६, सेक्टर १७, खांदा कॉलनी,

नवीन पनवेल (पश्चिम) ४१० २०६.

मो.नं. ९५९४६५९९६५

ई मेल :vshinde1908@gmail.com

---

## अलिबाग नगर परिषद ता.अलिबाग जि.रायगड

## ई-निविदा सुचना क्र. ०८ सन २०२६-२७ (पहिली वेळ)

**हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे नागरी लोककल्याण अभियान**

अलिबाग नगर परिषद जिल्हा रायगड करीता मुख्याधिकारी अलिबाग नगर परिषद यांचे कडून बांधकाम विभाग अंतर्गत योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदाराकडुन ब-१ नमुन्यातील अलिबाग नगरपरिषद हद्दीतील मराठी शाळा क्र.१ व २ च्या परिसरात स्टेजचे बांधकाम व शाळेच्या इमारतीवरील टेरेस वर शेडचे बांधकाम करणे या कामा करिता ई-निविदा प्रणालीद्वारे दिनांक १६/०६/२०२६ ते २४/०६/२०२६ पर्यंत मागवित आहेत.

टिप:- वरील निविदे मध्ये (०१) कामे समाविष्ट असुन कामाची संपुर्ण माहिती खालील प्रमाणे संकेत स्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

https://www.mahatenders.gov.in

स्वा/-

**मुख्याधिकारी**

**अलिबाग नगरपरिषद जि.रायगड**

---

## जाहीर नोटीस

सर्व नागरीकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेल्या बिनशेती प्लॉट मिळकती तिचे मालक १) सुनिल दादा कदम, २) श्री. विठ्ठल मोहन कदम रा. पुणे, यांचेकडुन विकत घेण्याचे ठरविले आहे त्या मिळकतींचे वर्णन पुढील प्रमाणे.

**बिनशेती प्लॉट मिळकतींचे वर्णन**

**मौजे शिलार, ता. कर्जत, जि. रायगड.**

| भुमापन क्र./ उपविभाग | क्षेत्र चौ.मी | आकार रू. पै. |
|---|---|---|
| २१/४/१ | क्षेत्र ३०० चौ.मी | ३०-०० |
| २१/४/२ | क्षेत्र २४२ चौ.मी | २४-२० |
| २१/४/३ | क्षेत्र ३०४ चौ.मी | ३०-४० |
| २१/४/४ | क्षेत्र २४७ चौ.मी | २४-७० |
| २१/४/५ | क्षेत्र २२८ चौ.मी | २२-८० |
| २१/४/६ | क्षेत्र ४७१ चौ.मी | ४७-१० |
| २१/४/७ | क्षेत्र ३८४ चौ.मी | ३८-४० |
| २१/४/८ | क्षेत्र ४०० चौ.मी | ४०-०० |
| २१/४/९ | क्षेत्र ४३२ चौ.मी | ४३-२० |
| २१/४/१० | क्षेत्र ३०० चौ.मी | ३०-०० |
| २१/४/११ | क्षेत्र २३० चौ.मी | २३-०० |
| २१/४/१२ | क्षेत्र २१६ चौ.मी | २१-६० |
| २१/४/१३ | क्षेत्र २६१ चौ.मी | २६-१० |
| २१/४/१४ | क्षेत्र २१४ चौ.मी | २१-४० |
| २१/४/१५ | क्षेत्र ३१७ चौ.मी | ३१-७० |
| २१/४/१६ | क्षेत्र १८१ चौ.मी | १८-१० |
| २१/४/१७ | क्षेत्र २५२ चौ.मी | २५-२० |
| २१/४/१८ | क्षेत्र २४२ चौ.मी | २४-२० |
| २१/४/१९ | क्षेत्र २८६ चौ.मी. | २८-६० |
| २१/४/२० | क्षेत्र ३४५ चौ.मी | ३४-५० |
| २१/४/२१ | क्षेत्र २९८ चौ.मी | २९-८० |
| २१/४/२२ | क्षेत्र २८६ चौ.मी | २८-६० |
| २१/४/२३ | क्षेत्र २९७ चौ.मी | २९-७० |
| २१/४/२४ | क्षेत्र २८६ चौ.मी | २८-६० |
| २१/४/२५ | क्षेत्र २९९ चौ.मी | २९-९० |
| २१/४/२६ | क्षेत्र २८६ चौ.मी | २८-६० |
| २१/४/२७ | क्षेत्र ३१२ चौ.मी | ३१-२० |
| २१/४/२८ | क्षेत्र १३९० चौ.मी | ०-०० |
| २१/४/२९ | क्षेत्र ३३१० चौ.मी | ०-०० |
| २१/४/३० | क्षेत्र १०७० चौ.मी | ०-०० |
| २१/४/३१ | क्षेत्र ११४ चौ.मी | ०-०० |

सदर मिळकती निर्वेध व बोजारहीत असल्याचा दावा विद्यमान मालक यांनी आमच्या अशिलांना केलेला आहे.

तरी वरील बिनशेती प्लॉट मिळकतींमध्ये अन्य कोणाचाही, कसलाही हक्क, हितसंबंध, बोजा, अथवा, गहाण, दान, लिज, पोटगी, हवाला, साठेकरार, विक्री करार, खरेदी मेन्टेनन्स, मेहेर, वारसाहक्क लिन, चार्ज, ताबा, वहिवाट, इजमेंट हक्क, बँक लोन, वगैरेबाबत कसलाही हक्क व हितसंबंध अथवा हरकत वा तक्रार असल्यास अशा व्यक्तींनी सदर हरकतीबाबत त्या हरकतीसंबंधीच्या लेखी कागदोपत्री पुराव्यासह आपली तक्रार अगर हरकत खाली सही करणार यांच्याकडे नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत आणून द्यावी. सदर मुदतीत तक्रार वा हरकत न आल्यास सदरचा व्यवहार आमचे अशिल पुर्ण करतील व मागाहून येणारी हरकत आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी. मागाहून येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही हे सर्वांस कळावे.

ठिकाण : कर्जत

दिनांक : १६/०६/२०२६

सही /-

**ॲड.गीतांजली जी. फुलावरे.**


कार्यालय पत्ता : ''मधुतारा बिल्डींग'' गाळा नं.३

कचेरी रोड, कर्जत, ता. कर्जत, जि. रायगड

४१०२०१ मो.८८८८०४५३७६/८६००३५२९८२

# निवडक

## कूपरने वाचवली ऑस्ट्रेलियाची प्रतिष्ठा




**मिरपूर :** ऑस्ट्रेलिया क्रिकेट संघाने बांगलादेशविरुद्धच्या तीन सामन्यांच्या वनडे मालिकेतील अंतिम सामना एका विकेटने जिंकून आपली प्रतिष्ठा वाचवली. पहिले दोन वनडे सामने जिंकून बांगलादेशने मालिकेत आधीच २-० अशी अभेद्य आघाडी घेतली होती. तिसऱ्या वनडे सामन्यात क्लीन स्वीप करण्याच्या तयारीत होते. प्रथम फलंदाजी करताना बांगलादेशने ५० षटकांत २७४ धावा केल्या, ज्याचा पाठलाग ऑस्ट्रेलियाने ९ गडी गमावून आणि तीन चेंडू शिल्लक असताना पूर्ण केला. कूपर कॉनॉलीने १४९ धावा करुन फलंदाजीत ऑस्ट्रेलियाच्या विजयात महत्त्वाची भूमिका बजावली. कूपर कॉनॉलीने बांगलादेशविरुद्धच्या तिसऱ्या वनडे सामन्यात केवळ आपले पहिले शतकच झळकावले नाही, तर तो एका विशेष यादीचा भागही बनला. वनडे क्रिकेटच्या इतिहासात १४९ धावांवर बाद होणारा कॉनॉली आता केवळ पाचवा खेळाडू ठरला आहे. कॉनॉलीनं या सामन्यात १३४ चेंडूंचा सामना करत १३ चौकार आणि ६ षटकार मारले. लक्ष्याचा पाठलाग करताना ऑस्ट्रेलियन संघ नियमित अंतराने विकेट गमावत असताना, कूपर कॉनॉलीने एक बाजू सांभाळत संघाला विजयाकडे स्थिरपणे नेले. मात्र, जेव्हा कॉनॉली १४९ धावांवर बाद झाला, तेव्हा ऑस्ट्रेलियाला विजयासाठी आणखी चार धावांची गरज होती आणि अ‍ॅडम झाम्पाने चौकार मारुन संघाला विजय मिळवून दिला.

## वैभव सूर्यवंशी पुन्हा अपयशी



**नवी दिल्ली :** भारत अ संघ सध्या श्रीलंका दौऱ्यावर असून तिथे सुरू असलेल्या त्रिकोणी मालिकेतील चौथा सामना आज भारत ‘अ’आणि श्रीलंका ‘अ’ यांच्यात खेळला जात आहे. या मालिकेत आतापर्यंत तिन्ही संघांनी प्रत्येकी एक-एक सामना जिंकला असल्याने स्पर्धा अधिक रंगतदार झाली आहे. या सामन्यात सगळ्यांचे लक्ष १५ वर्षीय युवा फलंदाज वैभव सूर्यवंशीवर होते. मात्र, आक्रमक सुरुवात करूनही त्याला मोठी खेळी करता आली नाही. वैभव सूर्यवंशीसाठी हा दौरा संमिश्र ठरला आहे. मालिकेतील पहिल्या सामन्यात श्रीलंका ‘अ’ विरुद्ध त्याला केवळ १४ धावा करता आल्या होत्या. त्यानंतर अफगाणिस्तान अ विरुद्धच्या सामन्यात त्याने ४४ धावांची आक्रमक खेळी करत आपली छाप पाडली होती. मात्र, आज पुन्हा श्रीलंका ‘अ’ विरुद्धच्या सामन्यात त्याला मोठी खेळी करण्यात अपयश आले. त्याने १२ चेंडूत १४ धावा करत चांगली सुरुवात केली, पण त्याचे रूपांतर मोठ्या खेळीत करता आले नाही. या सामन्यात श्रीलंका ‘अ’ संघाने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे भारतीय संघाला प्रथम फलंदाजीसाठी मैदानात उतरावे लागले. भारताकडून वैभव सूर्यवंशी आणि प्रभसिमरन सिंग यांनी डावाची सुरुवात केली. वैभवने काही आकर्षक फटके खेळत आक्रमक अंदाज दाखवला, मात्र त्याला मोठी खेळी करता आली नाही. भारताचा सलामीवीर वैभव सूर्यवंशी २१ धावांवर बाद झाला. श्रीलंकेचा फिरकीपटू सहान अराचचिगेच्या ऑफ-स्टंपबाहेरील चेंडूवर मोठा शॉट मारण्याच्या प्रयत्नात वैभव चकवला. त्याच्या बॅटची बाहेरील कडा घेऊन चेंडू पॉईंट क्षेत्रात हवेत उडाला, जिथे वणुजा सहानने त्याचा सोपा झेल घेतला.



## कोल्हापुरात फुटबॉलप्रेमींनी उभारले कटाऊट

कोल्हापूर : क्रिकेटवेड्या भारतातील फुटबॉलवेडे कोल्हापूर ही आपली ओळख फुटबॉलप्रेमींनी सार्थ ठरवली. काल रात्री शहरातील मुख्य चौकांमध्ये तरुण-तरुणी जत्रेसारखे एकत्र जमले. आपल्या आवडत्या खेळाडूचे पोस्टर उभारल्यावर सर्वांनी जल्लोष केला. फुटबॉल विश्वचषकाचा माहोल शहरात प्रकर्षाने पाहायला मिळत आहे. आज मिरजकर तिकटी, दसरा चौकासह अन्य काही चौकांमध्ये मेस्सी, रोनाल्डो, नेमार या आंतरराष्ट्रीय फुटबॉलपटूंचे मोठे कटाऊट लावण्यात आले. रात्री नऊनंतर तरुण-तरुणी आपल्या आवडत्या संघाची जर्सी परिधान करून रस्त्यावर आले. काही जणांनी आपल्या आवडत्या संघाचा झेंडा हातात घेऊन दुचाकीवरून रॅली काढली. दसरा चौकात ‘कोल्हापुरी ब्राझील फॅन’ या ग्रुपने नेमारचे भव्य कटाऊट लावले. यावेळी तरुणांनी येथे ब्राझीलच्या विजयाच्या घोषणा देऊन जल्लोष केला. बालगोपाल तालमीजवळ मेस्सीचे भव्य कटाऊट लावले. त्या त्या देशाचे झेंडे नाचवत तरुणांनी फुटबॉल विश्वचषकाची जणू मुहूर्तमेढच कोल्हापुरात रोवली.



## जपानी फॅन्सनी मॅचनंतर उचला कचरा

**नवी दिल्ली :** विश्वचषक स्पर्धेत डॅलस (अमेरिका) येथे जपान आणि नेदरलँड्स यांच्यात खेळवला गेलेला सामना २-२ असा बरोबरीत सुटला. या रोमांचक सामन्यानंतर जपानी समर्थकांनी स्टेडियममध्ये थांबून प्रेक्षक गॅलरीतील कचरा गोळा केला. जपानी संस्कृतीत एखादे ठिकाण जसे आढळले तसे सोडून जाण्याचे तत्त्वज्ञान आहे, जे विद्यार्थ्यांना प्राथमिक शाळेत शिकवले जाते. त्यामुळे, खेळानंतर चाहते स्टेडियममधील कचरा साफ करण्यासाठी थांबले. आणि त्यांना प्रचंड टाळ्यांचा कडकडाट मिळाला.जेव्हा एका तरुणीला याबाबत विचारले असता ती म्हणाली, ही आमची संस्कृती आहे. पण त्याचबरोबर, स्टेडियमने आमचे स्वागत करणाऱ्या यजमान देशाप्रती, तसेच आमच्या खेळाडूंप्रती आदर व्यक्त करण्याचेही हे एक लक्षण आहे. आपली आजूबाजूची जागा नेहमी स्वच्छ ठेवणे आणि निसर्गाचा आदर करणे हा जपानी संस्कृतीचा एक महत्त्वाचा भाग आहे.

# भारतीय महिलांची विजयी सलामी





स्मृती मानधनाची मॅचविनिंग खेळी

**| बर्मिंगहॅम | वृत्तसंस्था |**

महिला टी-२० विश्वचषक २०२६ स्पर्धेत भारतीय महिला संघाने विजयी सलामी देत आपल्या मोहिमेची दमदार सुरुवात केली आहे. कट्टर प्रतिस्पर्धी पाकिस्तानविरुद्धच्या सामन्यात भारतीय संघाने सर्व विभागांत उत्कृष्ट कामगिरी करत ६४ धावांनी शानदार विजय मिळवला. या विजयासह भारताने स्पर्धेतील पहिले दोन गुण आपल्या खात्यात जमा केले.

एजबेस्टन स्टेडियमवर झालेल्या या सामन्यात भारतीय फलंदाजांनी प्रथम फलंदाजी करत पाकिस्तानसमोर १७१ धावांचे आव्हान उभे केले. यावेळी दबावाच्या सामन्यात भारतीय फलंदाजांनी संयमी आणि आक्रमक खेळी करून मोठी धावसंख्या उभारली. मधल्या फळीत झालेल्या महत्त्वपूर्ण भागीदाऱ्यांमुळे भारताला मजबूत स्थिती मिळाली.

भारताकडून स्मृतीने आक्रमक खेळ करत ४४ चेंडूत २८ धावा केल्या. यात तिने ९ चौकार आणि २ षटकार लगावले. तिला कप्तान हरमनप्रीत कौर आणि रिचा घोष यांनी चांगली साथ दिली.

१७२ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना पाकिस्तानची सुरुवात अपेक्षेप्रमाणे झाली नाही. भारतीय गोलंदाजांनी सामन्यावर पूर्ण नियंत्रण ठेवले. पाकिस्तानचा डाव २० षटकेही पूर्ण होण्यापूर्वीच कोसळला. संपूर्ण संघ १७ षटकांत १०६ धावांवर गारद झाला.

भारतीय गोलंदाजांच्या शिस्तबद्ध आणि आक्रमक गोलंदाजीसमोर पाकिस्तानच्या फलंदाजांनी शरणागती पत्करली. दीप्ती शर्माने ४ षटकांत १० धावा देत ५ विकेट्स घेतल्या. तर, श्रीचरणीने चार षटकांत २१ धाव देत ३ विकेट्स मिळवल्या.

या विजयाला ऐतिहासिक महत्त्व असून महिला टी-२० विश्वचषकाच्या इतिहासात पाकिस्तानविरुद्ध भारताचा हा सातवा विजय ठरला. तसेच एजबेस्टन मैदानावर पाकिस्तानविरुद्ध टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये भारताने मिळवलेला हा चौथा विजय आहे.

### दिप्तीची कौतुकास्पद कामगिरी

दिप्ती शर्माने या सामन्यात अविश्वसनीय कामगिरी केली, तिने तिच्या पहिल्या ओव्हरपासून विकेट घ्यायला सुरुवात केली आणि संघासाठी आजच्या सामन्यात महत्वाचे योगदान दिले. आजच्या सामन्यात तिने पाच विकेट्स घेतले, त्याचबरोबर तिला आजच्या सामन्यात सामनाविराचा पुरस्कार देखील देण्यात आला.

### पाकिस्तानचा 64 धावांनी पराभव

## स्वीडनने ट्युनिशियाचा उडवला धुव्वा

**| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |**

स्वीडनने फिफा विश्वचषक २०२६ च्या आपल्या सलामीच्या सामन्यात ट्युनिशियाला ५-१ ने पराभूत करुन शानदार सुरुवात केली. यासीन अयारीने दोन गोल (सातव्या आणि ९०व्या मिनिटाला) केले, तर अलेक्झांडर इसाक, व्हिक्टर ग्योकेरेस आणि मटियास स्वानबर्ग यांनीही प्रत्येकी एक गोल केला. ट्युनिशियासाठी एकमेव गोल ओमर रेकिकने ४३ व्या मिनिटाला केला. ट्युनिशियाकडे ५१ टक्के चेंडूचा ताबा असूनही, स्वीडननं मिळालेल्या संधींचे सोने केले आणि आपल्या १३ पैकी ८ शॉट्सचे गोलमध्ये रुपांतरित केले. या प्रभावी विजयामुळं स्वीडनने ‘गट फ’ मध्ये अव्वल स्थान मिळवले. तर ट्युनिशियाला आपल्या सलामीच्या सामन्यात दारुण पराभवाला सामोरे जावे लागले आहे.

## नेदरलँड्स,जपान सामना बरोबरीत



**| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |**

डल्लास स्टेडियमवर खेळला गेलेला गट ‘एफ’मधील सामना स्पर्धेतील सर्वात रोमांचक सामन्यांपैकी एक ठरला. नेदरलँड्स आणि जपान यांच्यातील हा सामना २-२ असा बरोबरीत संपला. पहिल्या सत्रात दोन्ही संघ सावधपणे खेळले आणि एकही गोल झाला नाही. मात्र, दुसरे सत्र सुरु होताच सामन्याचे चित्र पूर्णपणे बदलले. ५०व्या मिनिटाला, कर्णधार व्हर्जिल व्हॅन डाइकने रायन ग्रेव्हनबर्चच्या क्रॉसवर शानदार हेडर मारुन नेदरलँड्सला आघाडी मिळवून दिली. जपानने हार मानली नाही आणि ५७ व्या मिनिटाला केटो नाकामुराने खालच्या कोपऱ्यात अचूक शॉट मारुन गोल करत सामना १-१ असा बरोबरीत आणला. ६४ व्या मिनिटाला सोमरविलने एका अप्रतिम शॉटने नेदरलँड्सला २-१ अशी आघाडी मिळवून दिली. डच संघ तीन गुण मिळवेल असे वाटत होते, मात्र, जपानने ८९ व्या मिनिटाला पुनरागमन करत कामाडाने नेटमध्ये वळवले ज्यामुळे स्कोअर २-२ असा बरोबरीत आला.

## धीरजला तिरंदाजीत दोन सुवर्णपदके




**| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |**

भारतीय स्टार तिरंदाज धीरज बोम्मादेवराने तिरंदाजी विश्वचषक स्पर्धेत एकाच दिवशी दोन सुवर्णपदके जिंकून शानदार कामगिरी करत इतिहास रचला. धीरजने प्रथम कुमकुम मोहोडसोबत रिकर्व्ह मिश्र सांघिक प्रकारात सुवर्णपदक जिंकले आणि काही तासांनंतर त्याने पुरुषांच्या वैयक्तिक रिकर्व्ह प्रकारातही सुवर्णपदक पटकावले. जागतिक क्रमवारीत १८व्या स्थानावर असलेल्या आणि भारतीय सैन्याचा तिरंदाज असलेल्या धीरजने अंतिम सामन्यात दक्षिण कोरियाचा स्टार तिरंदाज आणि पॅरिस ऑलिम्पिक कांस्यपदक विजेता ली वू-सेओकचा ७-३ असा पराभव करुन आपल्या कारकिर्दीतील पहिले वैयक्तीक तिरंदाजी विश्वचषक सुवर्णपदक जिंकले.

धीरजने सामन्याची शानदार सुरुवात केली आणि पहिले दोन सेट ३०-२९ आणि २९-२८ असे जिंकून ५-१ अशी आघाडी घेतली. तिसरा सेट २७-२७ असा बरोबरीत सुटला. चौथ्या सेटमध्ये ली वू-सेओकने पुनरागमन करण्याचा प्रयत्न केला आणि २९-२७ असा सेट जिंकून ५-३ अशी आघाडी घेतली. मात्र, दबावाखालीही धीरज शांत राहिला. निर्णायक सेटमध्ये, त्याने एका मदफ सह सलग तीन अचूक १० गुण मिळवून सामना ७-३ नं जिंकला.

अंतिम फेरीत पोहोचण्यापूर्वी, धीरजने उपांत्य फेरीत जर्मनीच्या मॉरिट्झ वायझरचा ६-४ ने पराभव केला. सामन्याची सुरुवात त्याच्यासाठी खराब झाली, त्याने पहिला सेट २६-२७ ने गमावला.

## काव्याचा इंग्लिश खेळाडूवर भरोसा



**| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |**

काव्या मारनच्या मालकीच्या सनरायझर्स लीड्स फ्रँचायझीने इंग्लंडमध्ये खेळल्या जाणाऱ्या मद हंड्रेडफ या प्रतिष्ठित स्पर्धे साठी आपल्या नवीन कर्णधाराची घोषणा केली आहे. यावेळी संघाने २८ वर्षीय इंग्लंडचा स्टार फलंदाज जॅक क्रॉलीवर मोठी बाजी लावत त्याला कर्णधारपद दिले आहे. यापूर्वी संघाचे नेतृत्व हॅरी ब्रूक करत होता.

परंतु या हंगामात ब्रूक कर्णधारपदाच्या कोणत्याही दबावाशिवाय फलंदाज म्हणून मैदानात उतरेल. जेणेकरून तो आपल्या फलंदाजीवर पूर्णपणे लक्ष केंद्रित करू शकेल आणि संघासाठी मुक्तपणे धावा करू शकेल. भारतीय उद्योजिका काव्या मारन यांची सनरायझर्स हैदराबाद फ्रँचायझी आता आपल्या नवीन संघ आणि नवीन कर्णधारासह मद हंड्रेडफ स्पर्धेत आपली छाप सोडण्यास सज्ज झाली आहे.

## वेस्ट इंडिजने २-१ ने जिंकली मालिका

**| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |**

वेस्ट इंडिज क्रिकेट संघाने श्रीलंकेविरुद्धची तीन सामन्यांची टी-२० आंतरराष्ट्रीय मालिका जिंकली आहे. वेस्ट इंडिजने ही मालिका २-१ ने जिंकली. मालिकेतील अंतिम सामना भारतीय वेळेनुसार १५ जून रोजी किंग्स्टन इथे खेळला गेला, ज्यात श्रीलंकेचा पाच गडी राखून पराभव झाला. तिसऱ्या टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यात श्रीलंकेची कामगिरी खराब करण्यात वेस्ट इंडिजचे तीन खेळाडू, शेमार जोसेफ, शेर्फेन रदरफोर्ड आणि जेसन होल्डर यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

श्रीलंकेविरुद्धच्या तिसऱ्या टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यात शेमार जोसेफनं एकहाती पाच बळी घेतले. त्यानं चार षटकांत ३३ धावा देऊन पाच बळी घेत आपल्या टी-२० आंतरराष्ट्रीय कारकिर्दीतील सर्वोत्तम कामगिरी केली. टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमधील त्याची यापूर्वीची सर्वोत्तम कामगिरी ३० धावांत चार बळी घेण्याची होती.

वेस्ट इंडिजने १७० धावांचे लक्ष्य पार करुन श्रीलंकेला पराभूत केले. प्रथम फलंदाजी करताना श्रीलंकेने २० षटकांत १६९ धावा केल्या. वेस्ट इंडिजने तीन सामन्यांच्या मालिकेतील पहिला सामना जिंकला होता. तर दुसऱ्या टी-२० सामन्यात श्रीलंकेने पुनरागमन केले, पण वेस्ट इंडिजने तिसरा सामना जिंकून मालिका आपल्या नावावर केली.

### होल्डरची ४२० च्या स्ट्राईक रेटने फलंदाजी



टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यात शेमार जोसेफनं एकहाती पाच बळी घेतले.

### रदरफोर्ड, होल्डरने संपवला सामना

तिसऱ्या टी-२० मध्ये श्रीलंकेच्या विजयाच्या आशांवर पाणी फेरणारा दुसरा खेळाडू होता शरफेन रदरफोर्ड, ज्यानं ४० चेंडूंमध्ये चार षटकारांसह नाबाद ५४ धावा केल्या आणि संघ जिंकेपर्यंत एक बाजू सांभाळून धरली. मात्र, श्रीलंकेविरुद्धचा सामना जेसन होल्डरनं संपवला ज्यानं मैदानात उतरताना ४२० च्या स्ट्राईक रेटनं धावा केल्या होत्या. जेसन होल्डरनं अवघ्या पाच चेंडूंमध्ये नाबाद २१ धावा केल्या.

## यूपी बृज स्टार्सने पटकावले जेतेपद

**| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |**

बिग क्रिकेट लीग स्पर्धेच्या दुसऱ्या पर्वात जेतेपदाचा मानकरी ठरला तो यूपी बृज स्टार्स संघ या स्पर्धेचा अंतिम सामना पार पडला. या सामन्यातक यूपी बृज स्टार्सने गुजरात डायमंड्सला पाच धावांनी पराभूत केलं. पण हा सामना यूपी बृज स्टार्सने सहज जिंकला नाही, तर विजयासाठी खूप घाम गाळावा. गुजरात डायमंड्सने शेवटच्या षटकांपर्यंत यूपी स्टार्सला विजयासाठी झुंजवले. अखेर या अतितटीच्या सामन्यात यूपी बृज स्टार्सने ५ धावांनी विजय मिळवला. नाणेफेकीचा कौल गुजरात डायमंड्सच्या बाजूने लागला होता. त्यांनी प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. यूपी बृज स्टार्सने २० षटकात ८ गडी गमवून १६६ धावा केल्या. बिग क्रिकेट लीग टी२० स्पर्धेत यूपी बृज स्टार्सने विजयासाठी दिलेल्या १६७ धावांचा पाठलाग करताना गुजरात डायमंड्स सघ फक्त १६१ धावा करू शकला.

### गुजरात डायमंड्स अंतिम सामन्यात पराभव



### अंतिम सामन्यात बजर चॅलेंज

अंतिम सामन्यात काही रोमांचक असे बजर चॅलेंज पाहायला मिळेल. हार्दिकने दोन वेळा सलग तीन निर्धाव चेंडू टाकण्याचं चॅलेंज घेतले. मनोजने ३० धावांचे चॅलेंज घेतले होते. तर विशाल गुर्जर आणि जतिन सैनीने तीन डॉट चेंडू टाकण्याचं आव्हान घेतले. जतिन मावीने विकेट आणि तीन विकेटचं चॅलेंज स्वीकारले. त्याने तीन विकेटचं चॅलेंज यशस्वीरित्या पूर्ण केले आणि अंतिम फेरीत छाप सोडली.

## प्रज्ञानंद ठरला नॉर्वेचा राजा



**| ओस्लो | वृत्तसंस्था |**

ग्रँडमास्टर प्रज्ञानंदने इतिहास रचत अंतिम फेरीत जर्मनीच्या व्हिन्सेंट कीमरवर शानदार विजय मिळवून ‘नॉर्वे बुद्धिबळ’ स्पर्धेचे विजेतेपद संपादन केले. ही स्पर्धा जिंकणारा तो भारताचा पहिला बुद्धिबळपटू ठरला आहे. शुक्रवारी अंतिम फेरीची सुरुवात झाली तेव्हा प्रज्ञानंद १५ गुणांसह दुसऱ्या स्थानावर होता.

अंतिम सामन्यात त्याने क्लासिकल प्रकारात विजय मिळवून तीन गुणांची कमाई केली. एकूण १८ गुणांसह त्याने या एलिट बुद्धिबळ स्पर्धेच्या सर्वात प्रतिष्ठेच्या ट्रॉफीवर आपले नाव कोरले.

पाच वेळा वर्ल्ड चॅम्पियन ठरणारा विश्वनाथन आनंद तसेच गुकेश यांनीही या स्पर्धेचे जेतेपद पटकावता आलेले नाही. जागतिक क्रमवारीत पहिल्या क्रमांकावर असलेल्या आणि सात वेळा नॉर्वे चेसचे जेतेपद पटकावणाऱ्या कार्लसनचा दोनदा पराभव करणे हे या स्पर्धेतील त्याचे सर्वात मोठे यश राहिले.

ब्राझीलचा वर्ल्ड रेकॉर्ड तोडत रचला इतिहास | कुराकाओचा विश्वचषकात पहिला गोल

# कुराकाओ विरुद्ध जर्मनीचा दणदणीत विजय



**| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |**

जर्मनीन पदार्पण करणाऱ्या कुराकाओ संघाचा ७-१ असा एकतर्फा पराभव करुन फिफा विश्वचषक २०२६ मधील आपल्या मोहिमेची दणक्यात सुरुवात केली. या विजयामुळे जर्मनीने केवळ तीन गुणच मिळवले नाहीत, तर ब्राझीलच्या नावावर असलेला विश्वचषकाचा विक्रमही आपल्या नावावर केला. जर्मन संघाने गट ‘इ’ मधील या सामन्यावर सुरुवातीपासूनच पूर्णपणे वर्चस्व गाजवले. त्यांनी तोच आक्रमक खेळ दाखवला, ज्यामुळे त्यांना जगातील सर्वात यशस्वी फुटबॉल संघांपैकी एक म्हणून ओळख मिळाली आहे. विशेष म्हणजे, जर्मनीने पुन्हा एकदा ७-१ असा विजय मिळवला, ज्यामुळे २०१४ च्या विश्वचषक उपांत्य फेरीच्या सामन्याची आठवण झाली, जिथे जर्मनीने ब्राझीलला ७-१ ने हरवून इतिहास रचला होता.

फेलिक्स नमेचाने सहाव्या मिनिटाला एका शानदार गोलने संघाला आघाडी मिळवून दिली. मात्र, कुराकाओने २१व्या मिनिटाला बरोबरीचा गोल करुन सर्वांना आश्चर्यचकित केले. एका वेगवान प्रतिहल्ल्यादरम्यान, लिवानो कोमेन्सियाचा शॉट मॅन्युएल न्युअरला लागून जाळीत गेला. हा कुराकाओचा फिफा विश्वचषकातील पहिला गोल ठरला. मध्यंतराच्या अगदी आधी, काय हावर्ट्झने पेनल्टीचे गोलमध्ये रुपांतर करुन ३-१ अशी आघाडी घेतली. दुसऱ्या हाफच्या केवळ ६९ सेकंदांतच, जमाल मुसियालाने सामना जवळजवळ निश्चित करुन ७-१ असा

### सर्वाधिक गोल करणारे संघ

जर्मनी - २३९
ब्राझील - २३८
अर्जेंटिना - १५२

### जर्मनीने केला ऐतिहासिक विक्रम

कुराकाओविरुद्ध सात गोल करुन, जर्मनी फिफा विश्वचषकाच्या इतिहासात सर्वाधिक गोल करणारा संघ बनला आहे. जर्मनीने आता विश्वचषकात एकूण २३९ गोल केले आहेत. तर ब्राझील २३८ गोलांसह दुसऱ्या स्थानावर घसरला आहे. जर्मनी आता विश्वचषकाच्या इतिहासात २५० गोल करणारा पहिला संघ बनण्याचा प्रयत्न करेल. इतकंच नाही, तर विश्वचषक सामन्यात सात किंवा अधिक गोल करण्याची ही जर्मनीची चौथी वेळ आहे.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ.सुप्रिया पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)